# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ७३५८

भीमराव कुलकर्णी



REFBK-0015246

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ....... १३५ ....... नों. दि: ........



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

REFBK-0015246

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२४६

लेखक

**भीमराव कुलकर्णी**

डॉ० बाबासाहेब आंबेडकर
चरित्र
पहिली आवृत्ती १४ एप्रिल १९६६
□
मूल्य तीन रुपये
सर्व हक्क सुरक्षित
□
प्रकाशक
श्यामकान्त बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
धनतोली, नागपूर १
४६१।४ सदाशिव, पुणे २
□
मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

□

‘ हा मित्रा तुमचे पांग फेडील ’ ६
विद्येच्या क्षेत्रातील गरुडभरारी १४
दलितांचा परमेश्वर २२
हिमालयासम अमुचा नेता ३०
झुंज ४०
अहेवमरण ५०
बंडखोराची भीमगर्जना ५८
नव्या युगाचा ‘ नवा मनु ’ हा ! ६६
स्वातंत्र्य मिळाले ! स्वराज्य आले ! ! परंतु.... ७८
बुद्धं सरणं ८६
अखंड तेवणारा ज्ञानदीप ९४

□

सिद्धार्थ महाविद्यालयास........


# १. 'हा भिवा तुमचे पांग फेडील'

एका हातात एक जुनी ट्रंक व दुसऱ्या हातात एक मिठाईचा पुडा आणि एक पुस्तक घेऊन सुरतेच्या स्टेशनमध्ये एक तरुण घाईघाईने प्रवेश करीत होता आणि त्याच्यासमोरून मुंबईकडे जाणारी गाडी धाडधाड करीत स्टेशनबाहेर पडत होती. त्याला क्षणभर वाटले, आपण ओरडून त्या गाडीला सांगावे.

'ए, बये थांब अशी. चाललीस कुठं मला सोडून?' आणि आपल्या शब्दांनी चकित होऊन ती गाडी एकदम थांबावी......

परंतु त्या गाडीला त्या तरुणाचे मन कळले नाही आणि आपले शब्दही या बाबतीत कुठे लुळे, पांगळे पडताहेत की काय अशी क्षणभर भलतीच शंका त्याच्या मनाला चाटून गेली आणि हातातील ट्रंक खाली ठेवून तो मनातच म्हणाला,

'जा बये, जा तू. या भीमरावाने असे निराशेचे, मानभंगाचे थोडे का चटके सहन केले आहेत? पण लक्षात ठेव...



१५२४६



परंतु पुढचे शब्द त्याच्या मनातल्या मनातच जिरले आणि तो तशा अवस्थेत शेजारच्या एका बाकड्यावर बसला. सहज खिशात हात गेला तर हातात तारेचा कागदच आला,

'रामजीबाबा अतिशय आजारी आहेत. ताबडतोब नीघ... '

तारेतला मजकूर डोळ्यांसमोर येताच त्याला एकदम भडभडून आले.

'परमेश्वरा, माझे बाबा मला भेटतील का ?'

त्याला काही केल्या हुंदके आवरेनात.

वास्तविक पंधरा दिवसांपूर्वीच आपल्या वडिलांचा निरोप घेऊन तो बडोद्याला आला होता. बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनी बी. ए. पास झाल्यावर त्याला नोकरी दिली होती, आणि नव्या नोकरीवर रुजू होऊन अद्याप पंधरवडाही लोटला नव्हता, इतक्यात ही तार मिळाली होती. बडोद्याहून सुरतेला आल्यावर स्टेशनबाहेर जाऊन आपल्या घरी मोकळ्या हाताने जाऊ नये, थोडी मिठाई घेऊन जावे, म्हणून आपण धडपड केली आणि हाय



रे दुर्दैवा, तेवढ्यात गाडी निघून जावी ना! ह्या जगात माणसांच्या हातून आमचा छळ होतो, तेवढाच पुरेसा नाही का? आणखी त्यामध्ये नशीबाने देखील आमची परीक्षा का घ्यावी! अशा तऱ्हेचे नाना प्रश्न त्याच्या मनात उद्भवत होते.

गाडी निघून गेल्यावर थोड्या वेळाने स्टेशनवरची हालचाल थंडावली होती आणि तो तरुण एकटाच रडून रडून डोळे सुजल्यामुळे शून्य नजरेने आकाशाकडे पाहत विचार करीत बसला होता. त्याच्या मनात असंख्य विचारांची गर्दी उसळली होती. सतत आपल्या वडिलांचा चेहरा त्याच्या डोळ्यांसमोर येत होता आणि पुनःपुन्हा त्यांच्या आठवणी त्याच्या मनात गर्दी करीत होत्या. त्याचवेळी मध्येच त्याला त्याची आई आठवत होती....

मोठी करारी आणि आणि कर्तबगार स्त्री होती ती. तिचे घराणे सबंध ठाणे जिल्ह्यात लष्करी बाण्याचे म्हणून प्रसिद्ध होते. ठाण्याजवळचे 'मुरबाड' नावाचे थोटेसे गाव, परंतु ब्रिटिशांची राजवट सुरू झाली आणि कित्येक महत्त्वाकांक्षी तरुणांनी लष्करात शिरून मोठा पराक्रम गाजविला. महारकीच्या गुलामगिरीचे, अपमानाचे बंद त्यांनी स्वतःच्या पराक्रमाने तोडून टाकले. तिचे वडील आणि चुलते मिळून सातही भाऊ सर्वच लष्करात सुभेदार–मेजरच्या हुद्यावर पोचले होते. त्यावेळी लष्करात शिरलेल्या हिंदी तरुणांना मिळणारा तो मोठा मान होता. सुभेदार–मेजर म्हणजे हिंदी तरुणांचा खराखुरा अधिकारी आणि म्हणूनच इंग्रज अधिकारी त्यांचा योग्य तो मान राखीत, त्यांना 'साब' म्हणून संबोधीत आणि त्यांच्या जीवांवर आपण अफगाणयुद्ध वगैरे महत्त्वाच्या ठिकाणी मोठाले विजय मिळविले याची त्यांना जाणीव असे. अशा या घराण्यातील मुलीचा संगपाळ घराण्यातील रामजीशी विवाह झाला होता. त्यांचेही घराणे मुळातले कोकणातील आंबवडे गावचे. वेळीच गावाबाहेर पडून लष्करात भरती होऊन मोठे प्रतिष्ठित मानले जात होते...

आणि या माऊलीने चौदा अपत्यांना जन्म दिला होता.

'ती सर्वचा सर्व जगली असती तर आपल्या वडिलांना त्यांची किती म्हणून मदत झाली असती! त्यांतील मोठ्या मुलांनी नोकरी करून वडिलांची वृद्धपणी यातायात वाचविली असती आणि मी सगळ्यांत धाकटा म्हणून माझ्या शिक्षणासाठी त्यांनी वडिलांपुढे दर महिन्याच्या महिन्याला पगार आणून टाकले असते आणि म्हटले असते,

'बाबा, ह्या धाकट्या आनंदाला आणि भिवाला खूप खूप शिकवायचे बरे का! आम्ही त्यांना कायबी कमी पडू देणार नाही. पुस्तकं, फी कपडे त्यांना पाहिजे ते द्या. त्यांना अभ्यास करायला निराळी खोली घेऊन द्या!'

पण छे, माणसांना सुखाने जगू दिले तर ते दैव कसले! सुरुवातीला जन्माला आलेली मुलं लहानपणीच आपल्या डोळ्यांसमोर जात असलेली तिला पाहावे लागले. राहिलेली मुलं अजून कच्चीबच्ची असतानाच तिच्या नवऱ्याची लष्करातली नोकरी संपली आणि पेन्शन घेऊन त्यांना दापोलीला यावे लागले आणि बाळंतपणांनी खंगत चाललेल्या तिच्या शरीराला दापोलीची हवा मानवली नाही...नवऱ्याला साताऱ्याला पी. डब्ल्यू. डी. च्या खात्यात नोकरी लागली म्हणून तिला साताऱ्यास यावे लागले आणि तेथेच तिचा सर्वांत धाकटा 'भिवा' पाच वर्षांचा असतानाच ती आपल्या लेकरांना सोडून देवाघरी गेली. जाण्यापूर्वी तिने भरलेल्या डोळ्यांनी आपल्या कच्च्यांबच्च्यांना एकदा पाहून घेतले आणि आपल्या नणंदेला जवळ बोलावून ती म्हणाली,

'मीरा, आता यापुढं तू या पोरांची आत्या नव्हस. आता तूच त्यांची आई होयाचं बघ. ह्या धाकट्या भिवाकडं लक्ष दे. लै हूड आणि खटयाळ है तो. माझ्यावानी मानी स्वभाव है तेचा....'

त्या प्रसंगाच्या आठवणीनं भरल्या डोळ्यानं भिवा म्हणाला, 'आई, तू सुद्धा माझ्यावर का इतकी निष्ठुर झालीस ग?'

त्याने आठवणींना खूप ताण दिला परंतु त्याच्या लहानपणीच गेलेल्या त्याच्या आईचा चेहरा आठवणींच्या आरशातून पुसट पुसट होत गेला होता आणि त्याच्या डोळ्यांसमोर प्रयत्न करूनही तिच्या चेहऱ्याची ठेवण नीटशी येत नव्हती...

परंतु त्याचे वडील तर नेहमी म्हणायचे की, भिवाने आपल्या आईचे सगळे रूप साक्षात घेतले आहे. तिचे डोळे, तिची करारी मुद्रा...

त्यामुळेच सर्वांत शेंडेफळ असूनही त्याला तिचे नाव देण्यात आले होते. रामजी सुभेदारांचा नवसासायासानं झालेला हा मुलगा मोठा गुटगुटीत आणि आईसारखा दिसत होता. बारशासाठी जमलेल्या बायका म्हणाल्या,

'ह्यो मुलगा भीमावानी लठ्ठमुठ्ठ आन् पराक्रमी होनार.'

आन् दिसत्योय बी आपल्या आईवानी—भीमाबाईवानी–'

'मग त्याचं नाव भीमच ठेवा.'

परंतु त्याला ‘ ए भीमा ’ म्हणून रामजीबाबांनी हाक मारावी आणि ‘ जी ’ म्हणून भीमाबाई पुढे यावी असे वारंवार घडू लागले. रामजीबाबांनी म्हणूनच त्याला ‘ भिवा ’ म्हणून हाक मारण्यास सुरुवात केली.

तशाही परिस्थितीत ही गोष्ट आठवल्यामुळे तरुण भिवाच्या ओठावर किंचित स्मित उमटले.

‘ कसल्याही अपमानानं आपल्या जीवाची एकदम काहिली होते, हा आपल्या मातेचा गुण माझ्यामध्ये आला असेल का ?

‘ अलबत ! तसेच असले पाहिजे. तिच्या बद्दलच्या हकिकती सांगताना वडिलांनी तिची स्वच्छता, टापटीप, लिहिण्या-वाचण्याची आवड आणि तिच्या मानी स्वभावाच्या कितीतरी गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांमधून हीच गोष्ट सिद्ध होते. ’

आपण अस्पृश्य म्हणून जन्माला आलो म्हणून आपली क्षणोक्षणी होत असलेली विटंबना आपल्याला कशी मनस्तापदायक ठरते आणि त्याचे चटके किती असह्य असतात, हे त्याला आठवू लागले.

लहानपणी सातारला असताना वडिलांची गोरेगाव येथे दुष्काळी कामावर नेमणूक झाली आणि सुट्टीच्या दिवसांत त्यांना भेटायला जाण्याच प्रसंग आला तर ‘ मसूर ’ स्टेशनवरून गोरेगावला जाण्यासाठी ‘ महार ’ म्हणून त्यांना कोणी पैसे घेऊन गाडीत बसवीना. गाडीवानास दुप्पट पैसे देऊन गाडी ठरविली तरी ती त्या भावंडानांच हाकावी लागली आणि दिवसभरच्या प्रवासात तहानेने व्याकुळ झालेल्या त्या पोरांना घोटभर पाणी देण्याइतपत सहानुभूतीही कोणाच्या अंतःकरणात उद्भवेना, तेव्हा धाकटा भिवा असाच संतापाने थरथरत, कापत होता. साताऱ्याच्या शाळेत त्याला ‘ संस्कृत ’ विषय घ्यायचा होता, परंतु महार म्हणून त्याला ‘ संस्कृत ’ घेता आले नाही आणि पर्शियन भाषा जबरदस्तीने घ्यावी लागली. सवर्ण हिंदू त्यांच्या पोषाखाकडे, टापटिपीकडे पाहून ही कोणी ब्राह्मणांची मुले आहेत असे मानीत आणि त्यांची जात समजल्यावर झुरळासारखे त्यांना झटकून टाकीत. शाळेतल्या फळ्यावर लिहिण्यास बंदी तर हॉटेलाच्या कोपऱ्यात ठेवलेल्या मातीच्या भांड्यातून चहा घेण्याचा तो भयंकर प्रकार ! बी. ए. होऊन गायकवाड सरकारची नोकरी पत्करली तर कोणीही फाटका शिपाई ‘ महार ’ म्हणून लांबूनच फायली अंगावर फेकतो.

अशा एक का दोन...क्षणाक्षणाला अपमान, मानभंग...

एकीकडे आईकडून आलेला तो मानी स्वभाव आणि दुसरीकडे आपल्या वडिलांचा सहनशील, शांत व विद्याप्रेमी स्वभाव...

खरोखर आपल्या सगळ्या कर्तृत्वाचे सारे श्रेय आपल्या वडिलांनाच नाही का? लष्करात भरती होऊन ते सुभेदार–मेजरच्या हुद्यापर्यंत स्वतःच्या कर्तृत्वाने चढत गेले. परंतु त्यांना कधी अहंकाराने शिवले नाही. मिलिटरीच्या नॉर्मन स्कूलमधून ते मॅट्रिकपर्यंत शिकले आणि निवृत्तीपूर्वी काही वर्षे सरकारने त्यांची नॉर्मन स्कूलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक केली. कोकणच्या खेड्यातील एक महार इसम सरकारी शाळेचा हेडमास्तर होतो, हे केवळ ते लष्करात गेले म्हणूनच घडू शकले. लष्करात त्यांच्या हाताखाली शिकून गेलेले किती तरी तरुण अद्याप भेटतात आणि त्यांच्या इंग्रजी शिकविण्याची तारीफ करतात...

बाबांना, उत्तम इंग्रजी येत होते. घरी बसल्या त्यांनी थोडेबहुत संस्कृत शिकून घेतले होते. अक्षर कसे वळणदार होते. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, कबीर, तुलसीदास इ० संतांचे अभंग त्यांना तोंडपाठ येत होते आणि शेवटी शेवटी तर कबीर पंथाची दीक्षा घेतल्यामुळे आध्यात्मिक समतेबरोबरच सामाजिक समतेचीही त्यांना तळमळ लागून राहिली होती.

आपल्या मुलांनी खूप शिकावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या शिक्षणासाठी वाटेल ते कष्ट करण्याची त्यांची तयारी होती. मुलांच्या शिक्षणासाठीच तर त्यांनी लष्करातून निवृत्त झाल्यानंतर साताऱ्याला नोकरी धरली आनंदा आणि भिवा यांनी खूप शिकावे, आपले घराणे नावलौकिकाला आणावे यासाठी त्यांनी हयातभर कष्ट उपसले. साताऱ्याची नोकरी सुटली आणि मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून ते मुंबईस आले. मुलांना एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये घातले आणि घरच्या घरी त्यांचा उत्तम अभ्यास करून घेतला. मोठ्या आनंदापेक्षा धाकटा भिवा चलाख होता, हुशार होता म्हणून त्यांनी त्याच्याकडे अधिक लक्ष दिले. त्याला पुढे जाता यावे म्हणून त्यांनी आनंदाला शाळेतून काढून वर्कशॉपमध्ये नोकरी लावून दिली. लहानपणीच त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची लग्नं करून दिली आणि घरात सुना आणल्या.

त्या एवढ्याशा खोलीचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहिले आणि भिवाला त्या खोलीत आपण सगळ्यांनी कसे दिवस काढले, या कल्पनेने अंगावर काटा उभा राहिला. एका कोपऱ्यात चूल आणि दुसऱ्या कोपऱ्यांत घरातले किडूक

मिळूक सामान. तिसऱ्या, कोपऱ्यात रामजीबाबांच्या सुना अंग मोडून कशाबशा झोपलेल्या. राहिलेल्या कोपऱ्यात अभ्यास करून दमलेला भिवा एवढ्याशा जागेत पाय पोटाशी घेऊन झोपलेला. त्याच्या पायांशी बांधलेली शेळी आणि तिचे लहानगे शेरडू लुडबुडते आहे. आणि आपल्या मुलाला निवांतपणे झोपायला मिळावे म्हणून रामजीबाबा अंग आखडून मनातल्या मनात तुकोबाचे अभंग पुटपुटत जागत बसलेले आहेत. भिवा हूड होता, मानी होता, परंतु दरवर्षी परीक्षेत पास होत होता. त्याला पुस्तके नव्हती, फीला द्यायला जवळ पैसे नव्हते. परंतु तरीही तो आवडीने शिकत होता....

'देवा, परमेश्वरा, माझा पोरगा असाच खूप शिकू दे, मोठा होऊ दे. घराण्याचा दिवा ठरू दे. समाजाला मार्गदर्शक ठरू दे....'

आणि या इच्छेपोटी ते भिवाला सक्तीने अभ्यासाला बसवीत. त्याच्यावरती पहारा ठेवावा, याप्रमाणे त्याच्यासमोर बसून राहत....

हातातील पुस्तक दूर ठेवून थोडेसे भटकून यावे, समुद्रात डुंबावे. ओव्हलवर क्रिकेट खेळावे, महालक्ष्मीवर हुंदडावे असे त्याला वाटे. त्यामुळे समोर बसलेल्या रामजीबाबांची नजर त्याला कित्येक वेळेला नकोशी वाटे... परंतु त्यांच्या प्रेरणेमुळेच त्याला शाळा—कॉलेजात, अभ्यासात अधिक गोडी वाटू लागली होती. ग्रंथालयातील पुस्तके अधाशासारखी वाचून फस्त करण्याचा नाद लागला होता आणि घरी बसायला जागा नव्हती म्हणून सार्वजनिक बागांत बसून एकाग्रचित्ताने तो पुस्तकावर पुस्तके वाचीत होता.

'बाबा, मला शाळा–कॉलेजला लावलेली पुस्तके वाचीत बसण्याचा कंटाळा होता, परंतु आता मला तुमच्या शिस्तीचे महत्त्व कळते. मी खेळण्या–हुंदडण्यापेक्षा तुमच्या इच्छेनुसार अभ्यासाकडे थोडे अधिक लक्ष दिले असते, तर शाळा–कॉलेजांतून शिष्यवृत्त्यांवर शिष्यवृत्त्या पटकावल्या असत्या आणि तुमचे कष्ट कमी केले असते....

'पण बाबा, आता ती कसर मी भरून काढीन. यापुढेही नोकरी करता करता खूप अभ्यास करीन. त्यामध्ये कसलीही कसूर करणार नाही. तुम्ही आता शेवटचे चार दिवस सुखाने चार घास खा आणि संसाराच्या त्रासातून मुक्त व्हा. हा भिवा तुमचे पांग फेडील....'

मुंबईच्या स्टेशनवर उतरलेला भिवा ट्राममध्ये बसून घरी गेला.

त्याचे वडील शेवटची घटका मोजीत होते. प्राण नेत्रात आणून ते आपल्या लाडक्या भिवाची वाट पाहत होते.

' भिवा आला का ? ' म्हणून रात्रभर क्षीण आवाजात विचारात होते.

भिवा आला आणि त्याने आपल्या वडिलांना घट्ट मिठी मारली. त्यांनी त्याच्या पाठीवरून आपले हात फिरविले आणि बघता बघता त्यांच्या घशामध्ये शेवटची घरघर सुरू झाली.

' बाबा, बाबा, हे काय झाले हो... ' भिवाने हंबरडा फोडला. परंतु दुसऱ्याच क्षणी रामजीबाबांनी समाधानाने डोळे मिटले होते.

* * *

वि:


# २. विद्येच्या क्षेत्रातील गरुडभरारी

आपल्या वडिलांच्या मृत्यूने पोरका झालेला आणि त्यांच्या आत्म्यास शांती मिळण्याचा एकच मार्ग म्हणजे खूप खूप अभ्यास करण्याची प्रतिज्ञा करणारा हा तरुण त्यानंतर पाचच महिन्यांनी न्यूयॉर्कमध्ये कोलंबिया विद्यापीठातील सर्वोच्च पदवी मिळविण्यासाठी दाखल झाला होता.

अस्पृश्यतेच्या कलंकाने अपमानित झालेल्या ह्या महत्त्वाकांक्षी तरुणाला एका स्वतंत्र, समृद्ध अशा राष्ट्रातील मोकळ्या वातावरणात मुक्तपणाने विहार करण्याचे मोठे भाग्य लाभले होते. हे अलौकिक, अद्भुत घडून आले, ते त्याच्यावरील एका शिक्षकाच्या प्रेमामुळे. हुशार आणि महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना या देशात अनेकविध स्वरूपात दैवाने साथ दिली आहे. आंबेडकरांच्या बाबतीतही तसेच झाले.

साताऱ्याला कॅंपमधील शाळेत शिकत असताना आंबेडकर नावाच्या शिक्षकांनी त्याच्यावर असाच प्रेमाचा वर्षाव केला होता.

रोजच्या मधल्या सुट्टीत बाकीची इतर सर्व मुले डबा सोडून खात



बसतात आणि ह्या आपल्या आवडत्या आणि चलाख मुलाची त्याबाबतीत कुचंबणा होते हे पाहून त्यांनी आपल्या स्वतःच्या डब्यातून त्याच्या रोजच्या खाण्याची सोय केली होती. इतकेच नव्हे तर ह्या विद्यार्थ्याबद्दलच्या प्रेमापोटी त्याचे 'आंबवडेकर' हे आडनाव पटावरून कमी करून आपले 'आंबेडकर' हे नाव दाखल केले होते.

मुंबईला एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिकत असताना घरच्या जागेच्या अडचणीमुळे सार्वजनिक बागेत एकाग्र चित्ताने अभ्यास करणाऱ्या ह्या विद्यार्थ्याकडे प्रसिद्ध समाजसुधारक, लेखक व सिटी हायस्कूलमधील शिक्षक कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांचे लक्ष गेले होते आणि हा मुलगा मॅट्रिक पास झाला, त्यावेळी त्याच्या सत्काराच्या सभेत त्यांनी भाषण करून त्याला प्रोत्साहन दिले होते. या मुलाने महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे म्हणून बडोद्याच्या सयाजीराव महाराजांना भेटून त्यांच्याकडून त्याला दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती द्यावयास लाविली होती.



आणि रामजीबाबांच्या निधनानिमित्त ह्या पोरक्या पोराचे सांत्वन करण्यासाठी आलेल्या केळुसकरांनीच तरुण भीमरावास मुंबईत वास्तव्य असलेल्या सयाजीरावांना भेटून त्यांच्या कानावरती बडोद्यातील नोकरीची हकीकत घालण्यास सुचविले होते.

आंबेडकर सयाजीरावांना भेटावयास त्यांच्या मुंबई येथील बंगल्यावर गेले. महाराजांनी ह्या तरुणाच्या तोंडून सर्व हकीकत ऐकली आणि ते म्हणाले,

'उच्च शिक्षण घेण्यासाठी आम्ही भारतातील काही तरुणांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेस पाठविण्याचे ठरविले आहे. तुमची इच्छा असेल तर ताबडतोब अर्ज करा.'

सयाजीराव महाराजांचे हे उद्‌गार ऐकून 'आंधळा मागतो एक डोळा...' ह्या म्हणीची आंबेडकरांना आठवण झाली आणि मोठ्या उत्साहाने त्यांनी होकार दिला. त्यांनी लगेच घरी जाऊन अर्ज टाकला.

अब्राहम लिंकनच्या, बुकर टी. वॉशिंग्टनच्या, थोरो आणि इमर्सनच्या भूमीतील वैभवसंपन्न आणि अद्ययावत साधनांनी सुसज्ज असलेल्या विद्यापीठात अभ्यास करून आपल्या बुद्धिमत्तेने आणि ध्येयवादाने एखादा महत्त्वाकांक्षी आणि दलित वर्गातून पुढे आलेला तरुण काय चमत्कार करू शकतो, याचा साक्षात्कार घडविण्याची ही दैवाची विलक्षण लीला होती.

जुलैच्या १९१३ च्या शेवटच्या आठवड्यात आंबेडकर न्यूयार्कला पोचले आणि त्यांनी कोलंबिया विद्यापीठात नाव घातले.

अमेरिकेतील आपल्या वास्तव्यात त्यांना किती मोठा फरक आढळून आला! तेथे लिहिण्याचे, बोलण्याचे, कोठेही हिंडण्याचे, कोणाबरोबरही मिसळण्याचे स्वातंत्र्य होते. अस्पृश्य म्हणून हटकणारे तेथे कोणीच नव्हते आणि विद्यापीठाच्या ग्रंथालयांतून मनसोक्तपणे पुस्तके वाचावयाची सोय होती.

स्त्री-पुरुषांचा एकत्र असा स्वच्छंद विहार आणि वैभवलालसेची, भोगतृप्तीची अखंड धडपड यांनी बाहेरच्या देशांतून आलेल्या कोणत्याही तरुणाचे डोळे दिपून जावे, असेच वातावरण तेथे होते. परंतु त्या वातावरणाच्या दर्शनाने चित्तवृत्ती विचलित होण्याऐवजी उलट आंबेडकरांच्या मनामध्ये कर्तव्यबुद्धी क्षणाक्षणाला दृढ होत गेली आणि आपल्या दीनदलित, दुःखी आणि शतकानुशतके गुलामगिरी आणि अज्ञानांधःकारात खितपत पडलेल्या आपल्या देशबांधवांची त्यांना तीव्रतेने आठवण होऊ लागली.

मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेतला पाहिजे, आपल्या देशबांधवांची दुःखे दूर करायची असतील तर आपल्या देशातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, वैज्ञानिक आणि अध्यात्मिक परिस्थितीचे अचूक विश्लेषण करून व्यावहारिक भूमिकेवरून त्यांवरती उपाययोजना करण्याचे बुद्धिसामर्थ्य आपण कमवायला हवे, याची त्यांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली आणि समोर असलेली इतर प्रलोभने दूर सारून, एक क्षणभरही यापुढे वाया घालवायचा नाही या निर्धाराने त्यांनी अध्ययनाला सुरुवात केली. इंग्रजी आणि पर्शियन भाषा घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी. ए. झालेल्या आंबेडकरांनी अमेरिकेत एम्. ए. साठी अर्थशास्त्र, सामाजिक व राजकीय शास्त्रे, मानववंशशास्त्र आणि तत्त्वज्ञान हे विषय निवडले.

हे सर्वच विषय आंबेडकरांना नवीन होते, परंतु त्यांनी चिकाटीने रात्रीचा दिवस करून त्यांचा पाठपुरावा केला. प्रोफेसर सेलिग्मन व प्रो. गोल्डवेजर हे त्यांचे आवडते प्राध्यापक होते आणि आपल्या अविरत अभ्यासाने आंबेडकरांनी त्यांचे प्रेम संपादन केले होते. शिष्यवृत्तीच्या रूपाने मिळणारा पैसा जेमतेम पुरेल इतकाच होता आणि त्यातील काही अगदी तुटपुंजी रक्कम ते मुंबईस पत्नीकडे संसारासाठी पाठवून अतिशय काटकसरीने राहत. दोन वेळचे साधेसुधे जेवण आणि दोन वेळचा चहा या व्यतिरिक्त त्यांना काहीही खर्च करता येत नसे. पोटात भुकेचा डोंब उसळलेला असे. बरोबरीचे सहाध्यायी उपाहारगृहांतील चमचमीत खाद्यवस्तूंवर व मद्यांवर तुटून पडत. परंतु ज्ञानयज्ञाचे व्रत घेतलेला हा तरुण शेकडो पुस्तके वाचून त्यांची टिपणे काढण्यात सदैव गर्क होता. अमेरिकेत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे जिणे मोठे खडतर असते. प्राध्यापक व्याख्यानबाजी करण्याऐवजी फक्त मार्गदर्शनापुरते बोलून दर आठवड्याला वाचण्यासाठी संदर्भ ग्रंथांची एक भली मोठी यादी देतात. ती सर्वच्या सर्व पुस्तके वाचून आठवडा संपायच्या आतच पुन्हा नव्या पुस्तकांची यादी मागावयास जाणारा आंबेडकरांसारख्या ज्ञानपिपासू विद्यार्थी भेटल्यावर कोणत्या प्राध्यापकास आनंद होणार नाही! मुंबईत असताना दिवसाला दोन-चार तासांतच अभ्यासाला कंटाळून खेळाच्या मैदानावर धाव घेऊ इच्छिणारे आंबेडकर अमेरिकेत १७।१८ तास नियमितपणे अभ्यास करीत होते, ते केवळ ध्येयप्रवणता आणि आत्यंतिक तळमळीच्या सामर्थ्यावरच नव्हे काय?

दोन वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर आंबेडकरांनी एम्. ए. च्या पदवीसाठी 'प्राचीन भारतातील व्यापारपद्धती' हा प्रबंध सादर केला आणि भारतातील जातियतेसंबंधाने आपल्या प्राध्यापकांसमोर एक महत्त्वाचा निबंध वाचला. लवकरच त्यांनी आपल्या अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा परिपाक म्हणून भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाबद्दलचा अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेला प्रबंध पीएच्. डी.च्या पदवीसाठी सादर केला.

कोलंबिया विद्यापीठाने त्यांच्या परिश्रमाचे व विद्वत्तेचे चीज केले आणि त्यांनी एम्. ए. आणि पीएच् डी. ह्या पदव्या मोठ्या सन्मानाने बहाल केल्या.

महार समाजातील मॅट्रिक झालेला, बी. ए. झालेला तरुण म्हणून त्यांच्या वडिलांच्या हयातीत त्यांचे मुंबई येथे सत्कार झालेले होते, परंतु अमेरिकेतील सर्वोच्च पदव्या मिळविणाऱ्या या पहिल्या महार तरुणाचे कौतुक करण्यासाठी, त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारण्यासाठी आता त्यांचे वडील हयात नव्हते. त्या पदव्यांचा स्वीकार करताना आंबेडकरांना आपल्या कर्तव्यकठोर वडिलांचे स्मरण होत होते आणि सारखे डोळे भरून येत होते.

अमेरिकेच्या वास्तव्यात अमेरिकेच्या घटनापद्धतीने आंबेडकरांना चांगलेच अस्वस्थ केले होते. स्वतंत्र हिंदुस्थानात, स्वतंत्र हिंदुस्थानच्या लोकांनी तयार केलेले, समता, स्वातंत्र्य व बंधुता यांवर आधारलेले आणि भारतातील दलितांच्या दुःखांचा परिहार करून त्यांना 'माणूस' म्हणून जगू देणारे घटनेने बहाल केलेले हक्क उपभोगित असलेला स्वतंत्र हिंदुस्थान त्यांच्या डोळ्यांसमोर सदैव नाचत असे. हे स्वप्नच राहील का ? ते स्वतःशीच विचारीत

'छे, स्वप्नच कसे राहील ? मग माझ्यासारख्या सुशिक्षित तरुणांच्या आयुष्याला अर्थच काय राहिला ?' ते स्वतःशीच त्वेषाने म्हणत.

आंबेडकरांच्या अमेरिकेच्या वास्तव्यातच तेथील निग्रो लोकांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी शांततापूर्ण आणि सनदशीर मार्गाने प्रचंड चळवळीची आघाडी उघडणाऱ्या आणि त्यांना माणुसकीचे हक्क प्राप्त करून देणाऱ्या बुकर टी. वॉशिंग्टनचे १९१५ मध्ये निधन झाले. त्याच्या जीवनापासून आंबेडकरांना घेण्यासारखे खूपच होते आणि त्याच्या जीवनाचा बारकाईने अभ्यास करून भारतात परतल्यानंतर जे काही करावयाचे त्याची स्पष्ट अशी रूपरेषा त्यांनी मनाशी योजून ठेविली होती.

अमेरिकन विद्यापीठातील महत्त्वाची विद्या हस्तगत केल्यानंतर साह-

जिकच इंग्लंड व जर्मनीतील विद्यापीठांतून अभ्यास करण्याची ते मनीषा बाळगू लागले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी अमेरिकेत राहून हालचाली करणारे प्रख्यात क्रांतिकारक श्री. लाला लजपतराय आंबेडकरांच्या बुद्धिमत्तेने प्रभावीत होऊन त्यांना आपल्या गदर पार्टीकडे वळविण्यासाठी त्यांच्याकडे आले होते.

' आपण अभ्यास करण्यासाठी येथे आलो आहोत आणि मिळालेल्या संधीचा उपयोग अगोदर आपण अभ्यासाकडे करणार आहोत. आपल्या देशाचे स्वातंत्र्य आपल्यालाही तुमच्या इतकेच प्रिय आहे, परंतु देशस्वातंत्र्या-साठी क्रांतिकारक चळवळीपेक्षाही आजच्या नव्या युगाचे नवे ज्ञान हस्तगत करणे आवश्यक आहे, ते हस्तगत करणे आपले आद्य कर्तव्य आहे. ते मी हस्तगत करीन आणि मग माझ्या देशात जाऊन माझ्या दलितबांधवांच्या उद्धाराचे कार्य हाती घेईन, ' असे त्यांनी मोठ्या निर्धाराने सांगितले.

प्रा. सेलिग्मन आणि लाला लजपतराय यांचे मित्रत्वाचे संबध होते. परंतु आंबेडकरांची ज्ञानजिज्ञासा आणि प्रखर कर्तव्यनिष्ठा यांचे त्यांना अगदी जवळून दर्शन घडले होते. आंबेडकरांच्या निर्णयामुळे त्यांना वाईट वाटण्या-ऐवजी उलट आनंदच झाला.

' मिस्टर आंबेडकर, तुमच्यासारखे जिज्ञासू आणि कर्तव्यनिष्ठ विद्यार्थी फारच थोडे असतात. तुमच्या ध्येयाचा मार्ग अगदी खडतर व जबाबदारीचा आहे. मी तुमच्यासाठी शक्य असेल ते जरूर करीन. ' ते म्हणाले.

' सर, मला लंडनच्या अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेत संशोधन करून पदवी मिळवायची आहे. त्याचबरोबर कायद्याचाही अभ्यास करायचा आहे. लंडन आणि जर्मन विद्यापीठांच्या पदव्या हस्तगत करायची माझी मनीषा आहे.'

' तू जरूर लंडनला जा. मी प्रा. वेब यांच्यासाठी शिफारस पत्र देऊन ठेवतो. '

आणि प्रा. सेलिग्मन यांचे शिफारस पत्र घेऊन त्यांनी आपले ज्ञानरूपी अग्निहोत्र सदैव प्रज्वलित ठेविण्याच्या प्रतिज्ञेने लंडनला प्रयाण केले.

लंडनला जाऊन त्यांनी आपल्या जवळचे शिफारस पत्र तेथील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सिडने वेब यांना दाखविले.

' प्रा. सेलिग्मन यांनी तुमची इतक्या मुक्त कंठाने शिफारस केली आहे की त्यामुळे तुमच्यासारख्या विद्यार्थ्याला आमच्या संस्थेत सर्व तऱ्हेच्या सोई

उपलब्ध करून देण्यास आनंदच होईल ' प्रा. वेब म्हणाले आणि आंबेडकरांनी पुन्हा पूर्वीच्याच तडफेने अभ्यास करावयास सुरुवात केली. आपल्या जवळच्या मर्यादित रकमेमुळे त्यांनी अतिशय स्वस्त अशा एका खाणावळीत आपल्या राहण्याजेवण्याची सोय केली आणि ते पुन्हा एकदा पुस्तकांमध्ये गढून गेले. त्यांना तेथे प्रचंड प्रमाणात दुर्मिळ साधने आणि दुर्मिळ ग्रंथ मिळाले आणि त्यांनी त्यांच्यावर गरुडासारखी झडप घातली.

अमेरिकेतील त्यांच्या यशाने सयाजीरावांनी त्यांची शिष्यवृत्ती आणखी एका वर्षासाठी वाढविली होती तरी दरबारातील काही विघ्नसंतोषी कारवायाखोरांच्या पोटांत दुखू लागले होते. त्यांनी शिष्यवृत्ती संपली असून ताबडतोब दरबारच्या नोकरीत रुजू होण्यासाठी दरबाराकडून त्यांना पत्र पाठविण्यात यश मिळविले.

हे पत्र पाहून आंबेडकर निराश झाले. त्यांनी तशा निराश मनःस्थितीत आपले प्राध्यापक एडविन कॅनन यांची भेट घेतली. कॅनन यांच्या खटपटीने त्यांचा प्रबंध भारतात राहून चार वर्षांत पुरा करण्याची त्यांना खास परवानगी मिळाली. आंबेडकरांनी अमेरिकेत मोठ्या प्रमाणात जुनी पुस्तके खरेदिली होती. आता लंडनमधून जुन्या पुस्तकांच्या दुकानांतून त्यांनी बरीच पुस्तके विकत घेतली. आपले सर्व सामान थॉमस कूक आणि कंपनीच्या त्यांनी हवाली केले आणि त्यांना ते मुंबईस पाठवावयास सांगून लगेच निघणाऱ्या बोटीने मुंबईस निघाले.

इकडे आंबेडकर मुंबईस परतणार म्हणून त्यांच्या घरी मोठ्या उत्साहाचे वातावरण पसरले आणि त्यांच्या घरचे लोक त्यांच्या आगमनाची वाट पाहू लागले. परंतु लंडनहून मुंबईस येणारी बोट भूमध्यसमुद्रात बुडल्याची वार्ता ऐकून इकडे घरात दुःखाचा हलकल्लोळ माजला.

नियती आंधळी होती, परंतु तिलाही काही औचित्याने भान होते, कारण बुडालेल्या बोटीत आंबेडकरांचे सामान व पुस्तके होती आणि आंबेडकर दुसऱ्या बोटीने सुखरूपपणे येत होते.

आंबेडकर १९१७ च्या ऑगष्ट महिन्यात मुंबईस आले आणि आपल्या पुस्तकांची हकीकत ऐकून चितागती होऊन पायातले बळ गेल्यासारखे क्षणभर मटकन खालीच बसले.

पण क्षणभरच...

पुस्तकांच्या आठवणींनी उसासे टाकीत ते पहिल्या दिवशी आपल्या खोलीत बसून राहिले. आता त्यांना गायकवाड सरकारच्या नोकरीवर रुजू व्हायचे होते, परंतु बडोद्यापर्यंत पोचायचे कसे ? साध्या तिकिटासाठीही खिशात दमडी शिल्लक राहिली नव्हती.

' काय करावे ? ' या प्रश्नाने त्यांना भंडावून सोडले. आपल्या पतीसाठी रमाबाईंनी कौतुकाने केलेले गोडधोड त्यांच्या घशात उतरेना.

आणि चार आठ दिवसांतच थॉमस कुक आणि कंपनीने नुकसान-भरपाईदाखल सहाशे रुपये त्यांना पाठवून दिले.

' ए सुडक्या, ए मक्या. ' त्यांनी आनंदाने हाक मारली. मुले धावतच आली. ' तुमच्या आयांना बोलवा. '

साहेबांच्या ओरडण्याने बायका बाहेर आल्या. आपल्या प्रवासासाठी काही रक्कम ठेवून त्यांनी बाकीचे पैसे रमाबाईंच्या हातावर ठेवले.

' आता पोरांसाठी काही गोडधोड करा बघू...'

परंतु पुढच्याच क्षणी त्यांचा आवाज कातर झाला होता.

—त्या आपल्या लाडक्या पुस्तकांच्या जलसमाधीच्या कल्पनेने....

* * *

मराठी ग्रंथ ... , ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम २०००७ वि: ...
... २३४ ... ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 94258
ग्रंथ संख्या (स्थल प्रत)

# ३. दलितांचा परमेश्वर

अमेरिकेतून डॉक्टर होऊन आलेल्या आंबेडकरांची लंडनमधील अभ्यासक्रम पुरा करण्याची मनीषा अपुरी राहिली आणि त्यांना बडोदे सरकारच्य अर्थखात्यात नोकरी पत्करावी लागली.

आपण दिलेल्या शिष्यवृत्तीचा इतका चांगला उपयोग करणारा विद्यार्थी आणि तोही अस्पृश्य निघालेला पाहून सयाजीराव महाराजांना अतिशय आनंद झाला आणि या तरुणाला बडोदे संस्थानच्या अर्थमंत्रिपदाची जागा द्यावी असे त्यांना वाटू लागले. त्यांचे हे विचार ऐकून दरबारातील सनातनी-मंडळी मात्र चांगलीच हादरली.

'महाराज, हा तरुण अननुभवी आहे. त्याला अनुभव मिळेपर्यंत अर्थ खात्यात नोकरी करू द्यावी' अशी नम्र व मानभावी सूचना पुढे आली आणि त्याप्रमाणे अर्थमंत्री होण्याऐवजी त्यांना अर्थखात्याच्या सनातनी वातावरणात जाऊन पडावे लागले.

आणि मग हळूहळू सनातन्यांच्या कारवायांना सुरुवात झाली.



'अरे, या महाराला राहावयास जागा कोणी दिली ?'

— मग तेथे ह्या तरुणाला जिणे नकोसे करून टाकण्याची धडपड सुरू झाली. ऑफिसात कोणाचे सहकार्य नाही, सहानुभूती नाही, प्रेम नाही अशा अवस्थेत तरुण आंबेडकर एकटे काम करू लागले.

आणि एके दिवशी ऑफिसला जाण्यापूर्वी ते राहत होते, त्या पारशी लोकांनी हातात लाठ्याकाठ्या घेऊन त्यांना अडविले.

'तू कोण आहेस हे खरे सांग !'

'मी एक सुशिक्षित हिंदू आहे !'

'ह्याट, तू एक अस्पृश्य आहेस, महार आहेस. हिंदू लोक तुझी सावलीही अंगावर घेत नाहीत. तू आमच्या धर्मशाळेत राहून आमची पवित्र जागा बाटविली आहेस !'

'बाबांनो !...मी अमेरिकन विद्यापीठाचा पदवीधर आहे...'

'ते काही नाही. आताच्या आता ही जागा तू खाली कर...'



आणि त्या मानी, महत्त्वाकांक्षी, उमद्या तरुणाला भर उन्हात आपले सगळे सामान बाहेर काढून एका झाडाखाली अश्रू गाळीत बसावे लागले. सयाजी महाराजांच्या कानावर या गोष्टी घालता येत नव्हत्या, कारण त्यांची भेट होणे मुष्किल होते.

अशा परिस्थितीत सावत्र आई मुंबईस आजारी असल्याची तार आली. पहिल्या बायकोच्या निधनानंतर रामजीबावांनी दुसरा विवाह केला होता. लहानग्या भिवाला त्यावेळी ते आवडले नव्हते. परंतु सावत्र असली तरी ती ' आई ' होती. डॉ. आंबेडकर तातडीने मुंबईस आले.

मुंबईस पुढची संकटे वाढून ठेविली होती. आल्यानंतर थोड्याच दिवसांत सावत्र आईचे निधन झाले आणि पाठोपाठ त्यांचा आवडता थोरला भाऊ आनंदराव हाही मुळव्याधीने अचानक मरण पावला.

आता बडोद्यास परत जाण्यास काही अर्थ नव्हता. तेथे राहण्यास जागा मिळणे शक्य नव्हते. केळुसकरांनी खूप प्रयत्न करून पाहिले परंतु शेवटी काहीच जमले नाही आणि आंबेडकरांनी आपल्या जागेचा राजीनामा देऊन टाकला.

इकडे आंबेडकर दुःखसागरात बुडून गेले असताना मुंबईमध्ये काँग्रेस–समितीतर्फे अस्पृश्यांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी दोन मोठ्या सभा भरल्या होत्या. आंबेडकरांना त्यांमध्ये विशेष ' रस ' वाटला नाही. अस्पृशांची दुःखे अस्पृश्येतर समाजाला कधीच समजणार नाहीत. निव्वळ सभा–भाषणांनी, अर्ज विनंत्यांनी आणि लेखांनी हे कार्य होणार नाही. अस्पृश्यांच्या मोहल्ल्यांत हिंडून त्यांच्यासाठी काही कार्य करण्याच्या पोकळ मलम-पट्ट्यांनीही काहीही होणार नाही असे त्यांना वाटत होते.

आणि अद्याप त्यांचा अभ्यासक्रमही पुरा झाला नव्हता. तो पुरा केल्या-खेरीज, कायदा आणि अर्थशास्त्र यांचा बारकाईने अभ्यास करून आपली ज्ञान–जिज्ञासा पुरी केल्याखेरीज आणि अस्पृश्यांच्या जीवनाशी संबधित अशा विषयांचा सर्वांगीण अभ्यास आपण केला, असे समाधान जोपर्यंत आपणाला वाटत नाही, तोपर्यंत आपण मनाशी योजलेल्या कार्याला वाहून घेण्यात मनाला रुखरुख लागेल असे त्यांना वाटत होते.

आणि म्हणूनच त्यांनी मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजात अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाची जागा रिकामी होती, ती स्वीकारली व आपला अभ्यासक्रम

पुरा करण्यासाठी पैसा कसा गोळा करता येईल, यासाठी ते धडपड करू लागले.

सिडनेहॅम कॉलेजात आंबेडकर नावाचे महार प्राध्यापक शिकवितात, हा त्यावेळी शहरात चर्चेचा विषय होता; आणि सुरुवातीला ' हा महारडा काय शिकविणार! ' या उपेक्षेच्या बुद्धीने काही थोडेच विद्यार्थी त्यांच्या तासाला बसत. परंतु अस्खलित इंग्रजी वाणी, आपल्या विषयावरचे असाधारण प्रभुत्व आणि प्रभावी वक्तृत्व या गुणांनी लवकरच त्यांनी तेथे विद्यार्थ्यांची मने काबीज केली. त्यांचे वर्ग तुडुंब भरून जाऊ लागले कारण बाहेरचे विद्यार्थीही त्यांच्या तासाला येऊन बसू लागले.

इकडे प्राध्यापक म्हणून काम करीत असतानाच दलितांच्या अन्यायांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये जागृती निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या प्रेरणेने ' मूकनायक ' हे पत्र सुरू करण्यात आले. आंबेडकरांनी आपल्या जमातीचे ' मन ' त्यातून प्रकट करावयास सुरुवात केली.

उच्च शिक्षणाने आंबेडकरांच्या मनात महत्त्वाकांक्षा निर्माण झाली तरी त्यांना ह्या शिक्षणाने एक क्षणभरही त्यांच्या समाजापासून दूर नेले नाही, त्यांच्याबद्दलची अढी वा घृणा त्यांच्या मनात केव्हाही निर्माण झाली नाही. आंबेडकरांच्या असाधारण यशाचे रहस्य त्यांच्या या वृत्तीत आहे. आपण महार जातीत जन्माला आलो आणि आपण 'दलित' आहोत. आपल्या एकट्याचा उद्धार, हा स्वार्थी विचार त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही. भारतातील खेडोपाडी गुलामगिरीत अत्यंत मानहानीचे व सत्वहीन जिणे जगत असलेल्या आपल्या दलित बांधवांचा सर्वांगीण उद्धार झाल्याखेरिज आपल्याला समाधानाने झोप घेण्याचा अधिकार नाही, ही त्यांची भावना होती आणि अमेरिकेत त्यांनी खडतर अभ्यासाने जे साध्य करून घेतले होते, त्यामुळे त्यांच्यातील सुप्त स्वाभिमान पूर्णपणे जागा झाला होता. त्यांच्या या महत्त्वाकांक्षी व मानी मनाला आता प्रकर्षाने जाणवू लागले होते की, आपण आपल्या बुद्धिमत्तेने या दलितांच्या मनामध्ये एका नव्या क्रांतीचे बीज पेरू शकू. ते पेरण्यासाठी त्यांच्याबद्दलची निव्वळ कोरडी सहानुभूती आणि भाबडी करुणा असून भागणार नाही. त्यांच्याच जातीत जन्माला येऊन त्यांची सुखदुःखे खऱ्या अर्थाने ज्यांनी अनुभविली नाहीत, त्यांना त्यांच्या उद्धाराचे कार्य करण्यासाठी आणि हजारो

वर्षांच्या त्यांच्या दास्यातून त्यांना मुक्त करण्यासाठी जे मानसिक सामर्थ्य आवश्यक आहे, ते मिळणार नाही.

आणि ते सामर्थ्य आपल्याजवळ आहे. ते भाग्य आपल्याला लाभलेले आहे आणि आपणच हे ऐतिहासिक कार्य करून दाखवू हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये दुणाऊ लागला.

ह्या आत्मविश्वासाची पहिली झलक माण तालुका येथे व नागपूर येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदांतून त्यांनी केलेल्या भाषणांत दिसून येते.

या ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांना संघटित होण्याचा महामंत्र दिला आणि अस्पृश्यांसाठी अस्पृश्येतर कार्यकर्त्यांनी चालविलेल्या कार्यांतील अपुरेपणा स्पष्ट केला. जणू काही अशा सर्व कार्यकर्त्यांना ते म्हणत होते....

'बावांनो, आम्ही तुमचे आभारी आहोत, परंतु क्षमा करा. स्पष्ट बोलतो की, तुम्हांला आमचे 'मन' कळायचे नाही. आम्हांलाच आमच्या उद्धाराचे कार्य करायला हवे. तुमच्या बेगडी सुधारणांनी आम्हांला आमचे हक्क मिळण्याची शक्यता नाही...'

माण व नागपूर येथे भरलेल्या या दोन्ही अस्पृश्यांच्या परिषदांना कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपती हजर होते, त्यांनी बोलताना एकदा मोठी सूचक भविष्यवाणी उच्चारली. ते म्हणाले,

'माझ्या दलित बांधवांनो, तुम्हांला या तरुण डॉ. आंबेडकरांच्या रूपाने तुमचा परमेश्वर भेटला आहे. तो तुमच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकील; इतकेच नव्हे तर.. माझे मन तर मला आजच सांगते की, भविष्यकाळात दलितांचा उद्धारकर्ता म्हणून, हिंदुस्थानातील एक मोठा पुढारी म्हणून हा तरुण जगाच्या इतिहासात मोठी क्रांती करील...'

एकीकडे आपल्या राजकीय जीवनास प्रारंभ करावा, असे वाटत असताना दुसरीकडे आपला अभ्यासक्रम पुरा झाल्याखेरीज या संग्रामात उडी घ्यायचे नाही, असे त्यांचे मन सांगत होते...

आंबेडकर हे जातिवंत विद्वान होते, ज्ञानाचे सदैव भुकेले होते. असा माणूस ज्ञानप्राप्तीसाठी वाटेल ते दिव्य करायला तयार होतो आणि म्हणूनच या खेपेस कोणाचा आधार नसताना स्वतःच्या जबाबदारीवर परत एकदा लंडनला जाण्याची आंबेडकर तयारी तयारी करू लागले. त्यांनी पगाराचे पैसे काळजीपूर्वक साठविले होते, नवीन झालेल्या शाहू महाराजांच्या ओळखी-

मुळे त्यांच्याकडून पाच हजार रुपयांचे कर्ज मिळविण्यात त्यांनी यश मिळविले व इतरही काही मित्रांकडून काही रक्कम कर्जाऊ घेऊन १९२० मध्ये परत लंडनच्या विद्यापीठात ते दाखल झाले पुन्हा एकदा एखाद्या तपस्व्याप्रमाणे त्यांची ज्ञानसाधना सुरू झाली. जवळ पैसा अपुरा होता म्हणून त्यांनी एका स्वस्त खानावळीत आपला बिस्तरा टाकला. त्या खानावळीची मालकीण म्हणजे एक भयंकर बाई होती. सकाळी उठल्याबरोबर न्याहारीसाठी ती स्वस्तातल्या स्वस्त अशा पावाचे दोन तुकडे आणि कपभर चहा देई. ती न्याहारी घेऊन आंबेडकर लंडन म्युझियमच्या ग्रंथसंग्रहालयाकडे धाव घेत. बहुतेक वेळेस ग्रंथालय सुरू होण्यापूर्वी ती उघडण्याची वाट पाहात हातात पुस्तक घेऊन बसलेली व्यक्ती आंबेडकर हीच असावयाची आणि रात्री ग्रंथालयाचे सर्व दरवाजे बंद झाल्यानंतर ‘ महाशय, आता वेळ संपली ’ असे सांगण्यास शिपाई आला म्हणजे मग आंबेडकर आपल्या समाधीतून जागे होत.

त्या खानावळीतले रात्रीच्या वेळेस मिळणारे जेवळ असेच अपुरे व स्वस्त असे. पैसे वाचविण्यासाठी ते दुपारचे जेवण घेत नसत. त्यामुळे आंबेडकरांना भूक अस्वस्थ करी, भुकेने आतडी कुरतडली जात आहेत, असा सारखा अनुभव येई परंतु एकदा पुस्तकांत त्यांनी लक्ष घातले की भूक कुठल्याकुठे पळून जाई.

ब्रिटिश म्युझियम ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथांबरोबरच विद्यापीठ ग्रंथालय, भारतीय कचेरी ग्रंथसंग्रहालय येथील अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र आंबेडकर अवलोकीत.

आंबेडकरांनी वर्षभराच्या खडतर अभ्यासानंतर ब्रिटिश-भारतातील अर्थकारणाबद्दलचा आपला प्रबंध सादर केला आणि त्यांना ‘ डॉक्टर ऑफ सायन्स ’ ही पदवी बहाल करण्यात आली. कायद्याचा अभ्यास करून त्यांनी परीक्षा दिली आणि ते ‘ बॅरिष्टर ’ झाले. ‘ रुपयाचा प्रश्न ’ या विषयावर त्यानी आणखी एक प्रबंध लिहून लंडन विद्यापीठाला सादर केला. परंतु त्यातील स्वतंत्र व स्वातंत्र्यप्रिय दृष्टिकोन परीक्षकांस रुचला नाही म्हणून त्यांना तो पुन्हा लिहून सादर करण्यात सांगण्यात आले. हे कार्य भारतात येऊन करण्यासारखे होते, म्हणून त्यांनी पुन्हा एकदा जुन्या पुस्तकांच्या दुकानांतून हिंडून दुर्मिळ व महत्त्वाची पुस्तके खरेदी केली आणि १९२३ च्या एप्रिल महिन्यात ते मुंबईस परत आले.

मुंबईत आल्यानंतर सिडनेहॅम कॉलेजच्या प्राचार्यपदाची जागा मोकळी होती, परंतु ती त्यांना मिळू शकली नाही. त्यांच्याएवढ्या योग्यतेची आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी तुल्यबल अशी दुसरी कोणती व्यक्ती नसतानाही त्यांना ती जागा मिळू शकली नाही. कारण आंबेडकर अस्पृश्य होते ही राज्यकर्त्यांच्या दृष्टीने मोठी अडचण होती.

वकिली करावी म्हटले तर सनद काढण्यापुरताही पैसा त्यांच्याजवळ नव्हता. त्यांच्या हितचिंतकांनी, मित्रांनी व चाहत्यांनी ती नड भागविली व आंबेडकर वकिली करू लागले. तेथेही सुरुवातीस ‘ महार ’ म्हणून त्यांना कामे मिळण्यात सारख्या अडचणी येत.

आता आंबेडकरांनी दलितांच्या कल्याणासाठी स्वतःला वाहून घ्यावयाचे ठरविले. ते दलितांच्या मोहल्ल्यात राहत होते, त्यांची सुखदुःखे पाहत होते, अनुभवीत होते आणि ऐकत होते. त्यांच्या दुःखविमोचनासाठी त्यांनी म्हणून ‘ बहिष्कृत हितकारिणी सभे ’ची स्थापना १९२४ च्या जुलै महिन्यात केली.

भारतातील अस्पृश्य समाज हा हिंदुधर्माचा एक घटक मानला जात असला तरी वर्णव्यवस्थेमुळे त्याला गुलामगिरीशी कायमचे जखडून त्याच्यावर हजारो वर्षे ‘ अन्याय ’ लादला गेला आहे. माणसाची योग्यता त्याच्या जन्मावरून ठरविण्याच्या या भयंकर प्रकाराविरुद्ध आवाज उठवून स्वावलंबनाने व आत्मिक सामर्थ्याने स्वतःची उन्नती करून घेण्याची प्रेरणा देण्यासाठी या सभेची स्थापना आंबेडकरांनी केली. हे कार्य दलित समाजातून पुढे आलेल्या व्यक्तीच चांगल्या तऱ्हेने करू शकतील ही श्रद्धा त्या सभेच्या कल्पनेमागे होतीच. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संग्रामात उडी घेण्यापेक्षा या कार्यासाठी रान उठविण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आंबेडकरांनी घेतला.

दलितांच्या अंतःकरणांत स्वाभिमानाचे, अस्मितेचे तेज पसरविण्याच्या कार्याला आंबेडकरांनी सुरुवात केली. अर्थातच या कार्यासाठी त्यांचे लक्ष मोठ्या प्रमाणात ‘ महार ’ समाजावरच केंद्रित झाले होते. महार समाजामध्ये निष्ठा होती, बुद्धि होती आणि संधी मिळाल्यास या गुणांचा विकास करून घेण्याची महत्त्वाकांक्षाही होती. ब्रिटिशांच्या पलटणीत त्यांनी महत्त्वाचे कार्य केले होते, परंतु १८९० नंतर त्यांना लष्करप्रवेशाची द्वारे सरकारने बंद केली होती आणि त्याविरुद्ध आवाज उठविण्याची धडपड हा समाज गेली तीस वर्षे करीत होता. खेडोपाडी दौरे काढून आंबेडकरांनी हा समाज चांगला ढवळून

काढला आणि भावी संघर्षाची, चळवळीची सिद्धता केली.

१९२७ च्या सुरुवातीला मुंबईच्या गव्हर्नरांनी आंबेडकरांना मुंबईच्या कायदेकौन्सिलवर नियुक्त केले आणि त्या नियुक्तीमुळे आंबेडकरांना एक नवा हुरूप आला. आता अस्पृश्यांनी आपल्या हक्कांची अंमलबजावणी करण्याची वेळ जवळ आली असे त्यांना वाटू लागले. १९२३ मध्ये मुंबई येथील भंडारी समाजाचे पुढारी रावबहादूर बोले यांनी सार्वजनिक पाणवठे सर्वांना खुले ठेविण्याचा ठराव कौन्सिलमध्ये मांडून मोठ्या जिद्दीने तो १९२६ मध्ये पास करून घेतला होता. कायदा झाला तरी त्याची अंमलबजावणी होत नव्हती. आंबेडकरांनी १९ व २० मार्च १९२७ मध्ये महाडला कुलाबा जिल्ह्यातील अस्पृश्य समाजाची परिषद बोलावली आणि तेथील चवदार तळ्यावर हा आपला हक्क बजावण्याचे ठरविले.

आंबेडकरांच्या असाधारण विद्वत्तेने आणि त्यांच्या तळमळीने आपल्याला वाली भेटला आहे, अशी त्या समाजाची खरोखर धारणा झाली होती आणि त्यामुळे हजारोंच्या संख्येने दलितवर्ग आजूबाजूच्या खेड्यांतून महापुराप्रमाणे तेथे लोटला होता.

विद्वत्तेच्या आणि ध्येयनिष्ठेच्या तेजाने तळपत असलेल्या तरुण आंबेडकरांनी आपल्या ओजस्वी भाषणाने दलितांच्या अंतःकरणात स्वाभिमानाची ठिणगी पेटविली आणि उत्साहाच्या भरात १५००० हजार लोकांचा मोर्चा चवदार तळ्याकडे निघाला.

तळ्याभोवती दाटीवाटीने उभ्या असलेल्या हजारो अनुयायांच्या साक्षीने आंबेडकरांनी त्या तळ्यातील पाण्याला स्पर्श केला आणि त्यांनी ओंजळीने पाण्याचा पहिला घोट घेतला...

जमलेल्या हजारो दलितांनी ते दृश्य आपल्या अंतःकरणात कायमचे कोरून ठेविले, त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रू ओघळू लागले.

तो पावनतेचा पहिला स्पर्श ! ती अपूर्व अनुभूती !! जी त्यांच्या पूर्वजांनी हजारो वर्षे अनुभविली नव्हती.

आणि हजारो वर्षांच्या त्यांच्या पददलित जीवनात, युगायुगातून कधी तरी जन्माला येणारा तो त्यांचा नेता...

'डॉ. आंबेडकर की जय' या गगनभेदी उद्घोषाने सारे वातावरण भरून गेले.

* * *

# ४. हिमालयासम अमुचा नेता

परंतु त्या जलदेवतेच्या पवित्र स्पर्शाचा आनंद फार वेळ टिकला नाही. डॉ. आंबेडकरांच्या रूपाने आपणाला मुक्तिदाता भेटला, आता आपली दुःखे, आपल्यावरील अन्याय बघता बघता दूर होतील. आपण आपल्या गावी गेल्यानंतर घरोघरी या नव्या देवदूताचा संदेश पोराबाळांना सांगू, गावकऱ्यांना सांगू, अशा आनंदात मंडळी इतःस्तता पांगली. कोणी गावात हिंडून यायला निघाले, कोणी मंडपात भाकऱ्यांची गाठोडी सोडून बसले आणि कोणी बसल्या बसल्या डुलक्या घेऊ लागले.

इतक्यात चहूबाजूंनी लाठ्यांकाठ्यांचा वर्षाव झाला.

'हरामखोरांनो धर्म बुडवायला निघाला काय. माजलात काय लेको ..'

आणि बघता बघता भूमीवर रक्त सांडले. डोकी फुटली, फाटक्या पैरण्यांतून आणि मुंडासांतून बाहेर दिसणाऱ्या उघड्याबागड्या शरीरांवर असंख्य वळ उठले आणि सगळीकडे एकच हलकल्लोळ उडाला. गावातून हिंडणाऱ्या छोट्यामोठ्या टोळक्यांना नाक्यानाक्यांवर अडवून सडकून काढण्यात आले.




चवदार तळ्यानंतर ही सर्व मंडळी गावातल्या वीरेश्वराच्या देवळात शिरून ते महाजागृत आणि पवित्र स्थान बाटविणार आहेत, या अफवेने संतप्त झालेल्या सनातन्यांनी एकत्रित येऊन आपला सारा संताप अशा रीतीने दलितांच्या अंगावर ओकायला सुरुवात केली होती.

अस्पृश्यांचे काही प्रतिनिधी पळतच डॉ. आंबेडकरांकडे गेले. त्यांपैकी काहींच्या डोळ्यांत रक्त चढले होते. 'साहेब, फक्त तुम्ही परवानगी द्या. आम्ही या गोष्टीचा बदला घेतो. रस्त्यावर मुडदे पाडतो.'

घडलेल्या दुर्घटनेने व्याकुळ झालेल्या आंबेडकरांच्या डोळ्यात क्षणभर संताप तरळून गेला परंतु दुसऱ्याच क्षणी त्यांना आपल्यावरच्या प्रचंड जबाबदारीची जाणीव झाली.

'बाबांनो, आपल्याला नेमके तेवढेच करायचे नाही. संयमाने आणि शांततेने सगळे घ्यायला हवे. चुकूनही कोणावर हात उचलू नका. माझी शपथ आहे तुम्हांला.'



आणि या आपल्या नव्या नेत्याच्या व्यक्तिमत्त्वातील संयमाचा, शहाणपणाचा अमृतोपदेश मनी साठवून ते सारे प्रतिनिधी घरोघर पांगले. इकडे काही दिवसांनी महाडच्या सनातनी हिंदूंनी हिंदुधर्मरीतीनुसार वैदिक मंत्रांच्या उद्घोषांनी चवदार तळे शुद्ध करून घेतले आणि म्युनिसिपालिटी-मध्ये यापुढे अस्पृश्यांना हा तलाव खुला नसल्याचा ठरावही पास करून घेतला.

ही बातमी आंबेडकरांना मुंबईत समजली तेव्हा ते अतिशय अस्वस्थ झाले.

'माझ्या दलित बंधूंनो, महाडच्या घटनांनी आपल्या सर्वांचा घोर अपमान केला आहे. आपण सर्वांनी या अपमानाविरुद्ध उठाव केला पाहिजे. त्यासाठी डिसेंबर महिन्याच्या २५–२६ तारखेस महाडला मोर्चा न्यायचा व तेथे सत्याग्रह करायचा असे आम्ही ठरविले आहे. दऱ्याखोऱ्यांतून खेड्यापाड्यांतून त्या दिवशी महाडकडे चला....' त्यांनी आदेश दिला.

आणि त्यांच्या हाकेला चोहोकडून प्रचंड साद मिळाला. २५ डिसेंबरला महाडला एका महाजत्रेचे, कुंभमेळ्याचे स्वरूप आले. बरोबर भाकऱ्या बांधून लांबलांबून लोक अनवाणी चालत येत होते. बघता बघता आपल्या नव्या नेत्याच्या मागून सत्याग्रहात उडी घेण्यासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी पसरल्या.

परंतु तिकडे सनातन मंडळीही गप्प बसली नव्हती. त्यांनी 'चवदार तळे हे खाजगी मालकीचे आहे,' या सबबीवर कोर्टाकडून मनाई हुकूम मिळविला.

'त्या हुकुमाचा भंग करून आपण पाणी भरू या' जमलेल्या जमावाने उत्साहाने तयारी दर्शविली. परंतु आंबेडकर हे जातिवंत कायदेपंडित होते. त्यांनी सबुरीचा आदेश दिला आणि प्रक्षुब्ध झालेल्या जमावाच्या भावनांना एका निराळ्याच क्रांतिकारक घटनेने वाट मोकळी करून दिली. ती घटना म्हणजे मनुस्मृतिदहनाची.

आंबेडकरांनी एक प्रचंड सभा घेतली आणि हिंदूंची समाजरचना ज्या मनुस्मृती ह्या धर्मग्रंथावर आधारित आहे, त्या ग्रंथातील अन्यायी भूमिकेवर, त्यातील जहरी जातिवादावर व विषमतेवर कडाडून हल्ला चढविला. त्याच्या मागून तेथे जमलेल्या इतर अस्पृश्य पुढाऱ्यांनी मोठ्या त्वेषाने त्या ग्रंथावर भाषणे करून

त्या ग्रंथावरचा आपला सारा संताप मोठ्या आवेशाने व्यक्त केला.

'या मनूने अस्पृश्यांना कुत्र्यामांजरांपेक्षा, उंदरांघुरळांपेक्षाही हीन लेखिले आहे...'

'हा मनू आम्ही वरच्या वर्गाची सदैव सेवा करावी, त्याच्या लाथा खाव्या आणि त्यांनी दिलेले उष्टे, किडके, घाणेरडे अन्न खाऊन सदैव नरकात राहावे असे सांगतो....

'आम्हांला कसलेही हक्क नकोत, कसलेही ज्ञान नको, कसलाही अभिमान नको आणि अधिकार नको, दागिने नकोत, चांगली वस्त्रे नकोत. जे जे काही माणसांना हवे असते, ते आम्हांला देऊ नये असे हा दुष्ट मनू म्हणतो...

'ब्राह्मणांनी कसलेही भयंकर गुन्हे केले तरी त्यांना प्रायश्चित्त म्हणजे गाईचे शेण खाण्याचे. आणि आम्हांला अगदी किरकोळ गुन्ह्याबद्दल देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा....

'आम्ही गावाबाहेर जनावरांसारखे राहायचे. चुकून वरच्या वर्गातील माणसाबरोबर बसलो तर ढुंगणावर डाग देऊन हद्दपार करावे किंवा ढुंगणच कापावे....असले त्याचे राक्षसी नियम'

'अशा कितीतरी भयंकर गोष्टी या मनूने या पुस्तकात हिंदूच्या मनावर पक्क्या कोरल्या आहेत आणि आम्हांला हजारो वर्षे नरकात पिचत ठेविले आहे--

'धिःकार असो या मनूचा आणि त्याच्या धर्माचा! आम्ही म्हणूनच त्याची होळी करीत आहोत--'

आणि डॉ. आंबेडकरांनी पेटविलेल्या होळीत इतर वक्त्यांनी आपल्या आवेशपूर्ण भाषणांनी चांगलेच तेल ओतले आणि त्या होळीच्या प्रकाशात तेथे जमलेल्या दलितांचे चेहरे उजळून निघाले.

डॉ. आंबेडकरांच्या या जाहीर कार्यक्रमामुळे हिंदू समाजाला प्रचंड हादरा बसला आणि विचारी लोकांना या निमित्ताने हिंदुसमाजरचनेबद्दल अंतर्मुख होऊन विचार करावयास लावले.

आपल्या अडाणी बांधवांना त्यांच्याच भाषेत आपले विचार वारंवार कळविण्याची आवश्यकता होती. दलितांना कार्यप्रवण करण्यासाठी व विचारोन्मुख करण्यासाठी त्यांचे स्वतःचे मुखपत्र हवे होते. महाडच्या पहिल्या

सत्याग्रहानंतर या गोष्टीची तीव्रतेने जाणीव झाल्यामुळे आंबेडकरांनी लगेच त्यानंतर 'बहिष्कृत भारत' या नावाचे पाक्षिक सुरू केले होते. आंबेडकरांची विचारगंगा त्यातून खेड्यांपाड्यापर्यंत जाऊ लागली होती.

नुसत्या उपदेशाने, नुसत्या वैचारिक मार्गदर्शनाने होणारी जागृती ही दुबळी असते, त्याला कृतीचे पाठबळ हवे, हे आंबेडकरांनी बरोबर हेरले होते. आणि म्हणूनच सभा, संमेलने, परिषदा, सत्याग्रह व मोर्चा इत्यादी जेवढ्या म्हणून प्रकारांनी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील दलित समाजाशी संपर्क साधता येतो, तेवढ्या प्रकारांनी ते सदैव संपर्क साधीत होते. त्यांची सुखदुःखे समजावून घेत होते. गुलामगिरीविरुद्ध त्यांच्या मनात चैतन्य निर्माण करीत होते आणि भेदरलेल्या, बावरलेल्या समाजाच्या शेकडो वेड्या-वाकड्या प्रश्नांना उत्तरे देत होते.

महाराष्ट्रातील दलित समाजातील फार मोठा वर्ग महारांचा होता आणि वंश परंपरागत चालत आलेल्या इनाम जमिनीच्या तुकड्यांवर ते कायमचे गुलामगिरीला जखडले गेले होते. मूळ इनाम जमिनीचे बारीक बारीक तुकडे पडले होते, परंतु त्या तुकड्यांसाठी घरेच्या घरे सदैव कष्टत होती, राबत होती व त्यांना घाण्याला जुंपलेल्या बैलांप्रमाणे कामाखाली रगडण्यात येत होते. म्हणूनच आंबेडकरांनी महार वतने नाहीशी करून त्यांना योग्य तो पगार मिळावा अशी चळवळ सुरू केली. त्यांच्या या चळवळीमुळे आपण गावाबाहेर पडून नशीब काढायला हवे म्हणून महार समाज खेड्यांबाहेर पडू लागला व शहरांत गिरण्यांतून त्यांना कामे मिळू लागली. परंतु गिरण्यांतूनही साचे बनविणे, बाबिनी भरणे अशी क्षुल्लक कामे त्यांना देण्यात येऊ लागली, तेव्हा त्याविरुद्ध आवाज उठवून त्यांना मागांवर काम देण्याची मागणी आंबेड-करांनी केली. अस्पृश्यांना शिक्षणविषयक अधिक सवलती मिळाव्यात, त्यांना प्राथमिक शिक्षण सुलभ व्हावे, यासाठी त्यांनी कौन्सिलमधून भाषणांच्या फैरी झाडून जनतेचे व सरकारचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. अस्पृश्यांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून त्यांनी शिक्षणसंस्थेची स्थापना केली व अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी मोठमोठ्या शहरी वसतिगृहे चालविण्याची मोहीम सुरू केली आणि धडाडीने कित्येक ठिकाणी त्यांनी वसतिगृहे उघडली देखील. अस्पृश्यांनी सदैव स्वच्छ राहावे, गलिच्छतेपासून दूर राहावे, मेलेली जनावरे ओढू नये, आणि त्यांचे मांस खाऊ नये. मुलांना शिक्षण द्यावे आणि मरिआई,

म्हसोबा, यल्लमा, खंडोबा यांच्या नावांवर चालणारे किळसवाणे प्रकार बंद करावेत, हे ते सगळीकडे कटाक्षाने सांगत.

महाडच्या सत्याग्रहामुळे आणि त्यांनी चालविलेल्या या निरनिराळ्या दलितहितसंवर्धक कार्यांमळे दलितांना आपल्याला आपल्याच जातीत जन्माला आलेला मोठा वाली भेटला याचा आनंद झाला होताच. ते निष्ठेने आंबेडकर सांगतील ते करावयास सिद्ध झाले. त्यांच्या मनामध्ये या नेत्याने जी आत्म-विश्वासाची, संघटनेची बीजे पेरली त्यामळे अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी नवा लढा देण्याचे आवाहन हा नेता केव्हा देतो याची ते उत्कंठेने वाट पाहू लागले.

आणि १९३० च्या मार्च महिन्यामध्ये नासिक येथील प्रसिद्ध काळाराम मंदिरामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी हजारोंच्या संख्येने मोर्चा काढण्याचे आवा-हन त्यांच्या नेत्याने त्यांना केले.

त्यापूर्वी सायमन कमिशनपुढे त्यांनी दिलेल्या साक्षीनेही अस्पृश्यांच्या हक्कासाठी ते किती दक्ष आहेत, हे कळून चुकले होते. हिंदुस्थानला राजकीय हक्क कोणत्या स्वरूपात द्यावेत यांचा विचार करण्यासाठी सायमन नावाच्या साहेबाबरोबर लंडनहून एक समिती आली होती. काळी निशाणे दाखवून काँग्रेसने त्यावर बहिष्कार टाकला. आंबेडकरांनी लोकमताची पर्वा न करता अस्पृश्यांच्या मागण्या या समितीपुढे सादर केल्या. अस्पृश्यांना शिक्षण मिळत नाही, त्यांचा सगळीकडे छळ होतो म्हणून त्यांच्या कल्याणासाठी सरकारने त्यांना राखीव जागा देऊन मंत्रिमंडळात त्यांना स्थान द्यावे अशी जोरदार मागणी केली.

राजकीय हक्कांबरोबरच धार्मिकदृष्ट्याही आपल्या हक्कांची बजावणी करण्याची अतिशय जरूरी होती कारण बहिष्कृत असला तर अस्पृश्य समाज धर्मवेडा होता आणि म्हणूनच नासिकला सत्याग्रह करण्याचे त्यांनी ठरविले होते.

त्यासाठी नासिक येथे जमलेल्याप्रचंड जमावासमोर भाषण करताना म्हणाले,

"बंधुभगिनींनो, हा मंदिर-प्रवेश हिंदूंची मने अजमावण्यासाठी करीत आहोत. या मंदिरप्रवेशाने आमचे प्रश्न सुटणार नाहीत. यामुळे आम्हांला खायला भाकरी आणि ल्यायला चांगले वस्त्र मिळणार नाही, परंतु आम्हांला मानाने,

अन्नाने राहायला यापुढे मिळणार आहे की नाही, हे पाहावयाचे आहे. हजारो वर्षे या हिंदूंनी आम्हांला जनावरे म्हणून वागविले, परंतु आता आमच्यात जागृती झाली आहे. आम्हांला माणूस म्हणून जगायचे आहे. कोणतीही गोष्ट भीक मागून मिळत नाही, हे मी वारंवार सांगत आलो आहे. आम्हांला हिंदूंकडून दया नको. आम्हांला आमचे हक्क वजावयाचे आहेत...'

जमलेल्या अस्पृश्यांच्या नेमक्या अंतःकरणाला हात घालणारे, त्यांच्यातील स्वाभिमानाचा फणा ताठ करणारे आणि शब्दाशब्दांतून, 'आपण हे करूच' असे चैतन्य नसानसांतून फुलविणारे ते शब्द त्या महापुरुषाच्या पोलादी मनगटाची ग्वाही देत होते.

आणि पंधरा हजार सत्याग्रहींच्या अग्रभागी तळपणारा हा नेता सूर्यनारायण माथ्यावर आला असता मोठ्या शिस्तीने आणि शांततेने मंदिराकडे निघाला.

त्या होरपळणाऱ्या उन्हात तहानेने व्याकुळ झालेल्या सत्याग्रहींना मंदिरातील त्या करुणामय प्रभुरामचंद्राच्या दर्शनाची ओढ लागली होती परंतु प्रभुरामचंद्राचे ते पवित्र मंदिर असंख्य पोलिसांनी वर्तुळाकार घेरले होते आणि त्याचे चारही दरवाजे बंद करून परमेश्वराच्या त्या दीनदुबळ्या भक्तांच्या नजरेपासून त्याला लपवून ठेवण्यात आले होते.

'ही प्रलयाची नांदी आहे. कलियुगाचे दिवस भरत आले. दगडाधोंड्यांनी, लाठ्याकाठ्यांनी आपण प्रतिकाराला सिद्ध झाले पाहिजे.' इकडे माथी भडकलेल्या हिंदूंतील काही अविचारी लोक संतापाने चेतावणी देत होते.

अशा कामासाठी काही प्राणांची आहुती द्यावी लागली तर बेहेत्तर अशा निर्धाराच्या त्या दलित पुढाऱ्याला आततायीपणाने: आपल्या कार्याची हानी होऊ नये; कायद्याने सर्व काही झाले पाहिजे, असे वाटत होते. हाणामारी, बेदिली, अंदाधुंदी यांनी इच्छित कार्यामध्ये यश येण्याऐवजी त्या कामाच्या नरडीला नख लागते, याची त्याला पुरेपूर जाणीव होती.

म्हणून महारवाड्यात सभा भरवून बंद देवळाच्या दरवाज्यात सत्याग्रहींच्या पथकांनी आळीपाळीने धरणे धरून बसण्याचा त्यांनी आदेश दिला.

महारवाड्यात सत्याग्रहींचा प्रचंड तळ पडला. सगळीकडे काळजीचे वातावरण भरले होते. सत्याग्रहींचा छळ होत होता. काहींना मार मिळत होता; त्यांच्या नित्याच्या गरजेच्या वस्तू पैसे देऊनही मिळण्याची मारामार

झाली होती. अस्पृश्यांना आपापली कामे सोडून घरी बसावे लागत होते आणि हे सगळे कधी संपणार याला काही अंत नव्हता. शंकेच्या, भीतीच्या वातावरणात सगळा समाज वावरत होता. परंतु त्यांचा नेता त्यांच्या मागे खंबीरपणे उभा होता, त्यामुळे त्यांच्यामध्ये हत्तीचे बळ संचारले होते.

सत्याग्रही तुरुंगात पडू लागले आणि मध्येच पाजळलेल्या कुऱ्हाडी चमकू लागल्या आणि त्यात एका हिंदू तरुणाचा खून झाला. आता सूडाने ही भूमी पेटणार अशी चिन्हे दिसू लागली, त्यावेळी आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने आपल्या समाजाला व्यवस्थित असे संघटित रूप दिले.

'कोणीही आपले मनोधैर्य खचू देऊ नका. ही धरती दुभंगली, आकाश कोसळले तरी मी तुम्हांला सोडून जाणार नाही...'

त्यांचे हे शब्द सत्याग्रहींच्या अंतःकरणांतून निनादत राहिले.

दैवाने जणू त्यांच्यावर संकटांचा वर्षाव करून त्यांना हतवीर्य करण्याची प्रतिज्ञा केली होती.

खडतर तपश्चर्येने प्राप्त करून घेतलेली विद्या आणि अस्पृश्य समाजाच्या उद्धाराची कळकळ यांखेरीज या तरुणाला कसल्याही प्रकारची परिस्थिती अनुकूल नव्हती. महाड व नासिक येथील सत्याग्रहांमुळे सनातनी समाज संतापला होता. स्वातंत्र्यापायी धुमसत असलेल्या असंतोषामुळे सरकार अस्वस्थ झाले होते आणि ते हिंदूंचे मन अशावेळी दुखविण्यास तयार नव्हते. सायमन कमिशनवर देशाने बहिष्कार टाकला त्यावेळी आंबेडकर त्या कमिशनसमोर साक्ष देण्यास उभे राहिले म्हणून देशातील राष्ट्राभिमानी व्यक्तीही त्यांच्यावर नाराज झाल्या होत्या. सांपत्तिक अडचणींमुळे त्यावेळी आंबेडकरांनी सरकारी कायदा-महाविद्यालयामध्ये तात्पुरती नोकरी धरली होती. 'देशद्रोही, सरकारचा हस्तक' असे अपमानाचे शब्द उद्गारून वर्गातील विद्यार्थी त्यांना हिणवीत वर्गाबाहेर पडत होते.

आणि तरीसुद्धा आपल्या दलितबांधवांच्या उद्धारापोटी आंबेडकर मुकाट्याने हा सारा अपमान गिळण्याची पराकाष्ठा करीत होते.

बरे दैवाने त्यांच्या सांसारिक जीवनात तरी सुखाची काही झुळुक दाखवावी ! छे, त्याने तेथेही संकटाचा कडेलोट करावयाचे ठरविले होते.

वडिलांचे, मोठ्या भावांचे छत्र नाहीसे झाले होते आणि आपल्या संसाराबरोबर मोठ्या भावाची विधवा पत्नी आणि मुलगा यांना सांभाळण्याची

जबाबदारी येऊन पडली होती. राहिलेला एकुता एक 'बाळाराम', हा भाऊ सदैव भांडून डोके भडकावीत होता. त्याला व्यसनाने घेरले होते. अभ्यासाच्या, विद्येच्या हव्यासाने घरच्या संसाराकडे लक्ष द्यायला फावले नव्हते आणि हातातोंडाशी कशीबशी गाठ पडत असताना मानाने, अब्रूने जगणारी त्यांची साध्वी व सहनशील पत्नी गेल्या दहा वर्षांत मेटाकुटीला आली होती. त्यातच एकापेक्षाही एक गोजिरवाणी अशी चार लेकरे परमेश्वराने निष्ठुरपणाने लहानपणीच त्यांच्यापासून हिसकावून नेली होती आणि राहिलेला एकुलता एक धाकटा यशवंता संधिवाताने सदैव अंथरुणाला खिळून होता.

सगळ्यात शेवटचा 'राजरत्न' तर त्यांचा अतिशय लाडका होता. त्याचे राजबिंडे रूप आणि लोभस बाललीला पाहताना त्याच्याबद्दलची कितीतरी स्वप्ने त्यांच्या डोळ्यांसमोरून तरळून गेली होती. एका सुभेदाराचा मुलगा बॅरिस्टर झाला होता. जगातल्या मोठाल्या विद्यापीठांतून डॉक्टर होऊन आला होता. त्याचा हा मुलगा...

एका उमद्या तरुणाच्या जीवनाला सुरुवात होत होती, ती अशा संकटमालिकांनी. परंतु हे दुःखरूपी हलाहल विष पचवून दलितातील शिवशक्ती जागी करून त्यांच्या पाठीमागे हा वीर हिमालयासारखा उभा होता.

त्याच्या आधारावर तर सारे सत्याग्रही प्राण पणाला लावून लढत होते आणि दिवसेदिवस परिस्थिती बिकट होत होती. तरुणांतून नेतृत्व करण्यासाठी पुढे आलेले समाजातील नेते एकामागून एक तुरुंगात जात होते आणि त्यांची जागा भरून काढण्यासाठी प्रचंड लोकसमुदाय मागे तयार होता.

शेवटी रामनवमी आली. यात्रेकरूंनी नाशिक शहर गजबजले, परंतु त्यांचा परमेश्वर चारी भिंतीआड बंदिस्त होऊन बसला होता. शेवटी नाइलाज झाला आणि सनातनी पुढारी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात करार घडून आला. या करारानुसार वर्षानुवर्षे चालत आलेल्या रथोत्सवात खंड पडू नये म्हणून प्रभू रामचंद्राचा रथ स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन्ही वर्गांच्या लोकांनी ओढावा असे ठरले.

माध्यान्हीचा सूर्यनारायण थोडा कलल्यानंतर सजविलेले रथ मिरवणुकीसाठी पुढे आले, परंतु अस्पृश्यांना झुलवत ठेवून रामाच्या पादुका असलेला रथ परस्पर पळविण्याचा अंतस्थ कट शिजविण्यात आला होता. अस्पृश्यांनी तो ओळखिला आणि धावत जाऊन आपला हक्क बजाविण्यासाठी ते रथाच्या बाजूने

उभे राहिले आणि तो रथ ओढण्यास सुरुवात केली तेव्हा पुन्हा एकदा भयंकर संग्रामास त्यांना तोंड द्यावे लागले. त्यांना बेदम बडविण्यात आले आणि त्यांच्या पुढाऱ्याला, आंबेडकराला, ठेचा असा सूर वातावरणात उमटला.

जखमी सत्याग्रहींची संख्या क्षणाक्षणाला वाढत होती. अस्पृश्यांना कायमचा धडा शिकवावा म्हणून सनातनी समाज बेभान झाला होता आणि सरकार लांबूनच तटस्थेतेने हे सारे पाहत उभे होते. आईबापाविना पोरक्या झालेल्या मुलासारखी अस्पृश्यांची अवस्था होती आणि आता त्यांच्या एकुलत्या एका जागत्या दैवतावर सनातनी समाजाची वक्रदृष्टी वळलेली होती.

'बाबांनो, साहेबांना सांभाळा. त्यांच्या भोवती आपल्या प्राणांचे कडे करा. धर्मराजाच्या रक्ताचा एखादा थेंबही जमिनीवर पडला असता तर जसा अनर्थ ओढवला असता, तसाच अनर्थ त्यांच्यावर काठी पडली तर झाल्या-खेरीज राहणार नाही.' कोणीतरी म्हणाले. आणि त्यांच्यावर दगडांच्या वर्षाव होत असताना तो झेलण्यासाठी त्यांच्या भोवती अस्पृश्यांनी कडे केले.

जागेवर वऱ्याच वेळाने पोलिस आले आणि पुढचा भयंकर संघर्ष टळला.

झालेल्या प्रकारामुळे डॉ. आंबेडकरांच्या अंतःकरणाला खोल जखम झाली होती.

ती आता कधीच भरून निघणार नव्हती.

* * *

# ५. झुंज

डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेला नासिकचा सत्याग्रह चालू असतानाच महात्मा गांधींनी दांडी येथील मिठाचा सत्याग्रह घडवून आणला आणि भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला असहकाराच्या चळवळीची जोड दिली या सत्याग्रहामुळे म. गांधींचे नाव सर्वतोमुखी झाले आणि भारतीय राजकारणाचे सूत्रधार म्हणून जनतेने त्यांना स्वयंस्फूर्तीने साद दिली.

मे महिन्यात सायमन कमिटीच्या शिफारसी बाहेर आल्या. त्यांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची शिफारस केली. परंतु उमेदवाराची निवड गव्हर्नरांनी करावी, अशी सूचना केली.

आंबेडकरांनी आगष्ट महिन्यामध्ये नागपूर येथे आपल्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची मोठी परिषद भरवून इंग्रज सरकार व काँग्रेसपक्ष या दोहोंवरही टीकेची झोड उठविली. इंग्रज सरकारने आपल्या शंभर वर्षांच्या कारकीर्दीत अस्पृश्यांच्या सुधारणेकडे काहीही लक्ष दिले नाही आणि काँग्रेसचा अस्पृश्यां-बदलचा कळवळा वेगडी आहे, असा त्यांनी जाहीर आरोप केला. इंग्रज सरकार



व काँग्रेस या दोहोंवरही आपण अवलंबून न राहता आपण आपल्या देशाच्या स्वराज्यप्राप्तीसाठी झटले पाहिजे. देशाला स्वराज्य मिळाल्याखेरीज अस्पृश्यांना दाद मिळणार नाही, असे त्यांनी निक्षून सांगितले.

हिंदुस्थानातील जागृती लक्षात घेऊन भारतासाठी तयार करावयाच्या घटनेचे स्वरूप काय असावे, हे ठरविण्यासाठी इंग्रज सरकारने लंडन येथे गोलमेज परिषद बोलाविली. या परिषदेत काँग्रेसला कटाक्षाने वगळण्यात आले. इतर पक्षाच्या पुढाऱ्यांना आणि काही जबाबदार नागरिकांना विचार-विनिमयासाठी लंडनला पाचारण करण्यात आले. अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकर व रा. ब. श्रीनिवास यांना बोलाविण्यात आले होते.

१७ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर १९३० या काळात या परिषदेत मुंजे, सप्रू, जीना, जयकर, बिकानेरचे महाराज व डॉ. आंबेडकर यांनी अतिशय महत्त्वाची भाषणे करून ब्रिटिश जनतेचे लक्ष भारताकडे वेधून घेतले. आंबेड-करांनी भारतातील अस्पृश्यांची दुःखे इतक्या प्रभावी वक्तृत्वाने आणि आवेशाने



मांडली की इंग्रज स्त्रीपुरुषांच्या अंगावर त्यामुळे काटा उभा राहिला. वर्तमानपत्रांतून जाड मथळे देऊन आंबेडकरांच्या भाषणांची प्रतिवृत्ते विस्ताराने देण्यात आली. त्यांनी निर्भयतेने सरकारवर जी भेदक टीका केली, त्यामुळे तर तेथे चांगलीच खळबळ उडून राहिली. आंबेडकरांनी या परिषदेत मोठ्या धोरणाने व मुत्सद्देगिरीने आपल्या जमातीच्या न्याय्य हक्कासंबंधी वकिली करून साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. इंग्रज जनतेने त्यांच्या उद्‌गारांची दखल घेतली आणि सरकारवर अस्पृश्यांच्या दुःखपरिमार्जनार्थ दडपण आणले. अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी कमिटी नेमण्यात आली आणि मुख्यमंत्री मॅक्डोनाल्ड हे त्या कमिटीचे प्रमुख बनले. या कमिटीमध्ये आंबेडकरांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. निरनिराळ्या समित्यांवर आंबेडकरांनी मोठ्या दक्षतेने काम केले. एकसंध भारत आणि अस्पृश्यांसाठी खास राजकीय हक्क यांच्या मागण्या आंबेडकरांनी या परिषदेपुढे मांडून आपण फक्त दलितांचेच पुढारी नसून प्रखर देशभक्त आहोत, हे सिद्ध केले. परिषदेतील आंबेडकरांची भाषणे ऐकून सयाजी महाराजांचे कान तृप्त झाले. त्यांनी आंबेडकरांना मेजवानीस बोलाविले आणि आपल्या कार्याचे चीज झाले, डोळ्याचे पारणे फिटले अशा भारावलेल्या शब्दांत त्यांनी धन्यवाद दिले.

मुंबईस परत आल्यानंतर आंबेडकरांनी एक महत्त्वाची केस हाती घेतली, त्यावरून त्यांची देशभक्ती देशाला दिसून आली. पनवेल येथील चिरनार येथे काँग्रेसने जो जंगल सत्याग्रह केला तेथे हिंसक प्रकार होऊन मामलेदार आणि सरकारचे काही नोकर मारले गेले. सत्याग्रहींवर खटले भरण्यात आले. आंबेडकरांनी ठाण्याच्या कोर्टात सत्याग्रहींची बाजू मोठ्या परिणामकारकतेने मांडून त्यातल्या बहुतेकांची सुटका केली.

आंबेडकर शिस्तीचे, शांततेचे महत्त्व ओळखीत होते. त्यांच्या सभांना, परिषदांना प्रचंड गर्दी जमत होती. या सभांमध्ये शिस्त राहावी म्हणून त्यांनी आंबेडकर सेवा दलाची स्थापना केली. ह्या दलातील गणवेशधारी स्वयंसेवकांनी पुढे कित्येक सभांतून आणि मोर्चांतून शांतता आणि व्यवस्था राखण्याचे कार्य करून देशातील मोठमोठ्या पुढाऱ्यांकडून शाबासकी मिळविली.

आंबेडकर गोलमेज परिषदेसाठी लंडनला असतानाच महाडच्या तळ्याचे पाणी भरण्याचा अस्पृश्यांचा हक्क कोर्टाने मान्य केला. आंबेडकरांनी चालविलेल्या निरनिराळ्या खटल्यांतून त्यांना सारखे यश येत चालले. भारता-

तील अव्वल दर्जाचे कायदेपंडित म्हणून ते ओळखिले जाऊ लागले. भारतानच नव्हे तर भारताबाहेरही अस्पृश्यांचे पुढारी म्हणून त्यांना मान्यता मिळाली होती. गोलमेज परिषदेतील त्यांच्या भाषणांनी अस्पृश्यांना काही हक्क बहाल केले पाहिजेत याची सरकारला जाणीव होऊ लागली होती म्हणूनच आंबेडकर लंडनहून परत आल्यानंतर मुंबई सरकारने पोलिस खात्यामध्ये यापुढे अस्पृश्यांची भरती करण्यात येईल असे जाहीर केले.

१९३१ मध्ये लंडनमध्ये दुसरी गोलमेज परिषद भरणार होती. तिला देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या काँग्रेस पक्षाने हजर राहणे आवश्यक होते. त्यासाठी व्हाइसराय आयर्विन आणि गांधी यांची बोलणी होऊन सत्याग्रहाच्या वेळी तुरुंगांत डांबलेल्या राजकीय पुढाऱ्यांची मुक्तता करण्यात आली आणि गांधी आयर्विन करार होऊन या परिषदेला काँग्रेस पुढाऱ्यांनीही हजर राहण्याचे मान्य केले. सरोजिनी नायडू, पं. मालवीय हे या परिषदेस हजर राहणार होते, परंतु महात्माजी हजर राहतील की नाही याची शाश्वती नव्हती. अशा वेळी गांधीजींनी पत्र पाठवून आंबेडकरांना भेटण्याची इच्छा दर्शविली. आंबेडकर ऑगस्टच्या चौदा तारखेस आपल्या काही निवडक सहकाऱ्यांसह गांधीजींस भेटावयास गेले. गांधीजींनी भेटीत एकदम मुद्द्यालाच हात घातला,

'आंबेडकर, तुम्ही नेहमी माझ्यावर व काँग्रेसवर टीका करता. पण तुम्ही जन्माला आला नव्हता, त्यावेळेपासून मी अस्पृश्यांच्या प्रश्नावर विचार करतो आहे. काँग्रेसने आतापर्यंत २५ लाखांवर रक्कम या कार्यासाठी खर्च केली आहे....'

'महात्माजी, हे सगळे खरे आहे. त्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहे. तुम्ही म्हणता काँग्रेसने या कार्यासाठी २५ लाखांवर रुपये खर्च केले. मी म्हणतो, ते सारे पाण्यात गेले. एवढ्या पैशाने अस्पृश्यांमध्ये मी मोठी क्रांती करून दाखविली असती, परंतु काँग्रेसला काही करता आले नाही, कारण अस्पृश्यांसाठी काही करावे, अशी काँग्रेसजवळ मनापासूनची प्रामाणिक तळमळच नाही मुळी. तसे असते तर खादी आणि चरखा यांच्यापेक्षाही तुम्ही अस्पृश्यतानिवारण्याकडे अधिक लक्ष दिले असते. आज तुमच्यापैकी किती जणांनी अस्पृश्यांना आपल्या घरी कामावर ठेविले आहे? उलट काँग्रेसचे कार्यकर्ते अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाला विरोध करीत असताना दिसतात.

आम्हांला माणुसकी हवी आहे, स्वावलंबनाने, स्वाभिमानाने जगण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. तुम्ही आणि तुमची काँग्रेस त्यासाठी काही करणार नाही हे मला चांगले ठाऊक आहे... '

बोलता बोलता आंबेडकरांचा आवाज चढत गेला, चेहरा लालबुंद झाला आणि एकदम आवेशाने ते म्हणाले,

' गांधीजी, आज मला आपली वाटावी अशी मातृभूमी नाही, देश नाही धर्म नाही.... '

' नाही नाही आंबेडकर, हिंदुस्थान हीच तुमची मातृभूमी आहे. मी गोलमेज परिषदेतील तुमची भाषणे वाचली आहेत. तुम्ही खरे देशभक्त आहात... '

' मुळीच नाही. आम्ही पोरके आहोंत, अनाथ आहोत. आमच्या न्याय्य हक्कांची मागणी करण्याचाही अधिकार आम्हांला नाही कारण तसे केल्याने तुम्ही आम्हांला देशद्रोही, भाडेकरू हस्तक म्हणणार ! आम्हांला तुडवून नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न करणार...तरीही मी या देशासाठी स्वार्थत्याग करायला उभा आहे, तो अंतःकरणातील कर्तव्यबुद्धी जळते आहे म्हणून... त्याला दुसरे कोणतेही कारण नाही....'

आंबेडकरांचा स्वर वाढत होता, वातावरण गंभीर बनत चालले होते आणि या तरुणाच्या युक्तिवादाने गांधीजीही अस्वस्थ झाले होते. आपल्या व्यक्तिमत्वाने भल्याभल्यांना प्रभावित करणारे महात्माजी निरुत्तर झाले होते. आणि एकदम आंबेडकरांनी त्यांना विचारले,

' महात्माजी पहिल्या गोलमेज परिषदेत मुसलमान, शीख व अस्पृश्य समाजांना स्वतंत्र हक्क मिळावेत हे मान्य करण्यात आले आहे. तुम्ही काँग्रेस-वाल्यांनी फक्त मुसलमानांच्या आणि शिखांच्या हक्कांना संमती दिली आहे, परंतु आम्हा अस्पृश्यांचे काय ? '

' राजकीय दृष्ट्या अस्पृश्यांना हिंदूंपासून निराळे करण्यास माझा विरोध आहे, तसे झाल्यास ते आत्मघातकी ठरेल असे माझे मत आहे. '

आंबेडकर ताडकन उठून उभे राहिले.

' आपल्या स्पष्टवक्तेपणाबद्दल मी आपला आभारी आहे, आपण दोघे कुठे उभे आहोत, हे मला एकदा कळायला हवे होते. अच्छा, चालू द्या तुमचे, मी जातो...'

आणि क्षणाचाही विलंब न लावता ते विद्युत वेगाने बाहेर पडले.

महात्माजींना दुसऱ्या गोलमेज परिषदेत आंबेडकरांशी सामना देणे मोठे जड गेले. गोलमेज परिषदेला ते हजर राहणार नाहीत असे वाटत होते, परंतु शेवटी परिषद चालू झाल्यावर आठवड्यानी ते त्यासाठी लंडनला पोचले आणि परिषदेत त्यांनी जे पहिलेच भाषण केले, त्यामध्ये ' भारतातील हिंदू, मुस्लीम, शीख, अस्पृश्यादी सर्व जमातींची काँग्रेस हीच एक प्रातिनिधिक संघटना आहे. पहिल्या परिषदेत काँग्रेसने भाग घेतला नसल्यामुळे भारताने त्यात भाग घेतला नाही असाच त्याचा अर्थ होता. आता सर्व देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मी इथे आलो आहे ' असे सांगून मोठी खळबळ उडवून दिली.

मुसलमान पुढाऱ्यांनी या संधीचा फायदा घेण्याचे अगोदरच ठरविले होते आणि त्यांना पाठीशी घालून काँग्रेसची नांगी ठेचण्याची कामगिरी सरकार करीत होते. त्यामुळे गांधीजी वारंवार मुसलमान पुढाऱ्यांशी वाटाघाटी करण्यात दंग होते. त्यांच्या एकापेक्षा एक पुढे येत असलेल्या मागण्यांना मुकाट्याने मान्यता देत होते आणि त्यांनी आपले नेतृत्व मान्य करावे म्हणून त्यांची मनधरणी करीत होते आणि अस्पृश्यांना डावलून त्यांच्याबद्दलचा आपला सापत्न भाव व्यक्त करीत होते.

परिषदेच्या घटनाविषयक आणि अल्पसंख्यांकाच्या दोन्ही समित्यांवर आंबेडकरांची योजना झाली होती. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने, कळकळीच्या भाषणांनी आणि अभ्यासपूर्ण अशा विनतोड युक्तिवादाने त्यांनी सगळ्या परिषदेवर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप टाकली.

परंतु मुसलमान व शीख जमातींना विशेष सवलती देण्याचे कबूल करणारे गांधीजी अस्पृश्यांना कोणत्याही स्वतंत्र सवलती देण्यास तयार होईनात, तेव्हा आंबेडकरांनी गांधीजींशी चार हात करणे अपरिहार्य आहे, हे ओळखले आणि त्यांनी चारी बाजूंनी गांधीजींच्या धोरणावर हल्ला चढविला. काहीशा उद्विग्नतेच्या भरात गांधीजींनी परिषदेच्या सभासदांवर टीकास्त्र सोडले आणि इंग्रज सरकारने त्यांना निवडल्यामुळे ते सर्व भारताचे खरेखुरे प्रतिनिधी नाहीत असे सांगून वातावरण तापविले.

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळालाच पाहिजे या भूमिकेपासून आंबेडकर किंचितही ढळण्यास तयार नव्हते. आपण अस्पृश्यांचेही एकमेव

पुढारी आहोत, असे गांधीजी जेव्हा अट्टाहासाने सांगू लागले तेव्हा आंबेडकरांनी आवेशाने तोही भ्रमाचा भोपळा फोडून टाकला. 'आंबेडकर हेच आमचे खरेखुरे पुढारी आहेत. गांधीजींशी आम्ही सहमत नाही ' अशा प्रकारच्या तारांचा वर्षाव लंडनवर होऊ लागला. ब्रिटिश जनतेलाही आंबेडकरांच्या भाषणांनी अस्पृश्यांवर भारतात भयंकर अन्याय होतो आहे, याची बोच लागून राहिली. खुद्द इंग्लंडच्या बादशाहाने मेजवानीच्या प्रसंगी आंबेडकरांना जवळ बोलावून भारतातील अस्पृश्यांबद्दलची आपली सहानुभूती व्यक्त केली.

गांधीजींना सर्व प्रकारच्या विरोधास परिणामकारकरीत्या तोंड देता आले नाही आणि राजकीय पुढारी म्हणून आंबेडकरांची कीर्ती आणखीच वाढत गेली. निरनिराळया समितीच्या विचारमंथनातून योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार पंतप्रधानांना देऊन तीन महिन्यांच्या उलटसुलट चर्चेनंतर भारतीय प्रतिनिधी परतले.

भारतात परतल्यानंतर अस्पृश्यांनी गांधीजींना व काँग्रेसला काळी निशाणे दाखविली आणि आंबेडकरांच्या सत्काराच्या प्रचंड सभा गावोगावी भरवून त्यांना मानपत्रे देण्याची अहमहमिका सुरू झाली. आता डॉ. आंबेडकर हे फक्त साहेब राहिले नव्हते. ते त्यांचे बाबा आणि साहेब—बाबासाहेब झाले होते.

१९३२ च्या ऑगस्ट महिन्यात इंग्लंडच्या मुख्यमंत्र्यानी आपला निर्णय जाहीर केला. आपल्या जातीय निवाड्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या मागणीला मान्यता दिली होती. अस्पृश्याना राखीव जागा बहाल करण्यात आल्या होत्या आणि त्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करण्यात आली होती. अस्पृश्यांना या निवाड्याने न भूतो न भविष्यती असा आनंद झाला. गांधीजींना मात्र ह्या निवाड्याने काँग्रेसच्या आणि स्वतःच्या इभ्रतीला तडा गेला असे वाटले आणि त्यांनी आपले प्रभावी अस्त्र बाहेर काढले.

त्यांनी येरवड्याच्या जेलमधून सरकारच्या या निर्णयाविरुद्ध प्राणांतिक उपोषण आरंभिले आणि साऱ्या देशाचे लक्ष आपल्याकडे ओढवून घेतले. गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी साऱ्या देशातून हालचालींना सुरुवात केली. त्यांचे प्राण वाचविणे आता बाबासाहेबांच्या हाती होते आणि म्हणूनच गांधीजींबरोबर साऱ्या देशाचे लक्ष आंबेडकरांकडे लागले.

अस्पृश्यांच्या हातातोंडाशी आलेला हक्काचा घास काढून घेण्यासाठी याक्षणी गांधीजींनी या जालीम अस्त्राची योजना करावी, हे पाहून आंबेडकरांना अतिशय वाईट वाटले. गांधीजींच्या कित्येक गोष्टींना 'राजकीय बुवाबाजी' म्हणून यापूर्वी आंबेडकरांनी वारंवार संबोधिले होते. परंतु आता वेळप्रसंग गंभीर होता. गोलमेज परिषदेत गांधीजींमधला राजकारणी मुत्सद्दी कमी पडला होता आणि त्याची भरपाई करण्यासाठी आता त्यांच्यातला महात्मा जागा झाला होता आणि आपल्या उपोषणाने सारा देश ढवळून काढण्यास तो सिद्ध झाला होता. परंतु आंबेडकर अशा गोष्टीपुढे नमते घेणारे थोडेच होते. गांधीजींचा हा निर्णय अस्पृश्यांवर अन्याय करणारा आहे आणि आपण त्यामुळे मुळीच दबणार नाही, असे त्यांनी जाहीर केले. काँग्रेसने आंबेडकरांविरुद्ध रान उठविण्यास सुरुवात केली. दिवस लोटू लागले तशी महात्माजींची प्रकृती क्षीण होत गेली. २२ सप्टेंबरला गांधीजींची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी पत्रक काढले आणि सगळ्या देशात चिंतेचे वातावरण पसरले. शेवटी तडजोडीसाठी आंबेडकरांनी गांधीजींची तुरुंगात भेट घ्यावी असे ठरले.

'तुरुंगातील ते वातावरण पाहूनच तुमचा विरोध मावळेल. देशाच्या पित्याकडे तुम्हांला पाहवणार देखील नाही!' आंबेडकरांना सांगण्यात आले.

आंबेडकरांनी गांधीजींना भेटण्यासाठी येरव्याच्या तुरुंगांत रात्री प्रवेश केला. खरोखर वातावरण मोठे गंभीर होते. अतिशय अशक्त झालेले गांधीजी अंथरुणावर पडून होते.

'महात्माजी, तुम्ही असे नेहमीच आमच्या बाबतीत निष्ठुर आहात'

'बाबारे, ते माझ्या नशिबी लिहिलेलेच आहे.'

'गांधीजी, मुसलमानांना, शिखांना, इतर जमातींना जसे हक्क मिळाले तसेच आम्हांला मिळाले. मग तुमचा सारा रोख आमच्यावरच का?'

'डॉक्टर, तुम्ही म्हणता त्या साऱ्या गोष्टी मला मान्य आहेत. परंतु तुम्ही माझे प्राण वाचविण्यासाठी आला आहात होय ना?'

'होय महात्माजी परंतु खरोखरच माझ्या जमातीचे दुःख दूर करण्यासाठी तुम्ही झटला असता तर मीसुद्धा मोठ्या आनंदाने तुमच्याबरोबर चालललो असतो.'

'होयरे पोरा तू सुद्धा काँग्रेसमध्ये आला असतास तर....'

पण त्या दोघांनाही चांगले ठाऊक होते की अशा दोन तळपत्या तलवारी एका म्यानात क्षणभरही राहू शकत नाहीत.

'गांधीजी मी देशासाठी वाटेल ते करायला तयार आहे. परंतु माझी जमात आणि माझा देश यांमध्ये माझ्या जमातीला मी पहिले स्थान देतो.'

आंबेडकरांच्या निश्चयाची प्रतीती आल्यामुळे गांधीजींनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता दिली, आणि पुढचा तपशील ठरविण्यासाठी मोठमोठ्या पुढाऱ्यांची एक समिती नेमण्यात आली. आंबेडकर ठराविक जागांसाठी हटून बसले आणि इकडे वाटाघाटींच्या फेरी झडत असताना महात्माजींची प्रकृती तिकडे झपाट्याने खालावत चालली.

आंबेडकरांच्यामुळे हा सारा विलंब लागतो आहे हे पाहून लोक संतापू लागले. गांधीजींनी उपोषणाला सुरुवात केली त्या दिवसापासून आंबेडकरांवर धमक्यांच्या पत्रांचा वर्षाव सुरू झाला होता. लोक रस्त्यारस्त्यावर त्यांच्याबद्दल भलतेसलते बोलत होते. संतापाने हात उगारीत होते. त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. साऱ्या देशातील वातावरण तप्त झाले होते. अशाही अवस्थेत बाबासाहेब शांततेने आणि मुत्सद्देगिरीने तत्त्वासाठी अखेरच्या क्षणापर्यंत झगडण्याच्या बाण्याने वाटाघाटी करीत होते.

शेवटी आंबेडकरांच्या मागण्यांना मान्यता मिळाली. आता एकच प्रश्न राहिला होता. दहा वर्षांनंतर राखीव जागांच्या बाबतीत मतदारांचा कौल घ्यावा असे आंबेडकर सांगत होते. तर गांधीजी पाच वर्षांवर ही मुदत वाढविण्यास तयार नव्हते. शेवटी समेट झाला आणि काँग्रेस व अस्पृश्यवर्ग यामध्ये 'पुणे करार' झाला.

गांधीजींचे प्राण वाचले म्हणून देशाने निःश्वास टाकला. 'गांधीजी, हेच जर तुम्ही गोलमेज परिषदेत मान्य केले असते तर......' आंबेडकर म्हणाले.

जातीय निवाड्यामुळे अस्पृश्यांना एकूण ७८ जागा मिळणार होत्या. पुणे करारानुसार आता त्यांना १४८ पर्यंत जागा वाढवून मिळाल्या. वरवर पाहता या घटनेने अस्पृश्यांना अधिक जागा मिळाल्या म्हणून त्यांचा फायदा झाला असे काहींना वाटले परंतु हा भ्रम होता. कारण अस्पृश्यांना त्यामुळे यापुढे निवडून येण्यासाठी, स्पृश्य मतदार संघावर कायमचे अवलंबून राहावे लागले. 'उच्चवर्णीय हिंदूंच्या ताब्यात माझ्या जातिबांधवांना कायमचे

देण्यास मी केव्हाही मान्यता देणार नाही.' या प्रतिज्ञेने आंबेडकरांनी खूप धडपड केली. परंतु गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी त्यांना आपली प्रतिज्ञा मोडावी लागली.

ह्या उपवासाने गांधीजींनी देशाच्या राजकारणात फार मोठी प्रतिष्ठा मिळविली आणि जनतेच्या प्रक्षोभरूपी वणव्यात आंबेडकर होरपळून निघाले.

परंतु त्यांनी माघार घेतली नव्हती.

* * *

ठाणे.
दि: ..................
नों: दि: ..................

## ६. अर्हेवमरण

पुणे करारानंतर महिन्याभरानी बाबासाहेबांना तिसऱ्या गोलमेज परिषदेसाठी पुन्हा लंडनला जाण्यासाठी तयारी करावी लागली. या तिसऱ्या परिषदे-वरही कॉंग्रेसने बहिष्कार टाकला होता आणि जागतिक राजकारणातील अस्थिर वातावरणामुळे ब्रिटिश जनता व सरकार ही दोन्हीही भारताबद्दल उदासीन बनली होती. पुणे करारामुळे आंबेडकरांची बरीच कुचंबणा झाली होती. अस्पृश्यांना राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी सरकारविरुद्ध लढण्यापेक्षा कॉंग्रेसकडूनच ते मिळवायला हवेत, अशी परिस्थिती निर्माण झाली होती, त्यामुळे या परिषदेत आंबेडकरांनी अभ्यासपूर्ण भाषणे दिली तरी पूर्वीच्या भाषणातील झंझावातीपणा कमी झाला होता. कडवा विरोध असला, तुल्यबल प्रतिस्पर्धी असला म्हणजेच आंबेडकरांना त्याच्यावर तुटून पडण्यात मोठा हुरूप येत असे. तशी परिस्थिती यावेळी नव्हती. तरीही भारताला प्रौढ मतदानाचा हक्क मिळावा, यासाठी या परिषदेत त्यांनी जोरदार प्रयत्न केले. इंग्रज सरकार इतक्या सहजासहजी हा अधिकार मान्य करील हे शक्य नव्हते.



१५२५६



भारतात परतल्यानंतर अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशाचा प्रश्न पुढे आला आणि त्या निमित्ताने भारतातल्या हिंदू मनाची अस्पृश्यांना चांगली कल्पना आली. गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी आंबेडकरांशी हातमिळवणी करणारे कॉंग्रेसजन अस्पृश्यांना मंदिरप्रवेशाचा हक्क देण्यासाठी तयार नव्हते. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाबद्दल गांधीजीही विशेष उत्साही नव्हते, परंतु त्यांना इतर कॉंग्रेस-जनाप्रमाणे त्याला विरोध करून चालणार नव्हते.

अस्पृश्यांनी सामाजिकदृष्ट्या आपले स्थान उंचावल्याखेरीज, त्यासाठी लढा दिल्याखेरीज हिंदुसमाज त्यांना आपण होऊन कोणत्याही सवलती द्यावयास तयार होणार नाही, हे आंबेडकर प्रत्येक सभेतून सांगू लागले.

‘ आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्या. लहानपणापासून त्यांना गुलामगिरीच्या कामांना जुंपू नका. तरुणांनो कितीही अडचणी आल्या तरी नेटाने उच्च शिक्षण घ्या. जगातील ज्ञान विज्ञानाची उपासना करा. आपल्या जुन्या घाणेरड्या सवयी सोडून द्या. प्रौढ बायकांनो फावल्या वेळात र ट फ करायला



शिका. तुमच्या अडाणीपणामुळे गावच्या कुलकर्ण्याने, गावच्या मारवाड्याने तुम्हांला कायमचे गुलामगिरीत लोटून दिले आहे.......

'तुम्हांला मंदिरप्रवेशाचा हक्क मिळाला पाहिजे आणि त्यासाठी आकाशपाताळ एक करून तुम्हाला हे हक्क मिळवून देण्यासाठी मी जीवाचे रान करीत आहे. पण लक्षात ठेवा, उपाशीपोटी विठोबा तुमची भूक भागवू शकत नाही. आणि गळ्यातल्या तुळशीमाळांनी संध्याकाळचा प्रश्न सुटत नाही.

'मेलेली जनावरे ओढू नका, मुर्दाड मास खाऊ नका, मग आम्ही पोटासाठी काय करावे? लोक मला विचारतात. मी विचारतो, घरी अठराविश्वे दारिद्र्य आहे, खायला अन्न नाही म्हणून कोणी पतिव्रता कधी बाजारबसवी होईल का? पातिव्रत्य हा तिचा प्राण आहे. ती त्याचे काहीही करून रक्षण करील. स्वाभिमान हाच प्रत्येक माणसाचा प्राण आहे. तुम्ही स्वाभिमानाने जगण्यास शिका म्हणजे पुढचे सगळे आपोआप घडून येईल ..स्वतंत्र उद्योग करा. गाव सोडून शहरात जा. पोलिसखात्यात भरती व्हा. लष्करात तुम्हाला जाण्याची संधी नाही, म्हणून चळवळ करा. मी तुमच्या पाठीशी आहे ......

'एकीकडे आम्हाला अन्यायाच्या टाचेखाली क्रूरपणाने चिरडायचे आणि दुसरीकडे आम्हांला हरिजन-हरीचे, परमेश्वराचे लाडके लोक म्हणावयाचे ही आमची क्रूर थट्टा आहे....

अस्पृश्यांची मते मिळविण्यासाठी काँग्रेसने अपृश्यतानिवारण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. ते एक नाटक आहे. अस्पृश्येतर पुढाऱ्यांची निवळ भाषणे ऐकावीत. कृती करायला कितीजण तयार आहेत? हिंदुसमाजरचना ही चातुर्वर्ण्यावर आधारित आहे आणि आपल्या साऱ्या विषमतेचे कारण चातुर्वर्ण्य हेच आहे. चातुर्वर्ण्याच्या मुळाशी प्रहार केल्याखेरीज ही विषमता दूर होणार नाही. ४० वर्षापूर्वी केशवसुत नावाच्या कवीने लिहिले,

**धार धरलिया प्यार जिवावर**
**रडतिल रडोत रांडा पोरे**
**गतशतकांची पापे घोरे,**
**क्षालायला तुमची रुधिरे**
**पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर !**

आम्हांवर शतकानुशतके गुलामगिरी लादून आपण भयंकर पाप केले आहे. ते फेडण्यासाठी, अस्पृश्यांच्या मुक्तिस्तव झगडण्यासाठी निर्धाराने पुढे या,

त्यासाठी आपले प्राण वेचावयास सिद्ध रहा, असे हा कवी म्हणतो. आतापर्यंतच्या सुधारकांनी असे मोठमोठे शब्द फक्त उच्चारले आहेत. जोराने, आवेशाने उच्चारण्यासाठी हे शब्द चांगले आहेत, पण त्यासाठी कितीजण पुढे आले आणि आमच्यासाठी रक्त सांडले? उलट कुऱ्हाडी चालवून त्यांनी आमच्या सत्याग्रहींचे रक्त वाहवले. मला त्याबद्दल वाईट वाटत नाही. ह्या रक्ताच्या कणाकणातून आपल्याला झगडण्यासाठी सामर्थ्य प्राप्त होईल, स्फूर्ती येईल यात मला कसलीच शंका वाटत नाही....'

आणि या प्रश्नाचा कायमचा सोक्षमोक्ष लावावा म्हणून एका भेटीत आंबेडकरांनी गांधीजींना सरळ सरळ विचारले,

'गांधीजी, चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाजरचना बदलल्याखेरीज आम्हा अस्पृश्यांची खरीखुरी सुधारणा झाली असे म्हणता येणार नाही...'

'नाही नाही. मी जातीने हिंदू आहे आणि शेवटपर्यंत हिंदूच राहीन. हिंदुधर्म हा चातुर्वर्ण्यावरच आधारलेला आहे. तीच त्याची शक्ती आहे, सामर्थ्य आहे, आणि तत्त्वज्ञानही आहे. चातुर्वर्ण्यावर आघात करणे मला मंजूर नाही...'

'मग तुमचे आणि माझे काळत्रयी जमणार नाही.' नेहमीप्रमाणे ताडकन बोलून आंबेडकर बाहेर पडले होते.

१९३३ मार्चमध्ये ब्रिटिश पार्लमेंटने श्वेतपत्रिका जाहीर केली. भारतामध्ये घटनात्मक लोकशाहीशी स्थापना हळू हळू कशी करता येईल यासंबंधी त्यामध्ये विचार मांडण्यात आले होते. त्यांचा अधिक विचार करण्यासाठी सरकारने एक समिती नेमिली. त्यामध्ये आंबेडकर होतेच. त्यासाठी पुन्हा एकदा आक्टोबरमध्ये त्यांना लंडनला जाऊन यावे लागले.

सतत व्याख्याने, प्रवास, अखंड वाचन आणि अविरत झगडा इ. अनियमित जीवनामुळे आंबेडकरांची प्रकृती झपाट्याने खालावत चालली. एक पायामध्ये सारख्या कळा येऊ लागल्या आणि काही वेळेस चालता येणे अशक्य होऊ लागले. डोळ्यांवर ताण पडल्यामुळे दृष्टी अधू होते की काय असे वाटू लागले. डॉक्टरांनी संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आणि त्यासाठी ते बोर्डीला आले.

बोर्डीला काहीशी फुरसत मिळाली. समोर अथांग दरिया पसरला होता. त्याच्या लाटा त्यांना बोलावीत होत्या. विद्यार्थीदशेत महालक्ष्मीजवळ ते समुद्रात मनसोक्त डुंबत असत. कितीतरी दिवसांनी त्या लाटा अंगावरून जाताना तो लहानपणीचा आनंद ते परत अनुभवीत होते.

कायद्याच्या, अर्थशास्त्राच्या, राज्यशास्त्राच्या सामाजिक स्थितीच्या अभ्यासात रात्रंदिवस दंग असणारे त्यांचे मन धर्माचा, अध्यात्माचा विचार करू लागले. अध्यात्माविना आपले जीवन अपुरे आहे, हे त्यांना कोणी सांगण्याची अवश्यकता नव्हती, परंतु आता यावेळी त्यांचे मन अध्यात्माकडे तीव्रतेने ओढ घेऊ लागले होते.

डोक्यावरचे सर्व केस काढलेले आणि अध्यात्मिक चिंतनात गढून गेलेले आंबेडकर एखाद्या महंतांच्या, योग्याच्या भूमिकेत वावरत होते.

निवांतपणे अध्ययनात बुडून जावे, शांतपणे चिंतन करण्यास मिळावे, ही त्यांच्या मनाची खरी ओढ होती. त्यांना पुस्तकांखेरीज दुसरे काही प्रिय नव्हते. :सापडतील तेथून त्यानी हजारो दुर्मिळ पुस्तके गोळा केली होती. इंग्लंड–अमेरिकेतून परत येताना पुस्तकांनी पेटारेच्या पेटारे भरून आणले होते. वकीली करण्यासाठी म्हणून त्यांनी परळ येथील दामोदर हॉल येथील दोन खोल्या मिळविल्या होत्या. त्या खोल्या पुस्तकांनी भरून गेल्या होत्या. आल्या गेल्यांना बसावयास जागा नव्हती म्हणून त्यांनी आपल्याकडची पुस्तके व्यवस्थित ठेवता येईल असे स्वतंत्र घर बांधावयाचे ठरविले आणि स्थापत्यशास्त्रावरची पुस्तके गोळा करून त्यांनी त्यासाठी एक नमुनेदार आराखडा आखला आणि मुंबईस आल्यानंतर दादरच्या हिंदू कॉलनीत जागा घेऊन त्यांनी आपले हे स्वप्न साकार करण्यास सुरुवात केली.

त्यांनी असंख्य ग्रंथालये पाहिली होती, जगातील मोठमोठया विद्वानांच्या अभ्यासिका पाहिल्या होत्या. त्यामुळे त्यांनी मनाप्रमाणे जमला नाही म्हणून कित्येक वेळेला बांधलेला भाग पाडून त्याची वारंवार पुनर्रचना केली.

लंडनला चर्चिलच्या घरात पाहिलेले नव्या धर्तीचे पुस्तकाचे कपाट त्यांना मध्येच आठवे, आणि सुताराला लागलीच तसे कपाट बनविण्यासाठी आज्ञा होई. सूचना प्रतिसूचना, दुरुस्त्या यांच्या संस्कारातून शेवटी ते कपाट तयार झाले की, बांधलेल्या भागात ते कपाट शोभून दिसणार नाही, असे त्यांना वाटे आणि मग पुन्हा ते पाडून नवीन पद्धतीने बांधण्याची सूचना मिळे.

‘ कितीही पैसे पडू द्या परंतु सोईबरोबर सौंदर्याकडेही मला लक्ष दिले पाहिजे ’ ते म्हणत.

शेवटी एकदा त्यांच्या कल्पनेप्रमाणे घर तयार झाले आणि त्यांची प्राणप्रिय पुस्तके त्यामध्ये स्थानापन्न झाली.

लाडक्या राजरतनच्या मृत्यूनंतर ते आपल्या घरी बी. आय. टी. चाळीच्या त्या दोन खोल्यांच्या संसारात क्वचितच जात कारण तेथे गेल्यावर त्याची हटकून आठवण येई आणि त्यांचे डोळे ओलावत. आता त्या दोन खोल्यांतला संसार या नव्या घरामध्ये येणार होता. एका खोलीतून दोन खोल्यांत आणि तेथून आता या नव्या प्रशस्त घरात गृहलक्ष्मी वावरणार होती आणि तिचे साहेबही तेथेच राहणार होते म्हणून घराला नाव ठेवण्यात आले ' राजगृह ' !

परंतु त्या राजगृहात फार काळ राहण्याचे भाग्य त्या माउलीला मिळाले नाही. मुलांच्या अकाली मृत्यूने, अविरत कष्टाने, पतीच्या निरंतर काळजीने आणि खडतर उपासातापासाने ती माउली दिवसेदिवस खंगत चालली होती, कणाकणाने झिजत होती, निस्तेज होत होती.

२७ मे १९३५ ला तिची प्राणज्योत अचानक मालविली. सुदैवाने त्या दिवशी रात्रो खूप उशीरा का होईना बाबासाहेब घरी परत आले होते. रमाबाईंना आपल्या मृत्यूची चाहूल लागली होती. आदल्या दिवशी अंथरुणावरून उठून त्या घरभर हिंडल्या होत्या, यशवंताला डोळे भरून पाहून घेतले होते, त्या दिवशी गप्पागोष्टी केल्या होत्या, रात्री साहेब येईपर्यंत त्यांची वाट पाहिली होती आणि मग त्या अंथरुणावर जाऊन पडल्या होत्या.

परंतु ती काळरात्र होती. मध्यरात्रीनंतर ती साध्वी अस्वस्थ झाली आणि त्यामुळे झोपेच्या आधीन झालेले सारे घर खडबडून जागे झाले. बाबासाहेब उठून तिच्या जवळ गेले आणि तिचे खोल जात असलेले डोळे पाहून ते दुःखाने व्याकुळ झाले. त्यांनी तिचे डोके मांडीवर घेतले आणि हलक्या हाताने तिला घोटभर पाणी पाजले. नंतर लवकरच सारे काही संपले....बाबासाहेबांनी लहान मुलासारखा टाहो फोडला आणि ते शोक करू लागले. प्रेतयात्रेमध्ये त्यांच्या डोळ्याचे पाणी खळत नव्हते. तिच्या श्रद्धा आणि निष्ठा त्यांना चांगल्या ठाऊक होत्या.

' मी बुद्धिवादी असलो तरी तिचे मन मला ठाऊक आहे. हिंदुधर्मपद्धतीप्रमाणे तिचे सर्व संस्कार करा ' ते म्हणाले.

घरी येऊन बाबासाहेब अश्रू ढाळीत बसले, सांत्वनासाठी मोठमोठे लोक

येऊन गेले, परंतु बाबासाहेबांचे सांत्वन करणे कठीण होते. एरवी उग्र, तेजस्वी आणि कर्तव्यकठोर भासणारे बाबासाहेब मनाने हळवे होते. त्यांचे मन अतिशय भावकोमल होते. त्यांच्यावरचा हा आघात फार मोठा होता.

रमाबाई ही सती-पतिव्रता होती. तिने फार सहन केले, फार भोगले. तिच्या मृत्यूमुळे पंख तुटल्यागत त्यांची अवस्था झाली होती.

अगदी लहानपणी ती त्यांच्या घरी आली. पतीची झेप तिने केव्हाच ओळखिली होती आणि तिने त्यांना मुक्तपणे विहार करण्यास सदैव साहाय्य केले. इंग्लंड-अमेरिकेमध्ये शिक्षणासाठी आंबेडकर गेले, त्यावेळी घरची परिस्थिती मोठी विकट होती, परंतु तिने त्रागा करून किंवा अडचणींचा बाऊ करून त्यांना कधीच रोखले नाही. आपल्या पतीप्रमाणेच ती मोठी स्वाभिमानी होती. रात्रीच्या अंधारात शेणी थापून ती चार पैसे मिळवीत होती आणि स्वतःचे घर चालवीत होती. राजरतनच्या मृत्यूनंतर जवळजवळ साहेबांनी घर वर्ज केले. तिच्या मनावरही त्याच्या मृत्यूचा मोठा आघात झाला होता. परंतु जेवणाचा डबा घेऊन ती दामोदर हॉलमध्ये जाई. पुस्तकात डोके खुपसून बसलेल्या, कार्यकर्त्यांच्या गराड्यात बसलेल्या पतीला चार घास खायला घालून ती परते. कित्येक वेळेला ती ताट वाढून समोर उभी राही आणि डॉक्टर तासनतास पुस्तकांतच डोके खुपसून राहत, तरीही ती शांतपणे त्यांची मान वर होण्याची वाट पाहत उभी राही.

'एकदा जेवून घ्यावे आणि मग हवा तेवढा वेळ पुस्तकात डोके खुपसून बसावे' ती अधूनमधून सौम्य आवाजांत म्हणे.

'एकदा पुस्तक खाली ठेविले की ते परत उचलणे मोठे कठीण असते, हे तूच पाहतेस ना! सारखे लोक येत राहतात. तिकिटे काढून आणून बाहेर-गावी नेण्यासाठी कार्यकर्ते वाट पाहात असतात. मुलाखती ठरलेल्या असतात आणि पुन्हा ती नोकरी आहेच.' बाबासाहेब म्हणत.

राजकीय चळवळीत शिरून साहेबांनी आपला प्राण अहोरात्र धोक्यात घातला. निर्भयपणे, बेडरपणे ते गावोगावी हिंडत होते. परंतु त्यांच्या जीवाला नेहमीच धोका होता. ते बाहेर गेले की परत येईपर्यंत रमाबाई व्रतस्थ राही. तोंडामध्ये पाण्याचा थेंबही न घेता ती आपला पती सुखरूप परत यावा म्हणून नवस करी, उपवास करी.

एकदा ती म्हणाली होती 'लोकांना शहाणपण शिकविण्यासाठी एवढा

कसला मेला त्रास घ्यायचा आणि जीव धोक्यात घालायचा तो ! मी आता आंथरुण-पांघरुण घेऊन तुमच्याबरोबरच सगळीकडे येत राहीन. म्हणजे तुमच्या सेवाचाकरीत खंड पडणार नाही.' आणि ती खरोखरच गाठोडे घेऊन तयार झाली होती.

'खुळी कुठली ! तुला नाही समजायचे माझे प्रयत्न...'

'म्हणून तर मी येते ना ! मला एकदा समजावून घेऊ द्या सारे. तुम्ही या सभांतून काय भाषणे देता ? कसे बोलता ? हे एकदा मला डोळे भरून बघायचे आहे. लोक खूप सांगतात तुमच्याबद्दल, पण मी अजून एकदाही तुम्हांला जोरजोराने भाषण करताना पाहिले नाही.'

'मग अशी समोर बैस, मी असा इथे उभा राहून भाषण करतो...'

'नेहमी असं थट्टेवारी न्यायचं...' ती डोळ्यात अश्रू आणून म्हणाली होती आणि साहेब गाडी गाठण्यासाठी सटकले होते.

एकदा पंढरपुरला जाण्याची तिने इच्छा व्यक्त केली होती.

'काय ? त्या घाणेरड्या गल्ल्यांतून दरवाज्याबाहेर उभे राहून डॉ. आंबेडकरांची पत्नी त्या दगडी विठोबाचे दर्शन घेण्यासाठी जाणार आहे ?' ते गरजले होते. 'नाही ग. मला तुझी ही कल्पनासुद्धा सहन होत नाही. हा विठोबा, तुझ्यासमोर साक्षात उभा असताना तुला कसले भलतेसलते सुचायला लागले ?'

आणि त्यानंतर तिने त्याबद्दल शब्द काढला नव्हता.

रमाबाईच्या मृत्यूने नुसता यशवंताच नव्हे तर तिचे साहेबही पोरके झाले होते. ते दुःख पचविणे कठीण होते. परंतु त्याच वेळी 'सरकारी कायदा विद्यालया'चे प्राचार्यपद त्यांच्याकडे चालून आले.

ही जागा स्वीकारायची की नाही ?

मान फार मोठा होता, परंतु त्या जागेवर बसणारा माणूस त्याहीपेक्षा मोठा होता, खूप मोठा होता. त्याला त्याचे विशेष प्रलोभन नव्हते. यापूर्वी सरकारने त्यांना जज्जाची जागा देऊ केली होती आणि ती त्यांनी स्वीकारली असती तर हायकोर्टाचे न्यायमूर्ती होणे त्यांना कठीण नव्हते. न्या. तेलंगांच्या, न्या. रानड्यांच्या मालिकेत ते जाऊन बसले असते......

परंतु पत्नीनिधनाच्या दुःखामध्ये विरंगुळा म्हणून ही प्राचार्यपदाची नोकरी त्यांना बरी वाटली आणि त्यांनी ती स्वीकारली.

* * *

# ७. बंडखोराची भीमगर्जना

डॉ. आंबेडकरांचा पिंड हा ज्ञानयोग्याचा होता. त्यांची ज्ञानसाधना अखंड चाललेली होती. कोणत्याही विषयाचा सर्वांगीण आणि चौफेर अभ्यास केल्यानंतर त्याचे नवनीत मुक्तहस्ताचे उधळण्यातच काही विचारवंतांना मोठा आनंद वाटतो. आंबेडकर अशा विचारवंतांच्या कोटीतील असल्यामुळे सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांची कारकीर्द मोठी नमुनेदार ठरली. अल्पावधीत त्यांनी तेथे अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या धबधब्याप्रमाणे धो धो गर्जणाऱ्या वाक्गंगेचे आणि ज्ञानसरितेचे आकंठपान करण्यातला आनंद विद्यार्थी अनुभवू लागले. ते बोलायला उभे राहिले म्हणजे 'देता किती घेशील दो कराने ?' अशी टिपणे घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अवस्था होऊ लागली.

भारतीय राजकारणात या वेळी चांगलीच मरगळ आलेली होती. सरकारविरोधी कारवायांना दडपण्याची, खच्ची करण्याची नीती सरकार अवलंबीत होते. राजकीय पक्ष आणि पुढारी यांच्यावर सरकारी वक्रदृष्टी



चळली होती आणि त्यांची मुस्कटदाबी करून जनतेला घाबरविण्याचा सरकार प्रयत्न करीत होते.

अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचे विधेयक मध्यवर्ती असेंब्लीत पराभूत करण्यात आले होते. नासिकला वर्षानुवर्षे सत्याग्रह करूनही हिंदू मन त्यांना मंदिरप्रवेशाचा अधिकार द्यावयास तयार नव्हते. नासिक जिल्ह्यातील मुखेड या गावी अस्पृश्यांनी 'पांडव प्रताप' ही पोथी गावाच्या वेशीतून वाजत न्यायचे ठरविले होते तर हिंदूंनी त्यांना वेशीजवळ अडवून बेदम मार दिला होता... आपला हक्क बजाविण्यासाठी शांततेनें सत्याग्रह करणाऱ्या सत्याग्रहींच्या जीवाला सगळीकडे धोका निर्माण झाला होता...

या सर्व छळाला कंटाळून नासिक जिल्ह्यातील काही अस्पृश्यांनी मुसलमानी धर्माला कवटाळायचे ठरविले. अध्यापनामध्ये दंग झालेले बाबासाहेब ही बातमी ऐकून खडबडून जागे झाले. पत्नीच्या मृत्यूनंतर आलेल्या मालिन्यातून ते बाहेर आले.



'थांबा थांबा, घाई करू नका. आपण हिंदु मनाला विचार करण्यास आणखी एक संधी देऊ या. आपले मन विचलित होऊ न देता हिंदुधर्मात राहूनच त्याला काही उज्ज्वल स्वरूप देता येते का ते पाहू या. आपल्या प्रयत्नाला यश येईलच असे नाही. हिंदुसमाजास लोकलज्जा व सद्धर्माची चाड आहे की नाही, हे एकदा नीट कळू द्या....' ते म्हणाले.

परंतु हा विचार फार वेळ त्यांच्या मनात टिकला नाही. त्यांचे मन एकदम बंड करून उठले. त्यांनी नासिक जिल्ह्यातील येवले येथे १३ आक्टोबर १९३५ रोजी परिषद बोलविली. परिषदेस फार मोठ्या प्रमाणात अस्पृश्य समाज हजर होता. बाबासाहेबांचे झंझावाती व्यक्तिमत्त्व दलितांना आता चांगले ठाऊक झाले होते. परंतु यावेळी व्यासपीठावर बसलेले बाबासाहेब काही निराळेच दिसत होते. त्यांच्या अंतःकरणात कसले तरी वैचारिक वादळ चाललेले आहे, हे त्यांच्या चेहऱ्यावरून लक्षात येत होते. ते बोलायला उठले तेव्हा सारी सभा तटस्थ झाली आणि आता ते काय बोलणार याकडे लक्ष देऊन राहिली.

त्यांच्या भाषणातील पहिल्या चार–दोन वाक्यांनीच त्यांच्या आवाजातील धारदारपणा वाढला असल्याचे लक्षात आले. त्यामध्ये युगायुगांची व्यथा होती आणि आजच्या युगाच्या नव्या जाणिवांचा आत्यंतिक संताप होता, अपमानाची खंत होती आणि अपयशाचा डंख होता. ते म्हणाले,

'हिंदुधर्म ! कसला हा हिंदुधर्म ? कोटी कोटी लोकांना गुलामगिरीत डांबणारा, अज्ञान, दारिद्र्य आणि रूढी यांच्या खोल खोल गुहेत जबरदस्तीने लोटून देणारा आणि त्यांना माणुसकीतून उठवून लावणारा हा हिंदुधर्म धर्म नव्हे. धर्म हा माणुसकीवर आधारित असतो, परंतु आम्हांला या धर्मात तळ्यातील पाण्याचे, देवळात शिरायचे आणि दुसऱ्यांस स्पर्श करण्याचे साधे हक्कही नाहीत. मग आम्हाला कशाला पाहिजे हा धर्म ? काही जण सांगतात, जरा दमाने घ्या. हजारो वर्षांचा हा हाड्या व्रण आहे, तो सहजासहजी जाणार नाही. पण आता आणखी किती वर्षे थांबायचे ? दहा वर्षे आम्ही चळवळ करतो आहो पण हिंदू समाज पूर्वीइतकाच ढिम्म आहे. अस्पृश्यांची दुःखे आम्हांलाच माहीत. तुम्ही एक दिवस अस्पृश्यांची दुःखे अनुभवा म्हणजे कळेल काय भयंकर यातना असतात त्या ! अहो, घरातील बाई महिन्यातून

तीन दिवस बाहेर बसते पण ते तीन दिवस तिची किती केविलवाणी आणि भयंकर अवस्था होते......

'माझी आता ठाम खात्री झाली आहे की, ह्या धर्मात राहून आमच्या कपाळीचा वनवास, आमच्या जमातीवरचा कलंक दूर होणार नाही...'

बाबासाहेबांचा आवाज आता खूप चढला होता. त्यांचे नेत्र संतापाने *धगधगत होते. एकदम हात उंचावून ते म्हणाले,*

'मी हिंदुधर्मांत जन्माला आलो हे माझे मी मोठे दुर्दैव समजतो, पण त्याला माझा इलाज नव्हता....

ते एक क्षणभर थांबले. समोरच्या भव्य समुदायाकडे अथपासून इति-पर्यंत एक क्षणमात्र नजर टाकली आणि ते पुढे म्हणाले,

'आजच्या या घटकेला मी अशी घोर प्रतिज्ञा करतो की, मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही...'

त्यांच्या या शब्दांनी हजारो प्रतिनिधींच्या अंतःकरणाचा थरकाप झाला, परंतु जणू काही त्यांना आपल्या मनातलेच कोणीतरी बोलल्यासारखा भास झाला. क्षणभर कित्येकांना आपण स्वप्नात असल्यासारखे वाटले. एकदम प्रचंड स्फोट व्हावा, अचानक धरणीकंपाचे हादरे बसावेत असे वाटले आणि दुसऱ्याच क्षणी त्या क्रांतिकारक विचारांनी त्यांची मने भारून गेली व उभे राहून त्यांनी आपल्या नेत्याचा जयजयकार केला.

गेली कित्येक वर्षे धुमसत असलेल्या अस्पृश्यांच्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा असा अचानक स्फोट झाला आणि त्याच्या लहरी वायुवेगाने वृत्तपत्रांतून साऱ्या जगामध्ये पसरल्या. अशनिपात व्हावा तशी हिंदूंची अवस्था झाली. सनातनी मंडळींनी मात्र पीडा गेली, आता आमची देवळे 'सुरक्षित राहतील' या कल्पनेने निःश्वास टाकला.

ही घोषणा आततायीपणाची आणि अविचाराची आहे, अशा अर्थाच्या टीकेचा डॉ. आंबेडकरांवर सगळीकडून एकदमच भडिमार होऊ लागला आणि मुसलमान, ख्रिश्चन, शिख इत्यादी धर्मपंथांच्या तोंडाला त्यामुळे पाणी सुटून जो तो अस्पृश्यांना आपल्या कळपात ओढण्याची खटपट करू लागला.

धर्मांतराच्या घोषणेमुळे बाबासाहेबांवर हिंदुस्थानातून चारी बाजूंनी शिव्याशापांचा वर्षाव होऊ लागला. गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे पुढारी म्हणून आंबेडकरांबरोबर भाग घेणाऱ्या रा. ब. श्रीनिवासन यांना धर्मांतराची

कल्पना पटली नाही. हिंदुधर्मात राहूनच आपल्या हक्कासाठी आपण सतत लढा दिला पाहिजे, असे ते म्हणाले. काँग्रेसपक्षीय अस्पृश्य पुढाऱ्यांनी आंबेडकरांच्या या निर्णयाचा निषेध केला. आंबेडकर अस्पृश्याना विनाशाप्रत नेताहेत, अशी यांनी हाकाटी सुरू केली.

त्याचवेळी लाहोरच्या जातपात-तोडक मंडळ नावाच्या सभेने त्यावर्षीचे परिषदेचे अध्यक्षपद बाबासाहेबांना बहाल केले आणि बाबासाहेब त्यासाठी भाषण तयार करण्यात दंग झाले. परंतु लाहोरच्या सभेच्या कार्यकर्त्यांमध्ये दोन तट पडले. 'आंबेडकरांच्या भाषणातील विचार फार भयंकर असतील. आपल्या व्यासपीठावरून त्यांची भयंकर विचारसरणी प्रसृत करण्यास संधी देत मूर्खपणाचे ठरेल' असे काही जण म्हणू लागले. बाबासाहेबांच्याकडे म्हणूनच भाषणाच्या लेखी प्रतीची आगाऊ मागणी झाली. ते भाषण वाचून कार्यकर्ते खरोखरच अस्वस्थ झाले आणि त्यांनी परिषद लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेतला. बाबासाहेबांनी स्वखर्चाने त्या भाषणाच्या हजारो प्रती निरनिराळ्या भाषेत काढून त्या वाटल्या.

म. गांधीपासून बहुतेक पुढाऱ्यांनी त्यावर टीकेची झोड उठवली.

धर्मांतराची घोषणा बाबासाहेबांनी मोठ्या आवेगाच्या भरात केली असली तरी त्याच्या पाठीमागची संपूर्ण भूमिका आपल्या बांधवांना समजावून सागणे त्यांना अगत्याचे वाटले. कारण गावोगावी सभा भरून अस्पृश्य समाज धर्मांतराचे ठराव करीत होता आणि स्पृश्य हिंदू मंडळी त्यांना वेडेवाकडे प्रश्न विचारून भांबावीत होती.

खुद्द आंबेडकरांना येवल्याहून परत येताना वसई येथे प्रख्यात हिंदुधर्म-सुधारक मसूरकर महाराज भेटले होते व त्यांच्याशी झालेल्या भेटीत या प्रश्ना-संबंधी त्यांनी प्रदीर्घ चर्चा केली होती.

'हिंदुधर्मावर तुम्ही अशा प्रकारे मोठा आघात करीत आहात. त्यामुळे हिंदुधर्माची चांगलीच खच्ची होईल!' ते कळकळीने सांगत होते.

'पण याला हिंदुधर्मच जबाबदार नाही का? त्यानी आम्हांला थोडी तरी सहानुभूती दाखविली आहे का? त्याने तरी इतके मुर्दाड का व्हावे?'

'आंबेडकर, चार हजार वर्षांचे संस्कार चार दिवसांत कसे निघून जातील?'

'पुन्हा तेच? प्रत्येकजण मला सारखे हेच सांगतो आहे. गांधी आणि

सावरकर म्हणतात की आता अस्पृश्यता शेवटचे घटके मोजते आहे. हा शुद्ध भ्रम आहे. आमच्या दहा वर्षांच्या झगड्याने हिंदूंच्या मनोवृत्तीत एवढाही बदल झाला नाही. अहो हिंदूंच कशाला ? आम्ही काही दिवसांपूर्वी दौलताबादेचा किल्ला पाहावयास गेलो होतो, तेथे तळ्यातील पाण्यास हात लावला तर एक घाणेरडा मुसलमान पहारेकरी 'धेड' म्हणून माझ्यावर चालून आला आणि त्याने गावातले सर्व मुसलमान जमवून आमची छीऽथू केली. ह्या जुम्मेके जुम्मे आंघोळ करणाऱ्या मुसलमानालाही हा आंबेडकर इतका नीच वाटावा ना ? समाजाच्या मनात किती खोलवर ही भावना रुजलेली आहे, हे रोज माझ्या अनुभवास येत आहे. माझ्या आयुष्यातील शेकडो अपमानास्पद गोष्टी तुम्हांस सांगितल्या तर मी अद्याप हिंदुधर्मात का राहिलो, असेच तुम्हांस वाटेल. अहो मी त्या गांधींना भेटायला गेलो, तेव्हा पहिल्या भेटीत माझ्या बोलण्यावरून मी कोणी ब्राह्मण आहे असे त्यांना वाटले होते म्हणे ! कित्येकवेळा अशा मानभंगांच्या प्रसंगी मी दरवाजे बंद करून दिवसदिवसभर अस्वस्थ, निराश होऊन बसलो आहे. कोणीही कितीही सांत्वन केले तरी हा कलंक फार भयंकर आहे हो ! त्याचे चटके फार दाहक असतात.'

'आंबेडकर, मला तुमच्या व्यथांची संपूर्ण जाणीव आहे. पण हिंदुधर्माला सुधारण्याचा एखादा मार्ग यातूनच तुम्हांला सुचत नाही का ? सर्वव्यापी आणि पुरातन हिंदुसंस्कृतीची जोपासना करण्याचे कर्तव्य आपल्या सर्वांचेच नाही का ?'

'आमच्या बाबतीत जोपर्यंत हिंदुसमाज कोणतेच कर्तव्य पाळायला तयार नाही, तोपर्यंत यापुढे आम्हीही कोणत्याही कर्तव्याला बांधले जाणार नाही.'

'ठीक आहे. पण हिंदूंनी सध्या ताबडतोब काय करावे म्हणजे तुम्ही आपला निर्णय फिरवू शकाल ?'

'हिंदुसमाज एकदम काही करायला तयार होईल असे मला वाटत नाही. तरीही त्यांच्या वृत्तीत कोणता फरक या घोषणेने पडणार आहे, हे मी पाहीन. अजूनही त्यांना संधी आहे. नीट विचार केल्याखेरीज आततायीपणाने मी दुसऱ्या कोणत्याही धर्माला कवटाळणार नाही. पण विचारलेतच म्हणून मीही विचारतो, 'आमच्यापैकी एखाद्या सुशिक्षित, नीतिमान, आदर्श अशा अस्पृश्याला शंकराचार्यांच्या गादीवर काही दिवस बसवायला तुम्ही तयार व्हाल का ते सांगा ? मी म्हणतो, तुम्ही का तयार होऊ नये ?'

मसूरकर महाराजानंतर आणखी कितीतरी मोठमोठ्या व्यक्तींबरोबर अशाच प्रकारच्या चर्चा झाल्या. पुणे, नाशिकरोड, मुंबई येथे अस्पृश्यांच्या मोठमोठया सभा झाल्या आणि शेवटी ३०-३१ मे १९३६ रोजी मुंबई इलाखा अखिल महार परिषदेमध्ये त्यांनी विस्ताराने आपल्या धर्मांतरामागची भूमिका विशद केली.

या भूमिकेमध्ये अस्पृश्यांचा जागोजागी कसा छळ होतो आहे, याचे त्यांनी चित्र रेखाटले आणि हा सर्व छळ वर्गकलहामुळे घडतो आहे, याची त्यांना जाणीव दिली. हिंदुधर्मातील सहानुभूतिशून्यता, संकुचितता, विशिष्ट वर्गाची मिरासदारी आणि व्यक्तित्वविकासाची गळचेपी यांबद्दल त्यांनी अस्पृश्यांना समजेल अशा भाषेत विवेचन केले आणि आपल्या धर्मांतरामुळे दलितांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व व्यावहारिक बाबतीत कोणकोणती स्थित्यंतरे घडून येण्याची शक्यता आहे, त्याचेही मार्गदर्शन केले. शेवटी ते म्हणाले,

'मी तर माझ्या दृष्टीने धर्मांतर करण्याचा पक्का निश्चय केला आहे. माझे धर्मांतर कोणत्याही प्रकारच्या ऐहिक लाभाकरिता नाही, निखळ आध्यात्मिक भावनेशिवाय माझ्या धर्मांतराच्या मुळाशी दुसरी कुठलीच भावना नाही. हिंदुधर्म माझ्या बुद्धीला पटू शकत नाही, माझ्या स्वाभिमानाला रुचू शकत नाही. तुम्हांला मात्र आध्यात्मिक तसेच ऐहिक लाभाकरिता देखील धर्मांतर करणे आवश्यक आहे. काही लोक ऐहिक लाभाकरिता देखील धर्मांतर करण्याच्या कल्पनेचा उपहास करतात. मेल्यावर आत्म्याचे काय होईल हे सांगणारा धर्म श्रीमंतांच्या उपयोगाचा आहे. पण ज्याची अमुक एका धर्मात राहिल्यामुळे राखरांगोळी झाली आहे, जे अन्नवस्त्राला मोताद झाले आहेत, ज्यांची माणुसकी नाहीशी झाली आहे, त्या लोकांनी धर्माचा ऐहिक दृष्ट्या विचार करू नये तर काय डोळे मिटून आकाशाकडे पाहावे? या गर्भश्रीमंत रिकामटेकड्यांच्या वेदांताचा गोरगरीबांना काय उपयोग?......

'हा निर्वाणीचा प्रसंग आहे. मात्र ध्यानात ठेवा. तुम्ही आज स्वतंत्र होण्याचा निश्चय केलात तर भावी पिढी स्वतंत्र होईल. तुम्ही आज पराधीन होण्याचा निश्चय केला तर भावी पिढीसुद्धा पराधीन राहील...

'तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा, पृथ्वीप्रमाणे परप्रकाशित होऊ नका! स्वतःवरच विश्वास ठेवा. दुसऱ्या कोणाच्या अंकित होऊ नका!

सत्याला धरून राहा ! सत्याचाच आश्रय करा व दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका ! ' या भगवान गौतमबुद्धाच्या मरणापूर्वी आपल्या शिष्यास केलेल्या उपदेशाची मला आज आठवत येते. मी तुम्हांला हाच उपदेश या प्रसंगी करीत आहे. '

परिषदेतील साऱ्या महार समाजाने बाबासाहेबांच्या पाठीमागून ते सांगतील त्या धर्मात सर्वांनी एकजात प्रवेश करण्याचे त्यांना आश्वासन दिले. बाबासाहेबांना त्याबद्दल आता मुळीच शंका नव्हती.

त्यांच्या धर्मांतराच्या घोषणेने अस्वस्थ झालेल्या काही धनिक काँग्रेस-जनांनी मोठ्या प्रयत्नाने दोन महिन्यांपूर्वी शेगाव येथे महात्माजी व बाबासाहेब यांची भेट घडवून आणली होती. त्यावेळी 'तुम्ही गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये या. तुम्हाला हवा तेवढा पैसा अस्पृश्यांच्या उद्धारासाठी देऊ ' असे त्यांना सांगण्यात आले. परंतु आंबेडकरांनी या गोष्टीस नकार दिला होता. वर्धा स्टेशनवर त्यांच्या दर्शनासाठी बघता बघता हजारो लोक उन्हातान्हात जमा होऊन त्यांची वाट पाहात होते. हे पाहून एक धनिक उद्‌गारले.


' आम्ही यांच्या उद्धारासाठी लाखो रुपये खर्चून मोठमोठे कार्यक्रम हाती घेतले आहेत. परंतु हा समाज आमच्या पाठीमागे येत नाही. उलट तुमच्या नुसत्या दर्शनाने तो उचंबळून येतो हे मोठे आश्चर्यच आहे. '

' बाबांनो आपली आई कोणती आणि दाई कोणती हे नुकत्याच जन्माला आलेल्या अर्भकालाही समजते. '

ते हसत म्हणाले होते.

# ८. नव्या युगाचा ‘नवा मनु’ हा !

१९३६ मध्ये डॉ. बाबासाहेबांचे नाव त्यांच्या धर्मांतराच्या घोषणेने सारखे दुमदुमत होते. त्यांना निरनिराळ्या धर्मांचे प्रतिनिधी भेटत होते आणि प्रदीर्घ चर्चा करीत होते. वृत्तपत्रांतून नित्य नव्या अफवा उठत होत्या आणि वृत्तपत्रे त्यांच्यावर मोठ्या आवेशाने तुटून पडत होती. बाबासाहेब निरनिराळ्या धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यात दंग झाले होते. ख्रिस्ती, शीख व मुस्लिम या धर्मांपैकी कोणत्या तरी एका धर्माची निवड करावयाची अशी त्यांची धारण होती. परंतु मुस्लिम धर्म अत्यंत असहिष्णू व संकुचित विचारांचा म्हणून त्यांच्या मनातून सर्वांत अगोदर उतरला होता. ज्ञान-विज्ञानाच्या बाबतीत मुसलमान समाज फारच मागासलेला आणि लोकशाही व विचारस्वातंत्र्य या बाबतीत त्यांच्या धर्मानेच त्यांच्या मार्गात अनेक अडसर उभे केले असल्यामुळे मुसलमानांचा धर्म स्वीकारण्यात काही अर्थ नव्हता. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी लोकसेवेचे मोठे कार्य या देशात केले असले तरी दक्षिणेत जातिभेद नष्ट करण्याबाबतीत हा धर्म अपेशी ठरला होता आणि



हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म यांच्यांत संस्कृतीच्या दृष्टीने फार मोठे अंतर होते. म्हणूनच सुरुवातीस बाबासाहेबांचे लक्ष शीख समाजाकडे लागले होते. शीख जमात ही लढाऊ, उद्योगी व महत्त्वाकांक्षी जमात होती आणि त्यांचा धर्म हिंदु-संस्कृतीला जवळचा होता. शीख जमातीच्या पुढाऱ्यांनी डॉ. बाबासाहेबांना त्यांच्या धर्माचे जवळून निरीक्षण करण्यास आमंत्रण दिले व त्याप्रमाणे दलित समाजातील सोळा कार्यकर्त्यांची तुकडी अमृतसरला पाठविण्यात आली. त्यामध्ये बाबासाहेबांचा मुलगा यशवंत व पुतण्या मुकुंद यांचाही समावेश होता.

त्याच वेळी धर्मांतराच्या प्रश्नाची तीव्रता कमी होण्यासारख्या दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. त्यातील पहिली म्हणजे म्हैसूर संस्थानच्या महाराजांनी दसरा महोत्सवात सर्व अस्पृश्य जातींना भाग घेण्यासाठी मोकळीक दिल्याचे जाहीर केले आणि त्या पाठोपाठ त्रावणकोर संस्थानच्या प्रधानांनी राज्यातील सर्व मंदिरे अस्पृश्यासाठी यापुढे खुली असल्याचे पत्रक काढले. या घटनांनी बाबासाहेब आनंदाने फुलून गेले.



नंतर लगेच ब्रिटिश पार्लमेंटने १९३५ चा कायदा भारताला लागू केल्याचे जाहीर केले. त्यामुळे देशातील निरनिराळ्या प्रांतांना स्वायत्त अधिकार प्राप्त होणार होते. म्हणजे आता निरनिराळ्या प्रांतांत निवडणुकांच्या नौबती झडणार होत्या व देशातील निरनिराळे पक्षोपपक्ष पहिल्यांदाच या निवडणुकीच्य रिंगणात उतरणार होते. राज्यातील अस्पृश्य जमातीच्या दृष्टीने राजकीय क्षेत्रात जोरदार हालचाल करण्याची ही मोठी संधी होती. देशामध्ये काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्या पाठोपाठ अस्पृश्य संघटनेला महत्त्व होते. परंतु पुणे करारानुसार अस्पृश्यांची चांगलीच कोंडी झाली होती. जातीय निवाड्यानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाला होता तरी त्यांना निवडून येण्यासाठी संयुक्त मतदार संघाच्या तोंडाकडे पाहावे लागत होते. आपला स्वःतचा उमेदवार निवडण्याबाबतीत अस्पृश्यांचा अधिकार कायमचा हिरावून घेण्यात आलेला होता. अस्पृश्य उमेदवारांना त्यामुळे आपला स्वाभिमान टिकविता येणार नाही, असे बाबासाहेबांना वाटत होते. महात्मा गांधींनी अशा रीतीने उपवासाच्या निमित्ताने बाबासाहेबांवर मात केली होती. पुणे करारामुळे बाबासाहेब व त्यांची प्रजा यांचे पंख उपटल्यासारखी अवस्था झाली होती व्हिएन्ना येथे विश्रांती घेण्याच्या निमित्ताने चार दिवस राहून बाबासाहेब हा निर्णय फिरविता येतो का हे पाहण्यासाठी लंडनपर्यंत जाऊन आले, परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. 'बाबासाहेबांनी विलायतेमध्ये एका इंग्रज बाईबरोबर लग्न केले आहे' अशी खोडसाळ वार्ता वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली होती, ही गोरी मडम पाहण्यासाठी म्हणूनच बंदरावर प्रचंड जमाव जमला होता. बोटीतून उतरल्यावर बाबासाहेबांना ज्यावेळी ही बातमी समजली त्यावेळी ते म्हणाले, 'मी अशी कोणतीही गोष्ट चोरून करीन असे वाटले कसे तुम्हांला ?'

लंडनहून परत आल्यानंतर त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे ठरविले. राज्यामध्ये काँग्रेस पक्ष हा अत्यंत प्रभावी व प्रबळ होता. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याने केलेल्या चळवळीमुळे हिंदू बहुसंख्य असतील तेथे काँग्रेस हटकून निवडून येणार होती. देशातील मोठमोठ्या धनिकांचा तिला पैशाचा भरपूर पाठिंबा होता, त्यामुळे निवडणुकीची प्रचंड यंत्रणा राबविण्यात तिला सर्व तऱ्हेने वातावरण अनुकूल होते. काँग्रेस ही विनाविरोध व प्रचंड मताधिक्याने निवडून येणार हे उघडच होते. इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत देशात

राहिलेल्या बाबासाहेबांना आपल्या देशात एकपक्षी आणि एकांगी लोकशाही निर्माण होणे धोक्याचे वाटले. लोकशाही देशात सत्ताधारी पक्षाकडून काही महत्त्वाचे कार्य होण्यासाठी जागरूक असा प्रबळ विरोधी पक्ष हवा, या व्यापक भूमिकेने प्रेरित होऊन बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. धनिकांच्या पाठिंब्यामुळे कॉंग्रेसपक्ष त्यांच्या आहारी जाणार हे स्पष्टच दिसत होते. म्हणून मजुरांचे, गोरगरिबांचे, दीनदलितांचे हितसंबंध पाहण्याचे आश्वासन या नव्या मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात देण्यात आले.

हा स्वतंत्र मजूर पक्ष देशातील मागासलेल्या शेतीपद्धतीच्या जागी नवीन सहकारी तत्त्वावर शेतीसुधारणेचा कार्यक्रम हाती घेऊन देशातील अन्नधान्यनिर्मितीत सुधारणा करणार होता आणि शेतकरी व कामगार यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार होता. सामाजिक सुधारणा, ग्रामीण पुनर्रचना आणि राज्यकारभार इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींकडे अधिकाधिक लक्ष देऊन देशामध्ये समतेचे वातावरण निर्माण करणार होता. मोफत व सक्तीचे शिक्षण जारी करणार होता. प्रांतिक विद्यापीठे स्थापिणार होता आणि कराचा कमीत-कमी बोजा गरीबांवर पडेल याची दक्षता घेणार होता.

नुसती आश्वासने देऊन अधिकारग्रहण करण्याची भूमिका या जाहीर-नाम्यामागे नव्हती. कारण बहुमताने निवडून येण्याची शक्यता फार कमी होती. परंतु आपल्या प्रचाराचे सामर्थ्य अजमावून पाहण्याची आणि अशिक्षित मतदारांमध्ये राजकीय हक्कांबद्दलची जागृती निर्माण करण्याची ही एक संधी होती. त्यामुळे बाबासाहेबांनी या निवडणुकीत प्रचाराची धमाल उडविली. दौरे काढून आणि झंझावाती व्याख्याने देऊन त्यांनी सारा मुंबईप्रांत ढवळून काढला. त्यांच्या या अविरत प्रयत्नामुळे आणि जिद्दीमुळे स्वतंत्र मजूरपक्षाच्या १७ उमेदवारां-पैकी १५ उमेदवार प्रचंड मते पडून निवडून आले. कॉंग्रेसने सत्ताग्रहण केले आणि जमनादास मेहता व डॉ. आंबेडकर विरोधी पक्षातील प्रमुख नेते म्हणून कायदेमंडळात गर्जू लागले. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि विधायक टीकेचा भडिमार करणाऱ्या भाषणांनी कॉंग्रेस पुढाऱ्यांना सत्तास्वीकार म्हणजे साधेसुधे काम नसून जबाबदारीने आणि कर्तव्यनिष्ठेने भरलेली सुळावरची पोळी आहे, याची जाणीव होऊ लागली.

विरोधी पक्षनेते म्हणून बाबासाहेबांनी कायदेमंडळात सदैव राज्यातील गोरगरिबांची कैफियतच मांडण्याचे कार्य केले. त्यांनी १९३७ च्या ऑगष्टमध्ये

कायदेमंडळात 'खोती बिल' मांडले. कोकणातील खोतांनी मागासलेल्या जमातीच्या लोकांवर वर्षानुवर्षे गुलामगिरी लादली आहे, तीतून त्या जनतेला मुक्त करण्यासाठी खोतीशाही नष्ट करणे आवश्यक आहे, म्हणून त्यांनी चळवळ सुरू केली. त्यांच्या हाकेला ओ देऊन राज्यातील असंख्य मजूर व गरीब शेतकरी मुंबईस जमले आणि त्यांनी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली विधान-सभेवर प्रचंड मोर्चा नेला. आपल्या हक्कांची जाणीव अत्यंत मागासलेल्या जमातीपर्यंत पोचविण्यात बाबासाहेबांना या बिलामुळे मोठे यश मिळाले महारवतनावर नवा कर लादण्याच्या सरकारी निर्णयाविरुद्धही बाबासाहेबांनी प्रचंड आंदोलन उभारून हे कर रद्द करून घेतले.

मजूर पुढारी म्हणून बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे दर्शन आणखी एका घटनेमुळे देशाच्या चांगल्या रीतीने निदर्शनास आले. आपल्या मागण्यांसाठी कामगारवर्ग जे संप करतो, ते बेकायदेशीर ठरविण्यासाठी काँग्रेसपक्षाने एक बिल मांडले. आंबेडकरांनी 'काळा कायदा' असे त्या बिलास नाव दिले आणि प्रतिकाराची सिद्धता केली. आपल्या मागण्यासाठी संप करणे हा मजुरांचा हक्क आहे, असे त्यांनी जोरदार प्रतिपादन केले. हट्टाने हे बिल राज्यकर्त्यांनी मंजूर केले तेव्हा आंबेडकरांनी मजूर आघाडीतर्फे दि. ७ नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबईत प्रचंड संप घडवून आणला. वातावरण तंग झाले व शेवटी पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यामुळे परिस्थिती आणखीनच चिघळली. या संपामुळे लोकशाहीची बतावणी करणारे काँग्रेस सरकार लोकनिष्ठ नसून धनिकांची पाठीराखे आहे, हे कटु सत्य त्यांनी जनतेच्या गळी उतरविले. या चळवळीकडे संपूर्ण लक्ष देता यावे म्हणून त्यांनी सरकारी महा-विद्यालयातील प्राचार्यपदाचा राजीनामा देऊन टाकला.

शेतकरी कामकऱ्यांना संघटित करण्याची डॉ. आंबेडकरांची ताकद पाहून इंग्रजी सत्तेविरुद्ध झगडण्यासाठी त्यांनी काँग्रेसपक्षात यावे असे प्रयत्न झाले. परंतु आंबेडकरांनी नकार दिला.

अशा रीतीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या काँग्रेसपक्षाविरुद्ध दोन हात करण्यामध्ये बाबासाहेब या काळामध्ये दंग होते. चळवळी, दौरे, व्याख्याने आणि देशातील राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करण्याची जिद्द यामुळे त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत होती. त्यातच दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि अधिकारावर असलेल्या प्रांतिक मंत्रिमंडळांचा सल्ला न घेताच

इंग्रजांनी हिंदुस्थानला युद्धात ओढले. या घटनेने अपमानित होऊन कॉंग्रेस पक्षाने अधिकारपदाचा त्याग केला आणि मंत्रिपदाचे राजीनामे दिले. बॅ. जिना व त्यांच्या मुस्लिम लीगला त्यामुळे मोठा आनंद झाला व त्यांनी मुक्तिदिन साजरा केला.

१९४०च्या सुमारास युद्धाला चांगलेच तोंड फुटले. आपल्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही, असे दिमाखाने सांगणारे राष्ट्र आता झपाट्याने मावळतीला लागले होते. आर्थिकदृष्ट्या या युद्धात समर्थपणे शत्रूशी मुकाबला करण्याची ताकद राहिली नव्हती आणि मनुष्यबळाच्या दृष्टीने तिची सारी मदार हिंदुस्थानवर होती. आपल्याबरोबर हिंदुस्थानचे स्वातंत्र्य धोक्यात आहे म्हणून कोणत्याही अटी न लादता हिंदुस्थानने युद्धात उतरावे, अशी तिची इच्छा होती. कॉंग्रेसने परिस्थितीचा अंदाज घेतला आणि मोठ्या मुत्सद्देगिरीचा डाव टाकला. अगोदर देशाच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्याची मागणी केली. सरकारने चिडून त्यामुळे देशात दडपशाही सुरू केली. सरकारच्या युद्धप्रयत्नात सामील न होता उलट या देशात इंग्रजांना राज्य करणे अशक्य व्हावे म्हणून शांततेच्या मार्गाने असहकाराची चळवळ गांधीजींनी सुरू केली. त्यामुळे देशातील तुरुंग तुडुंब भरून गेले. अशा वेळी मुस्लिमलीग आणि तिचे संधिसाधू पुढारी बॅ. जिना यांचे फावले. त्यांनी मुस्लीम बहुसंख्य वस्ती असलेल्या प्रांतांसाठी स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीचे घोडे पुढे दामटून आपल्या फुटीर प्रवृत्तीने देशातील ऐक्याला सुरुंग लावला. अशा वेळी डॉ. आंबेडकरांनी आपले पाकिस्तानबद्दलचे विचार पुस्तकरूपाने पुढे मांडले. त्यांनी हिंदुस्थानची फाळणी होणे अपरिहार्य आहे, असे घोषित केले. गेली कित्येक वर्षे कॉंग्रेस मुसलमानांची मनधरणी करीत आहे, त्यांना हवे ते मुकाट्याने देण्याची तयारी दर्शवीत आहे, तरीही मुसलमान पुढारी ज्या पद्धतीने वागत आहेत, त्यावरून स्वतंत्र हिंदुस्थानात ते एकत्र नांदणार नाहीत हे उघड होते. त्यांना पाकिस्तान देऊन टाकल्यानेच या खंडात लोकशाहीचे युग सुरू होईल, असे मोठे सूचक भाष्य त्यांनी केले. कडव्या धर्मवेडामुळे पाकिस्तान सांस्कृतिक दृष्ट्या, शैक्षणिक दृष्ट्या सदैव मागासलेलाच राहील, आणि तेथे लोकशाही रुजणार नाही, हे त्यांनी या पुस्तकात अतिशय प्रभावीरीत्या जनतेसमोर मांडले होते.

लवकरच दुसऱ्या महायुद्धाला तीव्र स्वरूप आले. जर्मन सेना पुढे पुढे सरकू लागल्या. राष्ट्रामध्ये चैतन्य निर्माण करणारा चर्चिलसारखा नेता

जनतेच्या पाठीमागे उभा होता म्हणून इंग्लंड कसेबसे धैर्याने उभे होते, परंतु सारे राष्ट्र युद्धाच्या खाईत सारखे होरपळले जात होते. व्हाइसरायने परिस्थिती दिवसेदिवस चिघळत असलेली पाहून आपल्या सल्लागारसमितीत येण्यासाठी देशातील प्रमुख अशा आठ व्यक्तींना आमंत्रण दिले. या समितीत जावे की नाही या प्रश्नावर काँग्रेसमध्येही दोन तट पडले. या समितीत प्रवेश करणाऱ्यांची देशद्रोही म्हणून काँग्रेसने बोळवण केली. तरीही आंबेडकरांनी व्हाइसरायचे आमंत्रण स्वीकारले आणि ताबडतोब अस्पृश्यांच्या लष्करभरतीचे बंधन दूर सारून महार तरुणांना लष्करात भरती होण्यासाठी आवाहन केले. आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांना लष्कराची दारे उघडी झाली आणि ताबडतोब लष्करामध्ये महार पलटणी उभ्या राहिल्या. या पलटणींनी दुसऱ्या महायुद्धात व देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काश्मीर आघाडीवर फार मोठा पराक्रम करून देशाचे नाव राखले.

हिंदुस्थानातील असंतोष काँग्रेसने चांगलाच पेटविला होता आणि राज्यसकट हाकणे दिवसेदिवस कठीण होत होते. आता स्वराज्य दिल्याखेरीज गत्यंतर नव्हते म्हणून इंग्लंडने स्वराज्याची बोलणी करण्यासाठी सर स्टॅफोर्ड क्रिप्स या मुत्सद्याला हिंदुस्थानात पाठविले. त्यांनी आपली ‘ क्रिप्स योजना ’ हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांसमोर मांडली. ती कोणालाच मान्य झाली नाही. ते आले तसेच हात हालवीत परत गेले. इकडे व्हाइसरायने आपल्या मंत्रि-मंडळात वाढ केली आणि बाबासाहेबांची मजूरमंत्री म्हणून नेमणूक केली.

काँग्रेसने त्यानंतर लगेच ‘ चले जाव ’ चा ठराव करून देशव्यापी आंदोलनास सुरुवात केली. अगोदरच अस्वस्थ झालेल्या ब्रिटिश सरकारने असहाय होऊन दडपशाही अवलंबिली. पण त्यामुळे देशात असंतोष परा-कोटीला गेला आणि सगळीकडे स्फोटक वातावरण निर्माण झाले. चळवळीला हिंसक स्वरूप आलेले पाहून गांधीजींनी तुरुंगातच २१ दिवसांचे उपोषण करून साऱ्या जगाचे लक्ष पुन्हा आपल्याकडे वेधून घेतले.

काँग्रेस लोकप्रियतेच्या शिखरावर होती. अशा वेळी आंबेडकर मजूर-मंत्री झाले होते. त्यांच्यावर टीकेचा गदारोळ उठणार हे उघडच होते, तरीही धैर्याने आंबेडकरांनी मंत्रिपद स्वीकारून देशातील मजुरांचे हितसंबंध सुधारण्यासाठी अधिकारपदाचा स्वीकार केला होता. त्यांच्या नेमणुकीने देशातील दलित समाजाला आनंदाचे भरते आले होते आणि त्यांनी बाबासाहेबांवर

अभिनंदनाचा वर्षाव केला. मजूरमंत्री म्हणून काम करीत असतानाच ‘ गांधींनी आणि काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काय केले ? ’ हा ग्रंथ लिहून त्यांनी काँग्रेसच्या गोटात खळबळ उडवून दिली होती. ‘ शूद्र मूळचे कोण ? ’ व ‘ अस्पृश्य कोठून आले ? ’ हे दोन संशोधनात्मक ग्रंथ लिहून बाबासाहेबांनी आपल्या विद्वत्तेने जगांतील विद्वानांचे, संशोधकांचेही लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

क्रिप्स हिंदुस्थानात येऊन गेला तेव्हाच भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी आता लवकरच घटनासमितीची स्थापना होणार हे निश्चित झाले. बाबासाहेबांनी १९३६ पासूनच्या आपल्या राजकीय जीवनाचा आढावा घेतला तेव्हां मजूर पुढारी म्हणून आपले कार्य मुंबई राज्यापुरते मर्यादित झाले होते, हे त्यांच्या लक्षात आले. मजूरमंत्री म्हणून देशाचे भवितव्य काही प्रमाणात त्यांच्या हाती असले तरी देशामध्ये मजुरांच्या अनेकविध संघटना होत्या आणि साऱ्या देशातील अस्पृश्यवर्ग अद्याप संघटित नव्हता. देशाच्या घटनेमध्ये त्याला योग्य ते अधिकार मिळण्यासाठी सगळ्या देशातील अस्पृश्य संघटनांचे एकीकरण करणे अवश्य होते, म्हणून त्यांनी १९४२ मध्ये देशाच्या साऱ्या अस्पृश्य नेत्यांची दिल्लीत सभा घेतली व अखिल भारतीय स्वरूपाच्या ‘ शेडयूल्ड कास्ट फेडरेशन ’ ची स्थापना केली व निरनिराळ्या ठिकाणी तिची प्रचंड अधिवेशने भरविली.

युद्धपरिस्थिती आटोक्यात आली आणि इंग्लंडमध्ये मजूरपक्ष अधिकारावर आला आणि त्याने भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी पुढची पावले टाकली. क्रिप्स, अलेक्झांडर आणि लॉरेन्स या तिघांचे एक शिष्टमंडळ हिंदुस्थानात आले आणि हिंदुस्थानात १९४६ मध्ये सार्वत्रिक निवडणुका घेऊन सत्तांतर करण्याचे ठरले. अस्पृश्यांना आपला उमेदवार निवडण्याचा हक्क असावा यासाठी पुणे करारापासून सुटका करून घेण्याचे बाबासाहेबांनी लंडनला जाऊन खूप प्रयत्न केले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

देशाला स्वातंत्र्य मिळणार म्हणून देशभर उत्साहाची लाट पसरली होती. अशा वेळी काँग्रेसपक्षाविरुद्ध दंड थोपटून मुस्लिम लीग व शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले. हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतांत काँग्रेसला आंबेडकरांच्या पक्षाचाच विरोध होता, परंतु संयुक्त मतदार संघामुळे फेडरेशनच्या पक्षाचे भवितव्य बहुसंख्य हिंदूंच्याच हाती होते. काँग्रेसचे विरोधक म्हणजे ‘ देशद्रोही ’ असे वातावरण काँग्रेसने

सगळीकडे निर्माण केले होतेच, त्यामुळे या निवडणुकीमध्ये स्पृश्य समाजाने अस्पृश्यांवरचा सारा राग उगवून घेतला. त्यांनी खेडोपाडी अस्पृश्यांना मतदान केंद्रांवर येऊ दिले नाही. त्यांना काँग्रेसविरुद्ध मते दिल्यास बहिष्कृत करण्याची धमकी दिली व काही ठिकाणी मारहाणीचेही प्रकार घडले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. निवडणुकीत आंबेडकरांच्या पक्षाचा प्रचंड पराभव झाला.

हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतांत काँग्रेस व मुस्लिम बहुसंख्य असलेल्या प्रांतांत मुस्लिम लीग यांची हंगामी मंत्रिमंडळे अधिकारावर येणार हे जाहीर झाले. आंबेडकरांनी मजूरमंत्रिपद सोडले व व्हाइसरायचा निरोप घेतला. त्यांना जणू काय खिजविण्यासाठीच काँग्रेसने जगजीवनराम व लीगने जोगेंद्रनाथ मंडळ या अस्पृश्य पुढाऱ्यांना मंत्रिमंडळात घेतल्याचे जाहीर करण्यात आले.

देशातील राजकारण आणि निवडणुका यामुळे बाबासाहेबांच्या प्रकृतीवर सारखा ताण पडत गेला. दौरे आणि भाषणे यांमुळे खाण्यापिण्याची सारखी आबाळ होत राहिली. त्यामुळे मधुमेहाच्या विकाराने त्यांच्या शरीरात ठाण मांडले. निवडणुकांतील अपयशाने तर अस्पृश्यांचे प्रश्न मागे पडताहेत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

या घोर निराशेने ते खचले नाहीत किंवा त्यांना आपल्या कर्तव्याचे विस्मरण झाले नाही. घटनासमितीवर तशाही परिस्थितीत निवडून येण्यासाठी त्यांनी दंड थोपटले. काँग्रेसने ते निवडून येऊ नयेत म्हणून चांगलीच खटपट केली परंतु बंगालमधून तरीही ते घटनासमितीवर निवडून आले.

या घटनासमितीमध्ये बाबासाहेबांनी जे पहिलेच भाषण केले, त्यावरून ते देशाच्या हितासाठी सदैव जागरूक राहणारे श्रेष्ठ मुत्सद्दी व प्रखर देशभक्त आहेत, याचे राष्ट्राला पुन्हा एकदा दर्शन झाले. त्यांनी आपल्या भाषणात या देशामध्ये सामाजिक, राजकीय आणि धार्मिक परिवर्तन घडून येऊन देशात लोकशाहीचे सुस्थिर राज्य निर्माण होणार याबद्दलचा आपला ठाम विश्वास व्यक्त केला. देश आज दुभंगत असला तरी नव्या ऐक्यभावनेमुळेच, लोकशाहीमध्ये पुन्हा तो सांधला जाईल, यात कसलीही शंका नसल्याचे जाहीर केले. देशाला स्वातंत्र्य मिळत असताना पक्षोपपक्षांनी आपले क्षुद्र मतभेद आणि आपल्या मोठेपणाच्या कल्पना विसरून जाऊन देशाची आदर्श घटना

निर्माण करण्याच्या बाबतीत सर्वांनी सहकार्य द्यावे, अशी घोषणा केली. शेवटी ते म्हणाले,

'युद्धाची भाषा सध्या सारेच जण बोलू लागलेले आहेत. पण युद्ध करून या देशातील राजकीय प्रश्न मिटविण्याच्या या लोकांच्या कल्पनेने माझ्या अंगावर काटा उभा राहतो. मी आपल्याला ठामपणाने सांगतो की, आपल्याला यापुढे युद्ध करावे लागणार आहे ते मुसलमानांविरुद्ध. इंग्रज मुसलमानांचे पक्षपाती आहेत म्हणून त्यांच्याविरुद्धही कधीकाळी आपल्याला उभे राहावे लागेल, परंतु तो प्रश्न महत्त्वाचा नाही. 'मुसलमान' हाच खरा विकट प्रश्न आपल्यासमोर आहे. त्यांना जिंकून किंवा आपण केलेली घटना त्यांच्यावर लादून हा प्रश्न मिटणार नाही. कारण तसे केल्याने त्यांच्याशी नेहमी लढतच राहावे लागेल. सत्ता देणे सोपे असते परंतु शहाणपणाचा प्रकाश दाखविणे कठिणतर असते, असे बर्क म्हणतो. आपल्या सत्तेबरोबर देशातील ऐक्य सांधण्यासाठी आवश्यक असलेले शहाणपणही आपल्याजवळ आहे, हे आपण आपल्या वर्तनाने जगाला दाखवून दिले पाहिजे.'

बाबासाहेबांचे हे भाषण द्रष्टेपणाचे व दूरदर्शीपणाचे होते. त्यांच्या लढाऊ वृत्तीतील व्यापकतेचे हे अभिनव दर्शन पाहून काँग्रेस नेतेही दिपून गेले. देशाची सुधारणा होण्यासाठी झपाट्याने औद्योगीकरण का झाले पाहिजे, याबद्दलची त्यांची मीमांसाही मोठी महत्त्वाची होती. देशातील दारिद्र्याला उठाव देणारा गांधीजींचा चरखा राष्ट्रीय निशाणावरून दूर करून तेथे अशोकचक्राची स्थापना करण्यात आंबेडकरांच्या मुत्सद्देगिरीला यश मिळाले होते. गांधीजींना त्यामुळे वाईट वाटले तरी बाबासाहेबांनी युक्तिवादाने ते घडवून आणले. देशाची फाळणी होत असताना देशांच्या सरहद्दी निश्चित करण्यामध्ये देशाने कोणती खबरदारी घेतली पाहिजे व त्याच्या संरक्षणाची कोणती सिद्धता केली पाहिजे याबाबतीत त्यांनी केलेले भाषण अत्यंत मूलगामी होते. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदामंत्री म्हणून येण्याचे आमंत्रण म्हणूनच पं. नेहरूंनी त्यांना दिले.

या आश्चर्यकारक घटनेने आंबेडकरही स्तिमित झाले. स्वतंत्र भारताच्य घडणीला हातभार लावण्याची, अस्पृश्यांच्या हक्कांना कायदेशीर स्वरूप देण्याची ही एक परमेश्वरी संधी चालून आली होती. त्यांनी मोठ्या उत्साहाने होकार दिला.

बाबासाहेबांवर साऱ्या देशातून अभिनंदनाचा वर्षाव झाला.

१५ ऑगष्ट १९४७ रोजी बाबासाहेब स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले.

देशाला स्वातंत्र्य मिळाले खरे परंतु त्या पाठोपाठ हिंदुमुसलमानांच्या दंगलींचा वणवा पेटला. पंजाब, अमृतसर, लाहोर येथे रस्त्यारस्त्यांवर मुडदे पडू लागले. यावेळी बाबासाहेबांनी पंतप्रधनांच्या साहाय्याने निर्वासितांचे स्थलांतर करण्यासाठी त्वरित हालचाली केल्या.

पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी अस्पृश्यांवर जुलूमजबरदस्तीने अत्याचार करावयास सुरुवात केली. त्यावेळी बाबासाहेबांनी मुसलमान पुढाऱ्यांचा तीव्र शब्दांत धिःकार केला.

‘ मी हिंदूंविरुद्ध चळवळी करतो, याचा अर्थ मुसलमान हे आपले मित्र आहेत असे मुळीच समजू नका. ते भयंकर लोक आहेत. त्यांच्या दडपशाहीला बळी पडून मुसलमानी धर्म स्वीकारू नका. वाटेल ते करून भारतात परत या. स्वतंत्र भारताचे अभिमानी नागरीक व्हा. पाकिस्तानी नरकपुरीत गुलाम म्हणून राहू नका. ’ त्यांनी पाकिस्तानातील अस्पृश्यांना आदेश दिला. बाबासाहेबांच्या या आदेशातील देशभक्ती व भारताच्या सांस्कृतिक भूमिकेच्या जोपासनेची तळमळ पाहून देशातील साऱ्या वृत्तपत्रांनी त्यांच्या उदार व सहिष्णु भूमिके-बद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद दिले.

त्यानंतर भारताची घटना तयार करण्याच्या समितीवर त्यांना घेण्यात आले, इतकेच नव्हे तर या समितीचे प्रमुखपदही त्यांना बहाल करण्यात आले. बाबासाहेबांना अनपेक्षित असे आश्चर्याचे एकामागून एक धक्के देण्याचेच दैवाने ठरविले होते.

बाबासाहेबांनी आपले सारे सामर्थ्य पणाला लावून घटनानिर्मितीचे काम हाती घेतले.

घटना तयार करण्याच्या कामी काही सभासदांची एक समिती नेमण्यात आली असली तरी बाबासाहेबांनीच अविरत प्रयत्नाने आणि आत्यंतिक निष्ठेने स्वतःच्या एकट्याच्या जबाबदारीवर घटनेचा मसुदा तयार केला. त्यांची प्रकृती सारखी बिघडत होती, ते वारंवार अंथरुणाला खिळून होते, परंतु त्यांची जिद्द जबरदस्त होती. नोव्हेंबर १९४८ मध्ये त्यांनी आपण तयार केलेला घटनेचा मसुदा लोकसभेपुढे मांडला. त्यातील व्यापक विचार-

सरणी, काटेकोर आणि सूक्ष्म भाषापद्धती, देशाच्या परिस्थितीची अचूक जाणीव आणि लोकशाहीची व्यापक भूमिका पाहून देशाने त्यांच्यावर स्तुति-सुमनांचा वर्षाव केला.

'नव्या भारताचा नवा मनु' म्हणून साऱ्या देशाने त्यांचा यथोचित गौरव केला. त्यांच्या विद्वत्तेची, देशहिताच्या कळकळीची देशाला प्रचीती आली.

चाळीस वर्षांपूर्वी अमेरिकेत विद्यार्थी म्हणून वावरत असताना त्यांनी उरी बाळगलेले स्वप्न पूर्ण झाले होते.

तो कृतार्थतेचा महन्मंगल क्षण होता.

* * *

# ९. स्वातंत्र्य मिळाले! स्वराज्य आले!! परंतु....

घटना तयार करण्याच्या कामी बाबासाहेबांनी जे अपार कष्ट घेतले, त्यामुळे त्यांची प्रकृती आणखीनच बिघडली. त्यांतच त्यांना निद्रानाशाचा विकार जडला आणि एका पायामध्ये असह्य कळ उठून त्यांना मरणांतिक यातना होऊ लागल्या. डॉक्टरांनी संपूर्ण विश्रांतीचा तर सल्ला दिलाच त्याचबरोबर खाण्यापिण्यात व इतर नित्य व्यवहारात नियमितपणा आल्या-खेरीज प्रकृती सुधारणार नाही, असे सांगितले. म्हणजेच त्यांच्यावर सदोदित लक्ष ठेवणारी, त्यांची क्षणाक्षणाला काळजी घेणारी अशी कोणी तरी चांगले वैद्यकीय ज्ञान असणारी स्त्री सदैव त्यांच्या सेवेला असणे अगत्याचे आहे, अशीच वेळ येऊन ठेपली. शुश्रूषेसाठी एखादी नर्स ठेविता आली असती, परंतु त्याहीपेक्षा अधिक आस्थेवाईकपणाने काळजी घेणारे कोणी हक्काचे माणूस घरी असणे त्यांना जरूरीचे वाटले, कारण गेले काही दिवस घटना तयार करण्यामध्ये ते इतके व्यग्र झाले होते की, त्यामुळे आपले जीवन एकाकी, एकलकोंडे झाले आहे असे त्यांना वाटत होते. अनेक डॉक्टरांनी 'लवकर



मरणे किंवा लग्न करणे ' यांतून एखादी गोष्ट तुम्हांला निवडावी लागेल, असा त्यांना गंभीर इशारा दिला होता. आपल्या दलित-बांधवांना इतक्या लवकर सोडून जाण्याची कल्पना करणेही बाबासाहेबांना असह्य वाटत होते. त्यांनी या उतारवयात लग्न करण्याचा निर्णय घेतला. मुंबईला वैद्यकीय उपचारासाठी आले असता त्यांचा डॉ. कु. शारदा कबीर या सारस्वत महिलेशी जवळचा संबंध आला होता. त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्या 'सुशिक्षित, डॉक्टरकीचा व्यवसाय करणाऱ्या व स्वैपाकपाण्यात चांगल्या तरबेज ' होत्या. त्यांनी १५ एप्रिल १९४८ रोजी दिल्लीत त्यांच्याशी विवाह केला. दलित समाजात त्यामुळे थोडीशी खळबळ उडाली, परंतु ती लवकरच शांत झाली.

विवाहानंतर थोड्याच दिवसांनी अस्पृश्यांच्या एका सभेत भाषण करताना ते म्हणाले,

' राजकीय सत्ता ही सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने फार मोठे कार्य करू शकते. अस्पृश्यांनी संघटित होऊन ही सत्ता मिळविली पाहिजे. आणि देशा-



मध्ये काँग्रेसला विरोधी असा प्रबळ पक्ष निर्माण केला पाहिजे. काँग्रेस पक्ष म्हणजे एक जळते लाक्षागृह आहे. मंत्रिमंडळात राहूनही आपल्याला तिची यत्किंचितही बाधा होणार नाही, परंतु अस्पृश्यांनी मात्र काँग्रेसमध्ये चुकूनही सामील होऊ नये. वाळलेल्या सरपणाप्रमाणे ते त्यामध्ये जळून खाक होतील.'

बाबासाहेबांच्या या भाषणाने काँग्रेस पुढाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. परंतु आपल्या मनातील विचार स्पष्टपणे बोलून दाखविण्याचा बाबासाहेबांचा बाणा काँग्रेसला माहीत होता. ते काँग्रेसचे सभासद म्हणून मंत्रिमंडळात आले नव्हते. ते विचारस्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी तयार केलेली घटना लोकसभेत अजून मंजूर व्हायची होती, त्यामुळे ते वादळ तेथेच शमले.

लवकरच त्यांनी केलेली घटना मंजूर झाली आणि ती २६ जानेवारी १९५० पासून सरकारने अमलात आणली. त्या दिवसापासून भारत प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून ओळखिण्यात येऊ लागला.

त्यानंतर काही दिवस बाबासाहेब विश्रांतीसाठी मुंबईस आले. मुंबईच्या नरेपार्क मैदानावर शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला व त्यांना घटनेच्या आकाराचा चांदीचा करंडक अर्पण करण्यात आला. यावेळी बाबासाहेबांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडत होता. त्यावेळचे त्यांचे भाषण त्यांच्या बदलत्या मनोवृत्तीचे निदर्शक आहे. ते म्हणाले,

'पूर्वी आपले राजकारण शत्रुत्वाच्या पायावर चाललेले होते. काँग्रेसवाले आपल्याला व आपण काँग्रेसवाल्यांना शत्रूप्रमाणे मानीत होतो. माझ्या दृष्टीने पूर्वीचे अस्पृश्य वर्गाचे सर्व पुढारी थोड्याशा संकुचित दृष्टिकोनाने पाहत होते व तसेच वागत होते. मीही या दोषाला थोडाबहुत पात्र होतोच. हिंदूंच्या हाती सत्ता आली तर आपले काय होईल, असे आम्हांला वाटत होते. पण हा राजकारणाचा रोख आता बदलला पाहिजे.'

घटनेचे शिल्पकार, अव्वल दर्जाचे कायदेपंडित म्हणून साऱ्या देशाने त्यांचा जो मुक्तकंठाने गौरव केला होता, त्यामुळे बाबासाहेब भारावल्यासारखे झाले होते. म्हणूनच देशाचे स्वातंत्र्य, देशातील लोकशाही अबाधित राहण्यासाठी साऱ्या देशबांधवांना ते मुक्तकंठाने आश्वाहन करीत होते.

याच उत्साहाच्या भरात त्यांनी अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या प्रश्नाकडे जारीने लक्ष दिले. १९३६–३८ च्या दरम्यान त्यांचे लक्ष शीख धर्माने वेधून घेतले होते. अमृतसरच्या शीख मिशनतर्फे बाबासाहेबांच्या प्रेरणेने १९३८

मध्येच मुंबईत खालसा कॉलेज काढण्याचे जाहीर केले होते व त्यामध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना विशेप सवलती मिळणार असे जाहीर झाले होते. त्याप्रमाणे लवकरच त्या कॉलेजची मुंबईत स्थापना झाली होती, परंतु नंतरच्या राजकारणाच्या व्यापामुळे बाबासाहेबांनी धर्मांतराचा प्रश्न काहीसा बाजूला टाकला होता. त्यांचा शीख धर्माकडे असलेला ओढाही ओसरला होता. अस्पृश्य विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाच्या सोई आपणच उपलब्ध करायला हव्यात या हेतूने त्यांनी १९४६ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती व त्या सोसायटीतर्फे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली होती. या संस्थेतर्फे मुंबई राज्यातील मोठमोठ्या शहरी महाविद्यालये स्थापिण्याकडे यापुढे त्यांना लक्ष द्यावयाचे होते. त्यांच्या संगोपनाची व वर्धापनाची जबाबदारी सर्वस्वी त्यांच्यावर येऊन पडली होती आणि बाबासाहेब जातीने लक्ष घालून त्यांच्या अडचणींचा परिहार करण्यात गुंतले होते. विशेषतः हैद्राबाद-मधल्या निजामी राजवटीमुळे संस्थानांतील मराठवाड्याचा प्रदेश शिक्षणाच्या दृष्टीने मागासलेला होता. म्हणूनच मराठवाड्यातील औरंगाबादसारख्या शहरी शक्य तितक्या लवकर महाविद्यालय काढण्याचे त्यांचे प्रयत्न चालले होते.

शूद्र कोण होते आणि अस्पृश्य कोठून आले या ग्रंथांसाठी त्यांना जे संशोधन करावे लागले व भारताची घटना तयार करण्यासाठी भारतातील निरनिराळ्या धर्मांचा जो सूक्ष्म अभ्यास करावा लागला त्यामुळे भारतातील अस्पृश्यांनी बौद्ध धर्मच स्वीकारायला हवा, त्याखेरीज त्यांना मुक्ती नाही, अशी त्यांची ठाम धारणा झाली होती. २० मे १९५१ रोजी बुद्धजयंतीनिमित्त बौद्धधर्मावर व्याख्यान देताना त्यांनी प्रथमच आपली ही धारणा अस्पृश्यां-समोर बोलून दाखविली. ते या प्रसंगी म्हणाले, ' भगवान बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर व श्रीकृष्ण या चार जगातील श्रेष्ठ धर्मसंस्थापकांमध्ये बुद्धाचे कार्य मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे, कारण......

' भगवान बुद्धाने आपला अहंकार पूर्णपणे गिळून टाकला होता आणि अहंकारावर त्याने संपूर्ण विजय मिळविला होता...

' हिंदुधर्म कर्मकांडाच्या आचरणांनी बजबजलेला आहे, कोट्यवधी देवदेवतांची उपासना करण्यात या धर्माने आपला शक्तिपात केला आहे. बुद्ध देव मानीत नाही. त्याचा सारा भर नैतिक आचरणावर, मानवतेवर आहे...

' भगवान बुद्धाचे सगळ्यांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याने सामाजिक

विषमतेविरुद्ध उभारलेले बंड व अहिंसेच्या तत्त्वावर प्रस्थापित केलेली सामाजिक व अध्यात्मिक समता...

'बौद्ध धर्माच्या स्वीकाराने स्वातंत्र्य, समता व बंधुता या उदात्त तत्त्वांचा साक्षात्कार होईल. बौद्ध धर्म दारिद्र्याचेही उच्चाटन करू पाहतो. या सर्व दृष्टीने आपण स्वीकारण्यास आदर्श असा एकमेव धर्म म्हणजे बौद्ध धर्म होय......'

अशा रीतीने सुरुवात करून बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी व त्याच्या सूक्ष्म अभ्यासासाठी बाबासाहेबांनी आपल्या कर्मयोगाबरोबरच अध्यात्मयोगाला पुनश्च सुरुवात केली.

१९५०–५१ मध्ये बाबासाहेबांनी लोकसभेत नवे हिंदुकोड बिल मंजूर व्हावे म्हणून कंबर कसली. १९४७ सालीच हे बिल प्रथम सभेत मांडण्यात आले होते आणि त्यानंतरच्या तीन–चार वर्षांत त्याची चार कलमे मंजूर झाली असताना देशभर त्यातल्या क्रांतिकारक विचारसरणीमुळे त्या बिलाविरुद्ध हाकाटी सुरू झाली होती. पं. नेहरूंनी सुरुवातीला या बिलाकडे विशेष लक्ष दिले होते व या बिलावर खुल्या मतदानाचे स्वातंत्र्य देऊन बाबासाहेबांना पाठिंबा दिला होता. परंतु हळूहळू देशातील विरोधी वातावरण पाहून काँग्रेस-पक्षाने या बिलाची हेळसांड चालविली व नेहरूंनीही त्या बिलाबद्दल उदासीनता धारण केली. आपण काँग्रेस पक्षात नसल्याने पंतप्रधान नेहरू आपल्याला विश्वासात घेत नाहीत अशी बाबासाहेबांची समजूत झाली. 'आमच्या मंत्रिमंडळाचे विद्वद्रत्न' म्हणून पं. नेहरू जरी त्यांची तारीफ करीत तरी त्यांनी त्यांच्याकडे दुसरे कोणतेही जबाबदारीचे खाते गेल्या चार वर्षांत सोपविले नव्हते आणि अर्थशास्त्राचा अभ्यास लक्षात घेऊन देशातील आर्थिक व्यवहाराच्या समितीवर त्यांची नेमणूक केली नव्हती. आश्वासिल्याप्रमाणे नियोजन खातेही त्यांच्याकडे सोपविले नव्हते. या सर्वांचे बाबासाहेबांना वैषम्य वाटत होते. नव्या भारताच्या आर्थिक, औद्योगिक घडणीमध्ये हातभार लावण्याची संधी आपल्याला मिळाली नाही, काँग्रेसने दलितांबद्दल पुरेशी सहानुभूती दाखविली नाही व मंत्रिमंडळातही आपल्याला बहिष्कृताप्रमाणेच वागविले, या जाणिवेने बाबासाहेबांनी १९५१ च्या आक्टोबरमध्ये आपल्या मंत्रिपदाचा तडकाफडकी राजीनामा देऊन टाकला आणि ते लोकसभेत विरोधी पक्षामध्ये सामील झाले.

राजीनाम्यापूर्वीच सप्टेंबरमध्ये त्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते साजरा केला होता. आता त्यांनी हे महाविद्यालय उभे करण्यासाठी आपले सारे लक्ष वेचिले. या महाविद्यालयाची स्थापना करून चिंतनात औरंगाबादेस वेळ घालवावा, अशी त्यांची इच्छा होती. परंतु आगामी निवडणुका जवळ आल्या होत्या आणि शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने त्यासाठी बळ बांधणे आवश्यक होते. बाबासाहेबांनी मुंबईस जाऊन निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. त्यांनी पक्षाचा जाहीरनामा तयार केला व इतर कोणकोणत्या विरोधी पक्षांशी सहकार्य देता येईल याचा विचारविनिमय केला. कॉंग्रेसमंत्रिमंडळातून बाबासाहेब बाहेर पडले होते आणि त्यांनी आपल्या भाषणांतून कॉंग्रेसवर प्रखर टीकास्त्र सोडले होते. कॉंग्रेसने तर विरोधीपक्षांचा धुव्वा उडविण्यासाठी देशव्यापी प्रचंड यंत्रणा उभी केली होती. शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांचे भवितव्य फक्त अस्पृश्यांच्या मतांवर अवलंबून असते तर गोष्ट निराळी होती. स्पृश्यांच्या मताधिक्यावरच त्यांना अवलंबून राहावे लागणार होते. त्याचा पुन्हा व्हावयाचा तोच परिणाम झाला. या निवडणुकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचा प्रचंड पराभव झाला. लाखांवर मते मिळूनही बाबासाहेब निवडून येऊ शकले नाहीत. त्यामुळे शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे अस्तित्वच संपुष्टात येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. संयुक्त मतदार संघापासून अस्पृश्याची सुटका केल्याखेरीज या पक्षाला राजकीय भवितव्य नव्हते. आणि घटनेत अशा तऱ्हेचा बदल घडवून आणणे महाकठीण होते. त्यामुळे सारे कार्यकर्ते निराश झाले होते. परंतु बाबासाहेब या पराभवाने खचले नाहीत. लोकशाहीमध्ये आपल्या हक्कासाठी सतत झगडत राहणाऱ्याला आशानिराशेच्या द्वंद्वात सतत झगडत राहावे लागते हे ते ओळखून होते. त्यांनी आत्मनिरीक्षण करून पुन्हा पक्षाला बळकटी आणण्यासाठी योग्य ती उपाययोजना सुचविली व कार्यकर्त्यांना कार्यरत ठेविले. लोकसभेवर ते निवडून आले नाहीत तरी मुंबई विधानसभेमार्फत ते राज्यसत्तेवर निवडून आले होते, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होती.

अशा निराश राजकीय वातावरणातच अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डॉक्टरेटची पदवी देण्याचे जाहीर केले. त्यांच्या विद्वत्तेचा हा फार मोठा गौरव होता. ही पदवी त्यांच्या उपस्थितीतच त्यांना,

बहाल करण्याची विद्यापीठाची इच्छा होती; कारण त्या निमित्ताने अमेरिकन जनतेला हा ' नवा मनु ' पाहावयास मिळणार होता.

प्रकृती ठीक नसतानाही बाबासाहेब म्हणूनच १९५२ च्या जून महिन्यामध्ये अमेरिकेला जाऊन आले. हजारो मैलांवर असलेल्या अमेरिकेला त्यांच्या विद्वत्तेचे चीज करण्याची बुद्धी व्हावी आणि भारतातल्या कोणत्याही विद्यापीठाला ही गोष्ट सुचू नये, याबद्दल या निमित्ताने भारतात आश्चर्य व्यक्त करण्यात येऊ लागले.

एकंदर घटनेमुळे बाबासाहेबांची प्रकृती आणखीनच ढासळली होती. त्यांतच कार्यकर्ते उदासीन झाले होते आणि त्यांच्यामध्ये फूट पडण्याची चिन्हे दिसत होती. अस्पृश्यांच्या उद्धाराचे खूप मोठे काम अद्याप पुढे उभे होते आणि ते कार्य उचलण्यासाठी हजारो तळमळीच्या कार्यकर्त्यांनी आपले सर्वस्व ओतणे आवश्यक असताना हे कार्यकर्ते उदासीन झाले हे पाहून बाबासाहेबांना अतीव दुःख झाले. त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थांमुळे मूठभर अस्पृश्य सुशिक्षित झाले होते, परंतु खेड्यातील अस्पृश्य जनता अद्याप गुलामगिरीत, अज्ञानात, दारिद्र्यात खितपत पडली होती. या आपल्या अस्पृश्य बांधवांचे काय होणार या चिंतेने बाबासाहेबांच्या डोळ्याला डोळा लागत नसे. आजकाल रात्रंदिवस त्यांच्यासमोर हाच एक प्रश्न होता.

प्रकृती झपाट्याने ढासळत होती. एक पाय जवळ जवळ अधू झाल्यासारखा झाला होता. अधूनमधून कोणाच्या तरी खांद्याचा आधार घेतल्याखेरीज चालवत नव्हते, अशी त्यांची अवस्था झाली होती. तशातच त्यांचे ज्ञानयज्ञ अखंड चालूच होते. बौद्ध धर्माच्या अभ्यासाला नव्या जोमाने सुरवात झाली होती. त्यामुळे प्रकृतीवर आणखी ताण पडत होता. त्यातच आपल्या समाजाच्या अहोरात्र चिंतेने ते खंगत चालले होते. या काळजीमुळे त्यांनी १९५४ मध्ये आपल्या सहकाऱ्यांची एक बैठक बोलाविली आणि त्यांनी आपले सारे अंतःकरण त्यांच्यासमोर उघडे केले. बोलता बोलता बाबासाहेब गहिवरून गेले आणि त्यांच्या डोळ्यांतून अखंड अश्रुप्रवाह सुरू झाला....

' आता माझे थोडे दिवस राहिले....परंतु खेड्यातील माझ्या गरीब बांधवांना तुमच्या हवाली करण्यासाठी मी तुम्हाला एकत्र बोलाविले आहे. ....त्यांचे कसे होणार...

त्यांना पुढे बोलवेना. त्यांचा कंठ दाटून आला आणि ते एखाद्या निरागस बालकाप्रमाणे ढसाढसा रडू लागले.

दलितांच्या सुखदुःखात त्यांच्या पाठीमागे हिमालयाप्रमाणे उभ्या असणाऱ्या या भीमपुरुषाच्या त्या अश्रूने कार्यकर्त्यांतील विरोध मावळला.

'बाबासाहेब, तुमच्या डोळ्यांत अश्रू? तुम्ही आम्हांला वाढविले, जोपासले, मोठे केले. आम्ही तुमच्या शब्दांबाहेर नाही.' सारे भावनावेगाने म्हणाले ...

* * *

# १०. बुद्धं सरणं....

' पुणे करारा 'चा आणखी एक कटू अनुभव १९५४ मध्ये बाबासाहेबांना भंडारदरा येथील पोट निवडणुकीत आला. याही निवडणुकीत त्यांना लाखावर मते पडली, परंतु मागच्या निवडणुकीप्रमाणे याही निवडणुकीत कॉंग्रेसने बुद्धयाच हजारो स्पृश्यांची मते कुजविल्यामुळे ते निवडून येऊ शकले नाहीत. निवडणूक प्रचाराच्या भाषणांतून पं. नेहरूंच्या परराष्ट्रीय नीतीवर बाबासाहेबांनी या खेपेस चांगलीच झोड उठविली होती.

साऱ्या जगाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपले नेते झगडत आहेत, परंतु त्यांना आपल्या देशातील अंतर्गत प्रश्न सोडविण्यास वेळ नाही, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला ते मुद्दाम आकसाने डावलीत आहेत. चीनच्या माऊबरोबरच्या पंचशीलाच्या गोंडस घोषणांनी आपण फसता कामा नये. गोव्याचा प्रश्न नेहरूंनी मनात आणला तर केवळ एकदोन दिवसांचा आहे. आपल्या अदूरदर्शीपणामुळे काश्मीरच्या प्रश्नाचा नेहरूंनी विनाकारण घोळ घातला आहे, इत्यादी त्यांचे या काळात व्यक्त केलेले विचार ऐतिहासिक



दृष्ट्या किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येईल.

भंडारदरा निवडणुकीतील पराभवाचा धक्का फार मोठा होता. त्यांच्या अनुयायांना तर तो विशेष जाणवला. परंतु पराभवाचे हे दुःख पचवून बाबासाहेब देशाच्या राजकारणात आणि अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबतीत तितक्याच तळमळीने भाग घेत होते. राज्यसभेतील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांचा त्यांच्या प्रकृतीवर अतिशय ताण पडत असे, पण ते कधी आपल्या कर्तव्यापासून ढळले नाहीत.

निवडणुकीनंतर लगेच ते रंगून येथील बुद्ध जयंती समारोहास हजर राहण्यासाठी रवाना झाले. दोन हजार वर्षांपूर्वी भारतात जन्माला आलेल्या बुद्धाच्या शिकवणुकीचे भारतात पुनरुज्जीवन करण्यासाठी आपण काय काय करीत आहोत, याची त्यांनी तेथे माहिती दिली.

डिसेंबरमध्ये तिसऱ्या जागतिक-बुद्धधर्म-परिषदेस हजर राहण्यासाठी बाबासाहेब रंगूनला गेले. या परिषदेत ते म्हणाले,



मराठा ... य, ठा..
अनुक्रम ...

'भारताची घटना तयार करताना बुद्ध धर्माचा हिंदुस्थानात प्रसार कसा करता येईल, याचाच मी सदैव विचार करीत होतो. भारताची राजमुद्रा म्हणून अशोकचक्राची आपण स्थापना केली आहे. पाली भाषेचा अभ्यास करण्याची घटनेमध्ये तरतूद केली आहे. बुद्धजयंतीची सार्वत्रिक सुट्टी जाहीर करण्यात आणि भारताच्या राष्ट्रपतिभवनाच्या प्रवेशद्वारावर बुद्धाची वचने कोरविण्यात आपण अगोदरच यश मिळविले आहे. बुद्धाच्या नावावर मी भारतात दोन महाविद्यालये स्थापन केली आहेत...जगामध्ये कोणत्याही राष्ट्रामध्ये बुद्धाच्या नावाने इतक्या थोड्या वेळात एकट्याकडून इतके मोठे कार्य झाले असेल असे मला वाटत नाही......'

बाबासाहेबांच्या या भाषणाचा परिषदेवर फार परिणाम झाला. याच परिषदेमध्ये बौद्धधर्माच्या सर्वांगीण अभ्यासासाठी ज्ञानपीठे आणि अध्यासने निर्माण करण्याची कल्पना त्यांनी बोलून दाखविली.

रंगूनहून आणलेल्या भगवान बुद्धाच्या मूर्तीची देहूरोड येथे नव्याने बांधलेल्या मंदिरात प्रतिष्ठापना करून त्यांनी दोन हजार वर्षांपूर्वीच्या या सनातन व श्रेष्ठ धर्माच्या प्रतिष्ठापनेची मुहूर्तमेढ रोवली.

वयाची साठी केव्हाच उलटली होती आणि अविरत कष्टामुळे वृद्धपणाची गडद छाया त्यांच्या मुखावर रेंगाळू लागली होती. आयुष्य सरत आल्याची जाणीव शरीरातील व्याधी वारंवार देत होत्या. तरीसुद्धा जिद्द जबरदस्त होती, आत्मविश्वास प्रबळ होता. त्यांच्या हिरकमहोत्सवानिमित्त त्यांना मोठा निधी अर्पण करण्याचे ठरले होते व त्याप्रमाणे पुढच्या आक्टोबरमध्ये त्यांना एक लाख अठरा हजार रुपयांची थैली त्यांच्या भक्तांनी अर्पण केली होती. या पैशांतून मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी अस्पृश्यांसाठी एक भव्य इमारत उभी करावी, अस्पृश्यांना वारंवार एकत्रित येण्यासाठी तिचा उपयोग करावा, त्यामध्ये मध्यवर्ती ठिकाणी एक प्रचंड ग्रंथसंग्रहालय उघडावे आणि आपल्या लोकांनी आपल्या जीवनाशी संबधित असलेल्या विषयांचा सूक्ष्म अभ्यास करावा, या हेतूने त्यांनी योजना आखल्या होत्या.

बाबासाहेबांसारखे ज्ञानप्रेमी बाबासाहेबच. त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या विद्वत्तेचे तेज सदैव झळकत असे. त्यामुळे काही वेळा ते कठोर भासत. विद्येच्या उपासनेने असत्याबद्दल त्यांच्या मनात भयंकर चीड निर्माण होत असे. त्यामुळे भोंगळ वादविवाद करणाऱ्यांवर ते संतापत, त्यांच्यावर कठोर

वाक्प्रहार करीत. ते कठोर बुद्धिवादी होते. आणि तसेच कडवे महाराष्ट्रीय होते. त्यामुळे कोणाच्या रागलोभाची पर्वा न करता आपली मते ते अतिशय सडेतोडपणे मांडत. निर्भयता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा, विचारसरणीचा महत्त्वाचा भाग होता. त्यामुळे ते बोलायला उभे राहिले की, त्यांच्या बुद्धिमत्तेने श्रोते दिपून जात आणि विरोधक अस्वस्थ होत. त्यांच्या विचारामध्ये सदैव झंझावातीपणा असे. त्यांच्या अंतःकरणातल्या तीव्रतेने त्यांची वाणी मोठी धारदार होई. स्फोटक व प्रक्षोभक विचारसरणीमुळे त्यांचे बोलणेचालणे नेहमीच नाट्यपूर्ण व प्रभावी बनत असे.

त्यांचे व्यक्तिमत्त्वही त्यांच्या नावाला साजेसेच होते. धिप्पाड, उंच आणि रुबाबदार अशी त्यांची देहयष्टी त्यांच्या तेजस्वी चेहऱ्यामुळे नेहमी मोठी परिणामकारक व प्रभावी वाटे. भारतीय राजकारणात त्यांना सदैव लढाऊ वृत्तीच स्वीकारणे भाग पडले होते, त्यामुळे धावपळ, अखंड उद्योग आणि अनुयायांचा, भक्तांचा गराडा त्यांच्या पाठीशी कायमचा बांधला गेला होता. या धावपळीमुळे व अखंड उद्योगप्रियतेमुळे त्यांना स्वतःच्या संसाराकडे लक्ष देण्यास कधीच फावले नाही. इतकेच नव्हे तर आपल्या एकुलत्या एक प्रिय पुत्राच्या विवाहप्रसंगी त्यांना जातीने हजर राहता आले नाही. इतके असूनही त्यांना पुस्तकांखेरीज, अखंड वाचनाखेरीज काही प्रिय नव्हते. त्यांचा मुंबईच्या राजगृहातील ग्रंथसंग्रह अफाट होता. कित्येकांनी त्यासाठी त्यांना लाखो रुपये देऊ केले होते, परंतु पैशापोटी कोणातरी धनिकाला तो विकून टाकण्यास ते कधीच तयार झाले नाहीत. बाबासाहेबांनी तो नाईलाजानेच आपल्या आवडत्या सिद्धार्थ महाविद्यालयाला देऊन टाकला होता, आणि अल्पावधीतच त्यांनी आपल्या दिल्ली येथील निवासस्थानी साऱ्या जगातून पुन्हा निरनिराळ्या विषयावरचे हजारो ग्रंथ गोळा केले होते नि आपले घर म्हणजे एक अद्ययावत, सुसज्ज ग्रंथशाळा बनविली होती.

‘ जगामध्ये अभ्यासाशिवाय कोणाला काहीच साधता येणार नाही. ’ ते वारंवार सांगत. आपल्या अनुयायांना तर ते नेहमी म्हणत,

‘ राजकारण कोणास करावयाचे असेल, तर राजकारणाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. आपल्या समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने राजकीय, धार्मिक आणि आर्थिक या सर्व प्रश्नांचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. ज्यांना पुढारी व्हायचे असेल त्यांनी पुढाऱ्यांची कर्तव्यकर्मे व जबाबदारी काय

आहे, याचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. कारण आपल्या समाजातील पुढाऱ्यांवर अत्यंत मोठी जबाबदारी आहे...'

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशात निव्वळ लोकमताच्या जोरावर सत्तालोभी माणसे अधिकारावर येण्याची सदैव धडपड करीत आहेत, हे पाहून त्यांना अतिशय वाईट वाटे. सत्कारसमारंभ, दौरे, हारतुरे, वेडीवाकडी भाषणे आणि कोनशिलासमारंभ, यांत व्यग्र राहून ही मंडळी देशाच्या परिस्थितीचे योग्य आकलन होण्यासाठी खडतर अभ्यास हवा, याकडे दुर्लक्ष करताहेत. त्याचे देशावर विपरित परिणाम होतील, अशी त्यांना भीती वाटे. मागे न्या. रानड्यांबद्दल बोलताना ते म्हणाले होते,

'रानडे-भांडारकरांचे, टिळक-आगरकरांचे युग हे कर्तव्यनिष्ठेचे, त्यागाचे, अभ्यासाचे, प्रकाशाचे होते. आता या देशात त्याग लोप पाहत आहे. सत्तेची धुंदी कित्येक विपरित गोष्टी घडवून आणीत आहे. अभ्यासाकडे कोणाचे लक्ष नाही. कर्तव्यनिष्ठेची जाणीव नाही. स्वातंत्र्यानंतर या देशात नवा प्रकाश पसरण्याऐवजी अज्ञानाचा, विनाशाचा अंधार सगळीकडे पसरत आहे. विचारी माणसांनी तो रोखायला हवा, म्हणजेच या देशाला काही उज्ज्वल भवितव्य आहे.'

बुद्धिमत्तेच्या तेजाबरोबरच त्यांच्या नजरेमध्ये आपल्या दलित बांधवांच्या दुःखाच्या जाणिवेची दर्दभरी करुणा होती. त्यांच्यावरच्या जुलमांमुळे त्यांना भयंकर चीड येई. त्यांच्या बंडखोरीचा उगम या चिडीतून आणि आपल्या तीव्र बुद्धिमत्तेच्या आत्मविश्वासातून झाला होता. परंतु ही चीड तात्काळ लोपत असे आणि कर्तव्यनिष्ठेच्या जाणिवेने हातातील पुस्तक मोठ्या अनिच्छेने खाली ठेवून ते त्यांना धीर देण्यासाठी, त्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी उभे राहत. वास्तविक लो. टिळकांप्रमाणेच त्यांना चिंतनाची, संशोधनाची, एकांताची मुळातूनच आवड. लोकमान्यांना देशातील पारतंत्र्याने चळवळीत ओढले आणि बाबासाहेबांनाही त्यांच्या जातीवरच्या जुलुमामुळेच राजकारणात पडावे लागले. खडतर तुरुंगवासामुळे लोकमान्यांना सक्तीचा एकांतवास तरी मिळाला. बाबासाहेबांच्या राजकीय जीवनात एकांतवासाची कधी संधीच मिळाली नाही. आणि अशी सवड मिळूनही त्यांनी एकांतवास कधी पत्करला असता असे वाटत नाही. कारण त्यांचे अखंड वाचन हे मुख्यतः देशाच्या ऐहिक वृद्धीसाठी सदैव चाललेले होते; नुसत्या

पुस्तकी अभ्यासाने येणारी वैचारिकता एकांगी असते, हे त्यांना चांगले ठाऊक होते. त्यांचा अभ्यास, त्यांचे चिंतन देशाच्या घडामोडींशी सदैव बांधलेले होते. आपले वाचन अद्ययावत आणि अतिशय सखोल असावे, ही त्यांची नेहमीची खटपट होती. देशाच्या कल्याणाखेरीज त्याला दुसरा कोणताही हेतू नव्हता आणि म्हणूनच आंबेडकर सदैव लोकसमूहासमोर वावरले. एकांतिक विद्वानाप्रमाणे फक्त पुस्तकांतच मान खुपसून लोकांचा, गर्दीचा, गजबजटाचा आणि गोंगाटाचा त्यांनी कधी तिरस्कार केला नाही. त्यांचे आयुष्य निराशेच्या, वैफल्याच्या व कटुतेच्या अनुभवांनी सदैव भरलेले आहे, पण म्हणून त्यांनी वैतागून स्वीकृत कार्याचा त्याग केला नाही. आपण सर्व काही मिळविले आहे, मिळविण्यासारखे आपल्याला काही राहिले नाही, परंतु दलित बांधवांचे हक्क मिळविल्याखेरीज आपल्या एकट्याच्या उद्धाराला काही अर्थ नाही, याच भावनेने त्यांनी राजकारणात अटीतटीने भाग घेतला.

आणि आयुष्याच्या उत्तरकाली तर अडाणी दीनदलितांनाच धर्माची अधिक आवश्यकता आहे, कारण धर्म त्यांना आशावादी बनतो, संकटांतून त्यांच्या मनाला प्रेरणा देतो आणि कार्यप्रवृत्त करतो, याची जाणीव त्यांना झाली होती. भारतातील दलितांना अशी प्रेरणा देण्याचे कार्य बौद्ध धर्मच करील, अशी त्यांची खात्री पटली होती. हा बुद्ध धर्मच भारताला तारील, याबद्दल त्यांना शंका राहिली नव्हती, म्हणून त्यांनी या बुद्धधर्माचे तत्त्वज्ञान साऱ्या जगताला समजावून सांगण्यासाठी मोठा ग्रंथ लिहावयास घेतला होता. भारतातील नव्या बुद्ध धर्माचे हा ग्रंथ बायबल ठरेल, गीता ठरेल, कुराण ठरेल, अशी त्यांची भावना होती.

१९५५ मध्ये ग्रंथ पुरा होत आला आणि त्याच्या छपाईचीही व्यवस्था करण्यात आली. त्याच्याचबरोबर इतरही काही ग्रंथ त्यांनी लिहावयास घेतले होते. त्या सर्वांचा ताण असह्य होऊन ते कमालीचे अशक्त झाले. डोळे अतिशय अधू झाले. गेल्या काही वर्षांत त्यांना डोळ्यांचा त्रास चांगलाच जाणवू लागला होता. डॉक्टरांनी वाचू नका, भाषणे देऊ नका म्हणून त्यांना वारंवार ताकीद दिली होती. परंतु एखाद्या हट्टी मुलाप्रमाणे त्यांनी डॉक्टरांचा उपदेश धाब्यावर बसविला होता. त्यांनी वाचावयाचे नाही, भाषणे करावयाची नाहीत, म्हणजे मग करावयाचे तरी काय ? काही वर्षांपूर्वी ज्यावेळी ह्या डोळ्यांच्या त्रासाला पहिल्यांदा सुरुवात झाली, तेव्हा आपली दृष्टी कायमची

जाते की काय, असे वाटून ते रडले होते. ' माझे डोळे गेले म्हणजे ह्या जगात जगण्यात काही अर्थ नाही. मिल्टन कवीप्रमाणे दुसऱ्याकडून वाचून घ्यावे लागणार ! छे, छे, कल्पना देखील सहन होत नाही मला. त्यापेक्षा मी प्राण-त्याग करीन.... ' ते म्हणाले होते !

मधुमेह, पायातील ती असह्य कळ, दाढदुखी आणि शेवटी डोळे अधू झालेले...प्राणज्योत झपाट्याने क्षीण होत होती. आपण अंगिकारलेले कार्य तडीस नेण्यापूर्वी काही भलतेच घडणार नाही, अशी त्यांना खात्री होती. परंतु अधूनमधून बेशुद्धीचे झटके येऊन ऑक्सीजन द्यावे लागत असे. पत्नी व फॅमिली-डॉक्टर सदैव उशाशी तत्पर होते म्हणून तशाही अवस्थेत बाबासाहेब आपल्या भावी धर्मांतराच्या योजना आखण्यात दंग होते.

धर्मांतराच्या योजना व ग्रंथलेखनाचे प्रचंड काम यांमुळे राजकारणाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. १९५६ च्या मे महिन्यात कौन्सिलमध्ये सरकारच्या भाषावार प्रांतरचनेच्या आडमुठ्या धोरणाबद्दल त्यांनी नेहमीच्याच आवेशाने कडाडून हल्ला चढविला. देशामध्ये ' रिपब्लिकन पक्ष ' या नावाचा नवा राजकीय पक्ष निर्माण करण्याचीही ते तयारी करीत होते.

प्रकृती अनुकूल नसताना मे महिन्यात ते मुंबईच्या नरेपार्कवर बुद्ध जयंतिसमारंभास हजर राहिले आणि तेथेच येत्या दसऱ्याला आपण बुद्धधर्म स्वीकारणार असल्याचे त्यांनी घोषित केले.

या मुंबईच्या दौऱ्यामुळे त्यांना भयंकर अशक्तता आली. ते जून–जुलै-मध्ये दिल्ली येथे अंथरुणाला खिळून होते. आपल्या दलितबांधवांबद्दलचा ते सारखा विचार करीत होते. अश्रूंनी उशी भिजत होती. ते असहाय झाल्या-सारखे झाले होते. मृत्यू आसपास घिरट्या घालीत होता परंतु आपल्या इच्छा-शक्तीच्या बळावर त्यांनी त्याला थोपवून धरले होते.

दसरा जवळ येत चालला आणि धर्मांतरासाठी आपल्या दलित बांधवांना स्वच्छ पांढरी वस्त्रे परिधान करून नागपूरला मोठ्या संख्येने हजर राहण्याची त्यांनी हाक दिली.

' भारतात बौद्ध धर्माचा प्रसार नाग लोकांनी केला.हे नाग लोकच आजच्या अस्पृश्यांचे पूर्वज होते. आर्यांनी त्यांचा अपरिमित छळ केला, परंतु गौतमबुद्धाने त्यांना नवा धर्म देऊन त्यांचा उद्धार केला. नाग लोकांची मुख्य वस्ती नागपूर येथे व आसपास होती,म्हणून या शहरास नागपूर हे नाव पडले. '

धर्मांतरासाठी नागपूरच का निवडले याची कारणमीमांसा बाबासाहेबांनी वरीलप्रमाणे केली. नागपूरनंतर इतर मोठमोठ्या शहरी असेच धर्मांतरांचे समारंभ ते घडवून आणणार होते.

दसऱ्याच्या दिवशी बाबासाहेबांच्या हाकेला ओ देऊन लाखांच्या संख्येने अस्पृश्य लोक जमले होते. आगगाडी, मोटारी, बैलगाड्या भरभरून आल्या होत्या. प्रसंगी घरातले किडूकमिडूक विकूनही लोकांनीही पांढरी वस्त्रे शिवली होती.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी सकाळी नागपूर येथे या समारंभासाठी मुद्दाम उभ्या केलेल्या भव्य मंडपात त्यासाठी आलेल्या श्रेष्ठ व वृद्ध बुद्ध भिक्षूकडून डॉ. बाबासाहेब व त्यांच्या पत्नी सौ. सविता आंबेडकर यांनी समारंभपूर्वक बुद्धधर्माची दीक्षा घेतली व त्यांच्या पाठीमागून त्यांच्या पाच लाख अनुयायांनी बाबासाहेबांनी खास तयार केलेल्या बावीस वचनांच्या प्रतिज्ञेने बुद्धधर्माचा स्वीकार केला.

या प्रसंगी भाषण करताना बाबासाहेबांनी, 'मी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' ही आपली प्रतिज्ञा पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. मात्र आपला हजारो वर्षांचा हिंदुधर्म आपण टाकून देत आहोत असे म्हणताना त्यांच्या आवाजात क्षणभर कातरता आली होती व ते भावविवश झाले होते, हे पाहणाऱ्यांच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही.

'आम्ही बौद्ध धर्म स्वीकारल्याने अस्पृश्यांच्या हक्कावर गदा येणार नाही. त्यामुळे काय अडचणी येतील आणि त्या कशा टाळता येतील, त्यासाठी काय युक्तिवाद व खटाटोप करावा लागेल, याचा मी पूर्ण विचार केला आहे. हे सर्व हक्क मीच माझ्या लोकांसाठी मिळविले होते. मीच ते पुन्हा मिळवून देईन; याची मला खात्री आहे.'

त्यांनी आश्वासन दिले.

आपल्या हाकेला इतकी प्रचंड साथ मिळालेली पाहून बाबासाहेबांना अतिशय हर्ष झाला. त्या आनंदाच्या भरातच त्यांनी खाटमांडू येथे भरणाऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला हजर राहण्याचे आमंत्रण स्वीकारले.

* * *


# ११. अखंड तेवणारा ज्ञानदीप

नेपाळचे राजे महेंद्र यांनी खाटमांडू येथे १५ नोव्हेंबर १९५६ रोजी चवथ्या जागतिक बुद्ध-धर्म परिषदेचे उद्‌घाटन केले. डॉ. बाबासाहेबांची उपस्थिती हे या परिषदेचे सर्वांत मोठे आकर्षण होते. बाबासाहेबांनी परिषदेत प्रवेश केला तेव्हा सर्व सभागृहाने उठून उभे राहून त्यांना मानवंदना दिली.

वीस तारखेला ' बुद्ध धर्मातील अहिंसा ' या विषयावर बाबासाहेबांचे परिषदेत भाषण होणार होते, परंतु ते लिहीत असलेल्या ' बुद्ध व कार्ल मार्क्स ' या पुस्तकासंबंधी परिषदेला मोठे कुतूहल होते. त्यांनी त्याच विषयावर भाषण करावे असा आग्रह झाला.

' ठीक आहे ' बाबासाहेब म्हणाले आणि त्यांनी मुद्देसूदपणाने, आपल्या प्रभावी वाणीने बुद्ध आणि मार्क्स यांच्यातील साम्यभेदांचा विचार केला. ते म्हणाले,

' मार्क्स म्हणतो की जगातील साऱ्या दुःखाचे मूळ म्हणजे माणसाची खाजगी मालमत्तेची हाव. त्यामुळे संग्रहवृत्ती वाढीला लागते, त्यामुळेच



धनी आणि चाकर हा भेद निर्माण होतो. पिळवणूक आणि उपासमार थैमान घाल्ूं लागतात. भगवान बुद्धाला देखील जगातील दुःखहरण करावयाचे होते. म्हणूनच माणसातील संग्रहवृत्ती नाहीशी करूनच ह्या दुःखाचा परिहार होईल, असे ते उपदेशीत.

‘ परंतु मार्क्स व बुद्ध यांमधला सगळ्यात मोठा फरक हा आहे की, जगातील दुःखे नाहीशी करण्यासाठी मार्क्सने सुचविलेला तोडगा हिंसावादी होता, या उलट बुद्धाला अहिंसेने हे सर्व साधावयाचे होते. जगातील प्रत्येक वस्तू नश्वर असल्याने असंग्रहणीय आहे असे भगवान बुद्ध सांगत. त्यामुळेच भिक्षूंना कोणत्याही वस्तूचा संग्रह करण्यास मनाई होती....’

‘ मार्क्सच्या मार्गाचा तात्काळ परिणाम दिसून येतो. बुद्धाचा मार्ग असा साधासुधा नाही. जग कितीही सुधारले तरी माणसांची मने उदात्त झाल्या-खेरीज या जगामध्ये समता नांदणार नाही. भगवान बुद्धाने माणसांची मने उदात्त करण्यासाठी मौलिक असे धर्मचक्रप्रवर्तन केले. बुद्धाचाच मार्ग शाश्वत, चिरंतन



[illegible]

आणि सर्वश्रेष्ठ आहे. सर्व जगाने त्या मार्गाचा अवलंब केल्याखेरीज जगातील आजची भयंकर दुःखे दूर होणार नाहीत. मार्क्सच्या मार्गाने क्रांती होईल, परंतु मने बदलणार नाहीत. त्यामुळे मार्क्सची विचारसरणी क्षणकालीक, अशाश्वत आणि आजच्या रशियातल्या चित्राप्रमाणे हुकूमशाही निर्माण करणारी आहे. जगात शांतता नांदायची असेल तर बुद्धाच्याच मार्गाने गेले पाहिजे. '

खाटमांडूहून परत येताना बाबासाहेबांनी 'बनारस हिंदु विद्यापीठ' व 'काशी विद्यापीठ' या ठिकाणी व्याख्याने दिली. या दोन्ही ठिकाणी त्यांनी हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म यांच्याबद्दलचे तुलनात्मक विचार मांडले. या वयातही त्यांच्या भाषणांतून पूर्वीच्या आक्रमक आणि लढाऊ वृत्तीचा पुरेपूर प्रत्यय येत होता.

बनारस विद्यापीठात ते म्हणाले, 'शंकराचार्यांची विचारसरणी ही निवळ वेदांतिक होती. त्याला सामाजिक अधिष्ठान नव्हते. कारण जगातील चराचर वस्तूंमध्ये ब्रह्म भरून राहिलेले आहे, असे एकीकडे म्हणत असताना दुसरीकडे हा स्पृश्य आणि हा अस्पृश्य हा भेद त्यांनी कायम ठेविला. माणसांमधील वर्ण-भेद नाहीसा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही...

'भारतीय घटनेनुसार वर्णभेदाचा आणि जातिभेदाचा आपण त्याग केला पाहिजे. घटनेतील तत्त्वाचे योग्य रीतीने पालन करायचे असेल तर सामाजिक विषमतेचा, वर्णभेदाचा उपदेश देणारे हिंदू धर्मग्रंथ त्याज्य ठरविले पाहिजेत. '

उत्तर हिंदुस्थानांतील काही पवित्र आणि प्रमुख अशा बौद्ध स्थळांना भेटी देऊन बाबासाहेब दिल्लीला परत आले.

प्रवासाचा, भाषणांचा शीण तर होताच, परंतु त्यांचा चेहरा आता अधिकाधिक गंभीर होत चालला होता. ते अधिकच चिंतामग्न, उदास वाटू लागले. ते आणखीनच खंगलेले, खालावलेले दिसू लागले. दिल्लीमध्ये भरलेल्या बौद्ध चित्रकला प्रदर्शनास ते कसेबसे हजर राहिले, परंतु अधिक परिश्रम करण्याचे त्राण आता राहिले नव्हते. तरीही बाबासाहेब दिल्लीतील प्रमुख पुस्तकांच्या दुकानांतून फेरी मारून नवनवीन पुस्तके गोळा करीत होते. २ डिसेंबरला दिल्लीत दलाई लामांचा सत्कार झाला. बाबासाहेब मोठ्या कष्टाने या समारंभास आवर्जून हजर राहिले.

त्यांनी लिहिलेले भगवान बुद्ध आणि त्यांचा धर्म हे पुस्तक मुंबईमध्ये

छापले जात होते. त्याची छपाई जवळजवळ पुरी होत आली होती.

ते पुस्तक लवकरच प्रसिद्ध होणार या कल्पनेने बाबासाहेब काहीसे सुखावले होते. दिवसभर पायातील असह्य वेदनेमुळे तळमळताना मधूनमधून भगवान बुद्धाच्या प्रार्थनेन ते आपले दुःख विसरून जात.

'बुद्धं सरणं गच्छामि
धर्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि'

हे शब्द त्यांच्या निवासस्थानात सगळीकडे निनादत आणि सारे निवासस्थान त्या पवित्र नामघोषाने भारावल्यासारखे मंत्रमुग्ध होई. स्वामी विवेकानंदांप्रमाणे त्यांच्या आवाजात मोठे नादमाधुर्य आणि संगीतमयता होती.

१६ डिसेंबरची तारीख जवळ येत होती आणि बाबासाहेब त्या दिवशी मुंबईला जाणाच्या योजना आखीत होते. कारण त्या दिवशी लाखो अनुयायांना ते मुंबईत बौद्ध धर्माची दीक्षा देणार असे जाहीर झाले होते.

३ डिसेंबरलाच त्यांनी आपल्या 'बुद्ध आणि मार्क्स' या ग्रंथाचे शेवटचे प्रकरण लिहून ग्रंथाचे लेखन पुरे केले.

चार तारखेला बाबासाहेब नेहमीप्रमाणे येणाऱ्याजाणाऱ्याबरोबर गप्पा मारीत होते. आपल्या भावी योजनेबद्दल उत्साहाने बोलत होते. प्रकृतीने आणखी काही दिवस साथ दिल्यास आपल्या बौद्धधर्म प्रसाराचे कार्य तडीला नेण्याचे मनसुबे रचीत होते.

पाच तारखेला रात्री थोडासा भात खाऊन बाबासाहेबांनी अलमाऱ्यातील कितीतरी पुस्तके बाहेर काढली. एकदा आपल्या सगळ्या पुस्तकांकडे डोळे भरून पाहून घेतले आणि ते आपल्या झोपण्याच्या खोलीकडे गेले.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आकस्मिक निधन'

आणि दुसऱ्या दिवशी ही वार्ता वाऱ्याप्रमाणे साऱ्या देशामध्ये पसरली.

सकाळी बाबासाहेब नित्याप्रमाणे उठले नाहीत म्हणून त्यांचे खाजगी चिटणीस पाहावयास गेले तर बाबासाहेबांनी आता चिरनिद्रा घेतली आहे, हे त्यांच्या लक्षात आले. झोपेतच शांतपणे रात्री त्यांना मृत्यू आला होता. चेहऱ्यावर अद्यापही समाधान रेंगाळत होते, शांतता ओसंडत होती. उसंत, विश्रांती हे शब्द कधीही ठाऊक नसणाऱ्या बाबासाहेबांनी यावेळी मात्र कायमची विश्रांती घेतली होती. त्यांची प्राणप्रिय पुस्तके जवळच होती परंतु

आता त्यांचा सम्राट त्यांच्या अंतरंगात यापुढे विहार करणार नव्हता.

त्यांच्या महापरिनिर्वाणाची वार्ता ऐकून त्यांच्या अंतिमदर्शनासाठी त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी रीघ लागली. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान पं. नेहरू होते, त्यांचे मंत्रिमंडळ होते आणि त्यांच्याच बरोबर असंख्य गोरगरीब होते.

बाबासाहेबांचा पार्थिव देह विमानाने दुसऱ्या दिवशी पहाटे मुंबईस आणण्यात आला. अंतिम दर्शनासाठी राजगृहात योग्य ती व्यवस्था करण्यात आली. दिवसभर अश्रू ढाळीत हजारोंचा समुदाय त्यांच्या दर्शनासाठी रांगेमध्ये उभा होता.

दुपारी तीनच्या सुमारास प्रचंड प्रेतयात्रा निघाली. मुंबईच्या रस्त्या-रस्त्यांतून त्यांच्या अखेरच्या दर्शनासाठी लोकसमुदाय महासागराप्रमाणे गोळा झाला होता. मुंबईच्या मुख्य रस्त्यातील वाहतूक बंद पडली होती.


सबंध मुंबईच्या आयुष्यात इतकी प्रचंड प्रेतयात्रा कोणी पाहिली नव्हती.

दादरच्या स्मशानभूमीवर बौद्धधर्ममंत्राच्या उद्घोषात त्यांच्या देहास अग्नी देण्यात आला, त्यावेळी जमलेल्या जमावाचे आतापर्यंत आवरून धरलेले सारे दुःख उफाळून आले. लाखो लोकांचा समुदाय अक्षरशः ढसाढसा रडू लागला. अंतःकरण भेदून जावे असेच ते मोठे करुण दृश्य होते.

भारतातील कोट्यवधी दलितांचा पाठिराखा आज त्यांना सोडून गेला होता. लवकरच त्यांना दीक्षा देण्यासाठी बाबासाहेब येणार होते. परंतु बाबासाहेब भलत्याच प्रकाराने त्यांच्याकडे आले होते. त्यांच्या हातून दीक्षा घेण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही.

बाबासाहेबांच्या मृत्यूने सारा देश हळहळला. कारण देशातील लोक-शाहीचा श्रेष्ठ पुरस्कर्ता, कडवा देशभक्त आणि ज्ञानियांचा राजा त्यांना सोडून गेला होता.

हिंदुधर्मावरील कलंक धुऊन काढण्यासाठी त्यांनी जन्मभर खटपट केली होती. हिंदुधर्म अधिक उज्ज्वल, अधिक व्यापक, अधिक राष्ट्रसंवर्धक व्हावा अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांचा छळ झाला म्हणून त्यांनी जी बंडखोरी दाखविली, त्यामुळेच भारतातील सनातनी आणि कर्मठ मने विचार करू लागली होती. त्यांनी ब्राह्मणांना धारेवर धरले तरी त्यांचा रोख



महानिर्याण

६-१२-१९५६

ब्राह्मणांवर नसून ब्राह्मण्याविरुद्ध होता. हिंदूंपेक्षा हिंदुधर्माच्या विशिष्ट वृत्तीविरुद्ध त्यांचा खरा लढा होता. म्हणूनच त्यांनी हिंदूधर्मावर प्रहार केले, ते हिंदुधर्म सुधारण्याच्या दृष्टीने. त्यांच्या दाहक आणि प्रक्षोभकारक विचारांमागे फार मोठे तात्त्विक अधिष्ठान होते. म्हणूनच धर्मांतराचा प्रश्न आला असता जवळजवळ वीस वर्षांच्या विचारमंथनातून, अध्यात्मिक चिंतनातून त्यांनी हिंदुधर्माला सर्वांत जवळचा असा बौद्ध धर्म स्वीकारला. अहिंसा, सत्यनिष्ठा आणि निष्कलंक असे नैतिक आचरण यांची शिकवण देणारा हा धर्म स्वीकारण्यात त्यांनी फार मोठी दूरदृष्टी दाखविली. हा धर्म स्वीकारताना त्यांनी आपल्या समाजाच्या गरजेनुसार त्याला आधुनिक दृष्टिकोनाची जोड दिली. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धर्म' हा त्यांनी आयुष्याच्या अखेरीस लिहिलेला ग्रंथ त्यांच्या साऱ्या कर्तृत्वाचे, व्यक्तिमत्त्वाचे आणि विचारसरणीचे सार ठरावा असाच आहे. बुद्धधर्मात नंतर शिरलेल्या भेदाभेदांचा, मूर्तिपूजेचा आणि आत्यंतिक निवृत्तिपरतेचा त्यांनी स्वीकार केला नाही. उलट बुद्धाच्या मूळ शिकवणुकीच्या आधारे ह्या धर्माला विजिगीषु अशा प्रवृत्तिपरंपरेची जोड दिली. भिक्षूंनी केवळ स्वतःच्या निर्वाणाचा स्वार्थी विचार मनात आणू नये. देशकालपरत्वे त्यांनी समाजसेवेचे व्रत घेऊन मिशनऱ्यांच्या वृत्तीने प्रपंचात राहून समाजाला धर्मनिष्ठ राहण्याची सदैव शिकवण द्यावी असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादिले आहे.

ते राजकारणात उतरले तेही मजुरांच्या कल्याणाच्या तळमळीने. राजकीय पक्ष आपल्या उद्दिष्टांसाठी मजुरांना राबवितात. त्यांना संप करायला लावून आपल्या पक्षाची प्रतिष्ठा वाढवितात आणि त्यांना उपासमारीच्या, बेकारीच्या खाईत लोटून देतात याची त्यांना कमालीची चीड होती. अशा एका संपाच्या वेळी आपला जीव धोक्यात घालून त्यांनी मजुरांना संपापासून परावृत्त केले होते. कम्युनिष्टांच्या राजकीय हालचाली ह्या देशविघातक आहेत. ह्या भूमिकेवरून त्यांच्याशी कॉंग्रेसपेक्षाही नेटाने त्यांनी झुंज दिली होती. 'देशातील साऱ्या कम्युनिष्टांनी वाचली नसतील इतकी कम्युनिझमवरील पुस्तके मी एकट्याने वाचली आहेत' ते एकदा म्हणाले होते.

बाबासाहेबांनी स्वतंत्र लोकशाही–भारताच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचा भाग घेतला आणि सदैव त्याच्या उद्धाराची चिंता वाहिली. देशाशी संबंधित असलेल्या प्रत्येक प्रश्नाचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा आदर्श घालून दिला.

शीलसंवर्धनाला त्यांनी आपल्या आयुष्यात मोठे महत्त्व दिले.

पुढाऱ्याचे, नेत्याचे जीवन निष्कलंक असावे. नैतिकदृष्ट्या अधःपतित झालेल्या व्यक्तीला देशाला मार्गदर्शन करता येत नाही, अशी त्यांची श्रद्धा होती आणि त्या श्रद्धेला ते शेवटपर्यंत जागले.

बाबासाहेबांचे जीवन म्हणजे अनावर स्वातंत्र्यप्रीती आणि अपार ज्ञान-लालसा यांचे मोठे प्रतीक होते.

त्यांनी पेटविलेला ज्ञानदीप अखंड तेवत राहील व सदैव स्फूर्ती देईल यात शंका नाही.

* * *

मराठा ... ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... दि: ...
REFBK-0015246